
# हकारा



। वर्ष दुसरे । अंक चौथा । ऑक्टोबर–डिसेंबर १९८१ ।


## रोजगार हमी योजनेतील मजुरांसाठी
## हिशोब शिबिर



चेतना ⇄ विकास
गोपुरी, वर्धा
मार्च, १९८१

### (१) आपले काम कसे मोजतात ??

कामाच्या जागी आपण जी खनती खोदतो, त्याला लांबी, रुंदी आणि खोली असतात. जेव्हा आपण ह्या खनतीचे घनफळ काढतो, तेव्हा आपल्याला कळते की आपले काम किती झाले. आपण किती मातीचे काम केले हे कळण्यासाठी आपल्याला खनतीचे घनफळ काढावे लागते.




ज्या वस्तूंना लांबी, रुंदी आणि उंची/खोली असते त्यांचे

**घनफळ = लांबी x रुंदी x उंची/खोली**

घनफळ नेहमी घनमीटर, घनफुट, घनसेंटीमीटर आदिमधे मोजतात.

आपल्या राज्यात रोजगार-हमी-योजना लागू आहे. म्हणजेच मागेल त्याला काम देणे सरकारची मानलेली जबाबदारी आहे.

**प्रत्येकाला काम मिळाले पाहिजे हा आपला हक्क आहे.** आपण काम करतो, त्या बदल्यात सरकार पैसा देते.

**तुम्ही कष्टकरी बाया-माणसे !**

**या रोजगार-हमी योजनेत तुम्ही कामावर जाता, घाम गाळता. तुम्हां सर्व मजुरांसाठी यात अनेक कायदेशीर सोयी आहेत. त्या सर्व तुम्हाला नीट माहीत आहेत का ? सर्वांना माहीत आहेत का !**

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद


## कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| **अध्यक्ष** | गं. बा. सरदार |
| **उपाध्यक्ष** | अनंतराव बोधनकर |
| | काळूराम दोधाडे |
| **चिटणीस** | रा. के. मुटाटकर |
| **सहचिटणीस** | जगदीश गोडबोले |
| | विजय भानू |
| **खजीनदार** | अनिल गोरे |
| **सभासद** | गोविंद गारे |
| | श. गो. देवगावकर |
| | नान्सी गायकवाड |
| | जनार्दन वळवी |
| | शरद कुलकर्णी |
| | थियो रेमिडियोस |

## सल्लागार मंडळ

| | |
|---|---|
| बाबा आढाव | जयंत पाटील |
| बाबा आमटे | विजय परुळकर |
| रावसाहेब कसबे | अनुताई वाघ |
| सुधा काळदाते | विलास संगवे |
| विजय तेंडुलकर | वाहरु सोनवणे |
| वि. म. दांडेकर | गीता साने |
| मधुकर देवल | छाया सुरतवंती |
| चित्रा नाईक | दत्ता सावळे |

आ. ना. नारळकर

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता ।

# हाकारा



( महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक )

## अनुक्रमणिका

संपादकीय २

पाइनची लागवड : एक शेख महंमदी योजना
**डॉ. अनिल गोरे** ३

रोजगार हमी योजने अंतर्गत वनीकरण काही विचार
**डॉ. अरविंद रड्डी** ६

रोजगार हमी योजना
**डॉ. मधुसूदन साठे** ९

ग्रामीण मजुरीचा दर काय असावा ?
**डॉ. अभय बंग** १२

अपूर्ण कविता
**भगवान निळे** १५

रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या प्रशिक्षित मजुराचे अनुभव
**भिमसिंग गिरासे** १६

रोजगार हमी योजनेचा आढावा व काही शिफारसी
**निकीभाऊ कार्डोझो** २१

आंधळेपणा
**मा. तु. खैरकर** ३०

मूक संस्कृती बोलकी झाली
**चंद्रकांत वानखेडे** ३१

रोजगार हमीसंबंधी १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम ३५

रोजगार हमीसंबंधीच्या महत्त्वाच्या सरकारी आदेशातील काही भाग ३७

संवाद ४३

मनोर प्रकरणाच्या निमित्ताने
**शरद कुलकर्णी** ४५

संस्था परिचय ४६

नियोजन खात्याच्या २२ एप्रिल १९८१ च्या निर्णयासंबंधी महत्त्वाची माहिती ४८

वर्ष दुसरे : अंक चौथा
ऑक्टो.–डिसेंबर १९८१
वार्षिक वर्गणी : १५ रुपये
या अंकाची किंमत : ४ रुपये
पत्रव्यवहाराचा पत्ता :
महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद / हाकारा
द्वारा : जगदीश गोडबोले,
सीमा, ब ७, शिरोळे मार्ग,
पुणे ४११ ००४

**कार्यकारी संपादक**
जगदीश गोडबोले

**संपादक मंडळ**
रामचंद्र मुटाटकर
शरद कुलकर्णी
भाऊ मांडवकर

प्रकाशक : प्रा. रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद, पुणे यांनी
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,
पुणे यासाठी
साप्ताहिक मुद्रण
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०
येथे छापून प्रसिद्ध केले.

संपादकीय

# रोजगार हमी योजना

वर्षातील या शेवटच्या अंकाबरोबर 'हाकारा'चे दुसरे वर्ष पूर्ण होत आहे. या दोन वर्षात आदिवासी जीवन-विकासासंबंधीत शिक्षण, आरोग्य, कला-साहित्य, वन-संवर्धन आदि विविध विषयांवर 'हाकारा'ने सर्वांगीण आणि समतोल माहिती देण्याचा प्रयत्न केला. वाचक-कार्यकर्त्यांनी या प्रयत्नांना मनापासून साथ दिली म्हणूनच हे दुसरे वर्ष यशस्वीपणे पूर्ण करणे आम्हाला शक्य झाले.

'हाकारा'च्या या अंकासाठीं आदिवासी साहित्य व कला हा विषय आम्ही अगोदर नियोजित केला होता. परंतु शेतमजुरीचा किमान दर व रोजगार हमी योजनेतील मजुरीचा दर याविषयी पुर्नविचार करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने श्री. पागे यांच्या अध्यक्षते-खाली समितीची पुन्हा नियुक्ती केल्याने या विषयावर विचार-मंथन होणे आवश्यक व स्वाभाविक होते, म्हणून आम्ही या अंकासाठी रोजगार हमी योजना हा प्रमुख विषय ठेवला आहे. 'हाकारा'च्या नेहमीच्या प्रथेनुसार या विषयाची तात्त्विक – व्यावहारिक बैठक, संबंधित सरकारी आदेश, कार्यकर्त्यांचे प्रत्यक्ष अनुभव, अडचणी आदि माहिती आम्ही दिली आहे.

या विषयाचे तात्विक-तांत्रिक ज्ञान व कार्य-कर्त्यांशी संपर्क असलेल्या डॉ. मधुसूदन साठे यांनी ही समग्र माहिती पेश करण्यास आम्हास मदत केली त्याबद्दल त्यांचे व इतर सर्व लेखक–कार्यकर्त्यांचे आम्ही आभारी आहोत.

अंकामध्ये ठाणे जिल्ह्यातील 'मनोर' येथे भूमिसेनेसंबंधित घडलेल्या घटनेबद्दल श्री. शरद कुलकर्णी यांचा लेख आहे. 'भूमिसेने'वर झालेल्या या अन्यायाचा आम्ही कडक निषेध करतो. पण हा प्रश्न केवळ इथेच थांबत नाही. आजुबाजूच्या सामाजिक-राजकीय घडामोडीचा कानोसा घेतला असता आज 'भूमिसेने'बाबत जे घडले ते तळागाळाच्या इतरही संघटनाबाबत घडेल अशी साधार भीति वाटते. कारण अनेकदा लोकांशी प्रत्यक्ष संपर्क असणाऱ्या व त्यांचा विश्वास संपादन केलेल्या अशा संघटना सरकार व राजकीय पक्ष दोघांनाही अडचणीच्या ठरतात आणि दोघांकडूनही त्यांची गळचेपी होण्याचा धोका संभवतो!

'हाकारा'च्या पुढील वर्षाच्या वाटचालीत वाचक कार्यकर्त्यांचा सहकार-साथ मिळेल ही आशा व विनंती.

●

## नवीन पत्ता

महाराष्ट्र मानव–विज्ञान परिषद
व
'हाकारा'
द्वारा – जगदीश गोडबोले
ब–७, सीमा अपार्टमेंटस्
शिरोळे मार्ग, पुणे ४११ ००४

# पाइनची लागवड : एक शेख महंमदी योजना



अनिल गोरे

वनसंरक्षण आणि वनसंवर्धन यांचे महत्त्व आता सर्व-सामान्य माणसाला पटू लागले आहे. जमिनीची धूप थांबवणे, ओढे, नाले, विहिरी आटू न देणे यासाठी जंगले वाढवणे अत्यावश्यक आहे हा विचार पसरत चालला आहे. सामाजिक वनीकरणाची चर्चा शासकीय व इतर व्यासपीठांवर ऐकू येऊ लागली आहे. आदिवासी आणि जंगले यांच्या परस्परसंबंधांचे भानही या प्रश्नात लक्ष घालणारांना महत्त्वाचे वाटू लागले आहे. या पुढचा टप्पा विशिष्ट कार्यक्रमांच्या गुणावगुणांच्या चर्चेचा असणार आहे.

आपल्या जंगलापासून समाजाच्या गरजा विशेषत: जंगलाबाहेर रहाणाऱ्या माणसांच्या गरजा भागवण्या-साठी दोन प्रकारे प्रयत्न करता येतात. एक म्हणजे हव्या त्या जातीची पूर्ण वाढ झालेली झाडे तोडून आणणे (सिलेक्शन फेलिंग) व नवी वाढ निसर्गक्रमाने होण्याची वाट पहाणे. या प्रकारात मिळणारे उत्पन्न वाढत्या लोकसंख्येला व त्यांच्या वाढत्या आकांक्षांना पुरे पडत नाही असे मानले जाते. दुसरा मार्ग माणसाने पुढाकार घेऊन हवी ती झाडे लावून जोपासणे. वनविकास महामंडळे हा मार्ग अनुसरतात. या मार्गाच्या साधक-बाधकतेची चर्चा मोकळेपणाने होताना दिसत नाही. मध्यप्रदेश वनखात्याचे माजी मुख्य वनरक्षक पै. एम्. ए. वहीदखान यांनी १९७८ साली पाइन वृक्षाच्या लागवडी-बद्दल एका अप्रसिद्ध अहवालामध्ये शास्त्रीय, आर्थिक व सामाजिक दृष्टिकोनातून चर्चा केली आहे. आपापले पूर्वग्रह बाजूला ठेवून या अहवालातील मतांचा अत्यंत गंभीरपणे विचार सर्वांनी केला पाहिजे म्हणून तो सार-रूपाने पुढे दिला आहे.

पाइन जातीची झाडे काही अपवादात्मक जागा सोडल्यास थंड प्रदेशात वाढतात. भारतात हिमालय पर्वतराजींमध्ये ती आढळतात. मध्य प्रदेशात त्यांच्या वाढीला अनुकूल परिस्थिती नाही. १९१९ सालापासून बालाघाट व विलासपूर जिल्ह्यात तुरळक प्रायोगिक स्वरूपात पाइन लागवडीचे प्रयत्न झाले पण ते फसले व सोडून द्यावे लागले. रायगढ जिल्ह्यात (कुलाबा नव्हे) जशपूर पठारावर कदाचित पाइन वाढू शकेल, पण असा प्रयत्न झालेला नाही.

मुळात इथे नसलेली झाडे आणून लावण्याची कल्पना आली तरी कशी हे बघण्याजोगे आहे. वाढत्या लोक-संख्येमुळे जंगलांवर शेतीचे सतत आक्रमण होत आहे. नैसर्गिक जंगलामधील बऱ्याच वृक्षांची पैशाच्या हिशोबात किंमत फार कमी असते किंवा त्यांच्या वापराचे तंत्रज्ञान अज्ञात असते. त्यामुळे जंगलांचे क्षेत्र टिकवून त्यात किंमती झाडे लावावीत असे सहाजिक वाटते.

## अपुरा विचार

**कागद, रेयॉन वगैरेकरता लागणारा लगदा ज्यांपासून मिळतो अशा पाइन व युकॅलिप्टस (निलगिरी) या दोन प्रकारच्या झाडांचा या संदर्भात नेहमी विचार होतो. परंतु ही निवड करणाऱ्या मंडळींचा विचार अपुरा आहे असे खेदाने म्हणावे लागते. स्थानिक वृक्षजातींचा यांनी पुरेसा अभ्यास केलेला नसतो आणि त्यातील झपाट्याने वाढणारी झाडे नाकारून परकी जातींचा हट्ट धरला जातो.**

१९६१ पासून सरकारी मदतीने आपल्याकडे निलगिरीची लागवड मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. एकट्या मध्य प्रदेशात कोट्यावधी रुपये खर्च करून उभी जंगले तोडून निलगिरी लावली गेली. सुरुवातीला ही झाडे भराभर वाढली. पण ही उंचीची वाढ फसवी ठरली. पुढे या झाडांचा घेर अपेक्षेप्रमाणे वाढेना. अवघ्या दहा वर्षात या योजना सोडून द्याव्या लागल्या. या झाडांपासून दर दहा वर्षात दर हेक्टरी १५ घन मीटर उपयुक्त लाकूड मिळेल अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात त्याच्या निम्मेसुद्धा हाती लागलेसे दिसेना.

निलगिरीची लाट ओसरल्यावर पाइनची आली. पाइनला जमीन हलकी चालते, पाणीही कमी चालते, पण हवेत दमटपणा वर्षभर हवा. फार कडक उन्हाळा मानवत नाही. दमटपणाची अट पुरी करणारी जागा खरे तर मध्य प्रदेशात मिळणे कठीण. पण घटकाभर असे धरून चालू की तरीही हे झाड कदाचित वाढू शकेल. तर मग थोड्या प्रमाणावर, प्रायोगिक स्वरूपात, संख्याशास्त्रीय पद्धतीत बसतील अशा तऱ्हेने जंगलांचे प्रातिनिधिक तुकडे निवडून काळजीपूर्वक लागवड करून बघितली पाहिजे. आणि याकरता जंगलांचे मोठमोठे पट्टे संपूर्ण साफ करण्याची मुळीच गरज नाही. नाहीतर प्रयोग फसून हाती धुपाटणे यायचे. कारण एकदा पूर्ण तोडलेले जंगल पुन्हा वाढवणे महाकर्म कठीण आहे. पाइन लावण्यासाठी जमीन पाण्याचा उत्तम निचरा होणारी असली पाहिजे. एरवी त्या झाडाना रोग लागतात. सागाची झाडेदेखील खूप पावसाच्या व खोल माती असलेल्या प्रदेशात लावली तर आजारतात. त्यामुळेच भारत सरकारच्या इन्स्पेक्टर जनरल ऑफ फॉरेस्ट यांनी, पाइनसाठी बस्तरमध्ये साल वृक्षाची (याना जमिनीतील पाण्याचा उपयोगच होतो) जंगले तोडून टाकलेली पाहून तीव्र खेद व्यक्त केला.

पाइनच्या जंगलात दुसरे काहीही उगवत नाही. गवतसुद्धा नाही. त्यामुळे जमिनीचा यात बहुद्देशीय वापर करता येत नाही, ही एक मोठीच अडचण आहे. पाइन जंगलात वन्य पशुपक्ष्यांना स्थान नाही. उलट बस्तरच्या सध्याच्या जंगलात आदिवासींना फळे, फुले, पाने, मुळे, पशूंची शिकार या सर्वांचा उपभोग घेता येतो. त्यामुळे ते जंगल तोडून पाइन लावण्याने आदिवासींना जगणे अशक्य होईल. त्यांची निसर्गसंपत्ती उद्ध्वस्त करून आपण आदिवासी विकास कसा साधणार आहोत? पाइनची लागवड करणारांनी आदिवासींच्या आर्थिक विकासाचे कारण तरी मुळीच पुढे करू नये.

सध्याच्या जंगलांमध्ये अनेक तऱ्हेचे पशुपक्षी आहेत. गवा, बारहसिंगा यांच्यासारखे दुर्मीळ प्राणी आहेत. पाईनच्या जंगलामुळे यांची पीछेहाटच होणार.

पाइनची लागवड करायची म्हणजे आधीची झाडे तोडली जाणार अगदी मुळापासून. मग पावसापाठोपाठ प्रचंड तण वाढणार. इतके की पाइनची रोपे त्यात बुडून जातील आणि मरतीलसुद्धा. तण काढणे हे फार खर्चाचे काम आहे, आणि वारंवार करावी लागणारी गोष्ट आहे. हे कसे होणार कोण जाणे.

पाइन झाडामध्ये रेझिन नावाची ज्वालाग्राही रसायने असतात त्यामुळे पाईन जंगलाला आगीची भीती फार असते. झाड पेटल्यावर साल फुटून रेझिनचे ओघळ वाहू लागतात आणि क्षणात आगीचे लोळ शेंड्यापर्यंत पोचतात. काय होत आहे हे कळण्याच्या आत झाडाची राख होते. बस्तरमध्ये गवताची वाढ खूप आणि आगीही बऱ्याच लागतात. आदिवासी शिकारीसाठी राने पेटवतात ती वेगळीच. या धोक्याचे काय करणार?

## नव्या तंत्रज्ञानाची जोड हवी

पाईन लागवडीचा मुख्य आधार हा की वृत्तपत्रीय कागदासाठी लागणारा लांब धागेवाला लगदा याच्या लाकडापासून मिळेल. त्या लगद्यामध्ये स्थानिक लाकडापासून मिळणारा आखुड धागेवाला लगदा मिसळून देता येतो. म्हणजे एरवी जे लाकूड कागदनिर्मितीला निरुपयोगी होते ते पाइनच्या जोडीने वापरल्यास कामी येते. इथे खरे तर आपण नवीन तंत्रज्ञानाची कास धरली पाहिजे. जपानी लोक निव्वळ आखूड धाग्याच्या लगद्यापासून उत्तम कागद बनवू शकतात. तसेच पाइनऐवजी बांबू लगद्याबरोबर हा कनिष्ठ दर्जाचा लगदा मिसळला जाऊ शकतो. हे जमवता येत असेल तर मग विलायती झाडे आम्हाला नकोतच. **बांबू बस्तरचा रहिवासी आहे. त्याचीच आपण जोपासना करूया. हातचे सोडून पळत्याच्या मागे लागणे शहाण्यांना शोभत नाही. मादागास्कर, केनिया, फिजी वगैरे देशांत पाइन लावण्याचे ठरले ते कोणताही झाडोरा नसलेल्या माळरानात हे लक्षात घेण्यासारखे आहे.**

निव्वळ खर्चाच्या दृष्टीने पाहिले तर पाइनच्या

लागवडीचा दर हेक्टरी खर्च दोन ते तीन हजार रुपये आहे. उलट बांबू वा सागवानाचा खर्च दर हेक्टरी हजार ते बाराशेमध्ये बसतो. म्हणून इथे बस्तरमध्ये लावलेल्या पाइनचा लगदा शेवटी फार महाग पडेल.

सुमारे पंधरा वर्षांपूर्वी डॉ. फॉन मन्रॉय नावाचे युनोचे तज्ज्ञ जंगलांवर आधारित उद्योगधंद्यांबाबत सल्ला देण्याकरता भारतात आले होते. अमुक कारखान्यासाठी तमुक झाडाची लागवड करावी हा विचार त्यांनी संपूर्ण अमान्य केला. त्यांच्या मते मुख्य धोरण हे किमान खर्चात जमिनीतून अधिकाधिक लाकूड पैदा करणे हे असले पाहिजे, मग त्या झाडांच्या जाती कोणत्या का असेनात. मूळ लाकूड कसेही असले तरी योग्य तंत्रज्ञान वापरून ते हव्या त्या वापराला उपयुक्त बनवता येते असा त्यांचा विश्वास होता आणि शेवटी स्थानिक वनस्पती पाइनपेक्षा कमी दर्जाच्या आहेत हा समजच योग्य नव्हे.

बस्तरमध्ये तीन जातीचे बांबू विपुल आहेत. त्यांचा धागा लांब व उत्तम कागद बनवण्यास योग्य आहे. त्यांच्यावर रोग पडत नाहीत. लागवड केल्यापासून तीन-चार वर्षांत बांबूची थोडीफार तोड सुरू करता येते. गुरे आणि आगी यांच्यापासून राखल्यास डेंड्रोकलॅमस स्ट्रिक्टस हा बांबू दर ३–४ वर्षांनी एकदा-असा ४० वर्षे छाटता येतो. बाकीच्या दोन जातींना तर ही सुद्धा मर्यादा नाही. बहुतेक वृक्ष पूर्ण वाढल्यानंतरच तोडता येतात हे ध्यानात घेतल्यावर बांबूचे वैशिष्टच किती महत्त्वाचे आहे हे कळते. बांबू हा इतर झाडांचा शत्रू नाही. त्यामुळे असलेले जंगल सफा न करता बांबूच्या लागवडीखालील क्षेत्र वाढवता येईल. बांबू हे खरोखर बस्तरला मिळालेले वरदान आहे.

अर्थात 'घरकी मुर्गी दाल बराबर' असे वाटणे हा मनुष्यस्वभाव आहे. त्यामुळे पाईनसारख्या परकी झाडाबद्दल आकर्षण वाटल्यास ते समजण्यासारखे आहे. पण या नैसर्गिक प्रवृत्तीवर शास्त्रीय प्रयोग व अभ्यासाचा लगाम अवश्य हवा.

### तिन्ही अंगाचा विचार

पै. वहीदखान यांच्या अहवालाचे स्वरूप हे असे आहे. त्यांनी वनविकासाच्या धोरणाची तीन अंगे उत्तमपणे मांडली आहेत. ती म्हणजे वैज्ञानिक, आर्थिक व सामाजिक. वैज्ञानिक दृष्टया पाइन हे झाड बस्तरमध्ये निरोगीपणे व जोमाने वाढेल असे त्यांना वाटत नाही. आर्थिकदृष्टचा पाइनचा लगदा आपल्याला परवडेल असे दिसत नाही. सामाजिकदृष्टया नैसर्गिक जंगल तोडून पाइन लावणे म्हणजे आदिवासींना उखडून टाकण्यासारखेच आहे. या कारणांमुळे त्यांना पाइन नको वाटतो. पै. वहीदखान उच्चपदावरील शासकीय अधिकारी वन-विद्येतील जाणकार असल्याने त्यांच्या विचारांचे खास महत्त्व आहे. असे म्हणतात की हा अहवाल त्यावर विचार होण्याआधीच दाबला गेला. तर पाइन लागवडीमध्ये हितसंबंध गुंतलेल्या मंडळींनी तो पद्धतशीरपणे दाबला असावा अशी शंका येणे अपरिहार्य आहे.

●


# उत्तरखंडात अभ्यास–मोहीम

जंगलतोडीमुळे उत्तरखंडात झालेले नुकसान, त्यामुळे बिघडलेले निसर्गसंतुलन सावरण्यासाठी स्थानिक पहाडीआदिवासी लोकांनी योजलेले उपाय व त्यातून निर्माण होत असलेली पर्यावरणाची व्यापक जाणीव यांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठी उत्तरखंडात एक अभ्यास-मोहीम आयोजित करण्याचा महाराष्ट्र मानवविज्ञान परिषदेचा प्रयत्न आहे.

**या मोहिमेची घोषणा 'हाकारा'च्या अंकात यापूर्वी केली होती. आता १ मार्च १९८२ पासून या मोहिमेस सुरुवात होत आहे.**

पर्यावरणविषयक व्यापक जाणीव व साहसी वृत्ती जागविणाऱ्या या मोहिमेत सहभागी होण्याची इच्छा असणाऱ्यांनी नाव, पत्ता, वय, शिक्षण, पूर्वानुभव इत्यादी तपशिलासह पुढील पत्त्यावर १५ जानेवारी पर्यंत संपर्क साधावा–सचिव, 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' द्वारा – जगदीश गोडबोले, सीमा ब – ७, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४११ ००४.

# रोजगार हमी योजने अंतर्गत वनीकरण : काही विचार



अरविंद रड्डी

## पार्श्वभूमी

राष्ट्रीय वननीतीनुसार देशातील जमिनीपैकी ३३ टक्के जमीन वनाखाली असावी असा निर्णय मागेच घेण्यात आला आहे. (डोंगराळ भागातील हे प्रमाण ६६ टक्के असावयास पाहिजे.) राष्ट्रीय धोरणाने ठरवून दिलेल्या या प्रमाणाउलट महाराष्ट्रातील वनाखाली असलेल्या जमिनीचे प्रमाण फक्त २१ टक्के असून बुलढाणा जिल्ह्यात ते फक्त ११ टक्के आहे. यापैकी अर्थपूर्ण वने असलेली जमीन जर आपण लक्षात घेतली तर ते केवळ ६ टक्के भरेल व बाकीच्या वनजमिनी-वरील झाडोरा निरर्थकच म्हणावा लागेल. उरलेल्या वनजमिनीचीसुद्धा सतत वाढणारी लोकसंख्या तसेच जनावरांची संख्या व त्यांच्या नित्यनैमित्तीक सर्पण, वैरण इत्यादींचे होणारे वाढते दडपण यामुळे झीज होत आहे. थोड्याबहुत प्रमाणात ही स्थिती महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात आहे. अशा परिस्थितीत त्रोटक असलेली सध्याची वने ही संरक्षित कशी ठेवता येतील, तसेच त्यांचे प्रमाण ३३ टक्के वर कसे नेता येईल हा एक वनविभागापुढे मोठा यक्षप्रश्न आहे.

## एक सुचलेले उत्तर

प्रत्येक खेडेगावाला एक घटक धरावे व त्यात इंधन, वैरण, शेतीच्या अवजारांस लागणारा लाकूडफाटा याविषयी स्वयंपूर्ण करण्याचे ध्येय ठेवावे. याकरिता गावाच्या हद्दीत जेथे खरोखरीच अर्थपूर्ण शेतीतून धान्योत्पादन होत आहे अशा जमिनी वगळून बाकी गावातील इतर सर्व प्रकारच्या रिकाम्या जमिनीवर झाडे लावून त्यांना वृक्षाच्छादित करावे लागेल. कोठे कुठल्या प्रकारची झाडे लावावयाची ते अर्थात पूर्वपाहणी व जमिनीचा दर्जा लक्षात घेऊन ठरवावे लागेल. एवढे मात्र पक्के की, लावावयाची झाडे सरपण, वैरण, तसेच फळे या दृष्टीने गावाला उपयुक्त होतील अशी असली पाहिजेत. या संदर्भात गावाच्या हद्दीत असलेली वन-खात्याची जमीन, महसूलखात्याचे ताब्यात असलेली जमीन, पंचायतीच्या ताब्यात असलेली जमीन, तसेच गावाच्या हद्दीतून वाहणाऱ्या कालव्याचा किनारा, रेल्वे-लाइन, नद्या-नाले, रस्ते यांच्या बाजूचाही समावेश राहील. याशिवाय खाजगी मालकीची पण वहीतीखाली नसलेली जमीन, तसेच शेतांचे बांध यांचासुद्धा उपयुक्त झाडे लावण्यासाठी उपयोग करून घ्यावा लागेल.

**कार्यपद्धती :** आपण असे समजा की, एखाद्या गावाच्या हद्दीत वरील प्रकारच्या जमिनी आहेत व त्यावर उपयुक्त झाडे लावावयाची आपल्याला इच्छा आहे. अशा परि-स्थितीत आपल्याला काय करता येईल ? एक तर रोजगार हमी योजनेंतर्गत आपल्याला ते गाव एक घटक धरून त्या गावापुरती वनीकरणाची योजना आखावी लागेल. याचा उद्देश गावातील काम नसलेल्या लोकांना कामाला लावून गावातच एक रोपवाटिका तयार करून तेथे आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या झाडांची योग्य संख्येत रोपे तयार करून रोपांची गावाच्या परिसरात लागवड करणे हे राहील.

वर म्हटल्याप्रमाणे गावाच्या परिसरात अनेक प्रकारच्या जमिनी असू शकतात व त्यात खालील गोष्टी करता येतील ––

**(अ) उच्च प्रतीचे राखीव वन :** येथे चांगल्या प्रकारचा झाडोरा असतो व सागाची किंवा इतर महत्त्वाची झाडे असतात. सध्याच्या परिस्थितीत असल्या

प्रकारची वने पहाडी व डोंगराळ भागात जेथे सहसा इतर लोक जाऊ शकत नाहीत अशा ठिकाणीच उरली आहेत. बहुतांशी अशा प्रदेशात आदिवासी लोक जास्त संख्येने राहतात आणि वनउपजावर उदरनिर्वाह करतात. अशा जंगलांमध्ये जर मोठ्या प्रमाणावर बांबू, मोह, तेंदू, चार, आवळा, कुलू, रोशागवत व सुबाभूळ यांची पूरक लागवड केली तर आदिवासींच्या दृष्टीने त्या जंगलांचा दर्जा निश्चितच वाढेल व त्यांना आर्थिक-दृष्ट्याही फायदा मिळेल.

**(ब) मध्यम प्रतीची राखीव वनें** : बहुतांशी अशा प्रकारच्या जंगलांत झाडोऱ्याचा दर्जा हलक्या प्रतीचा असतो व वर्षानुवर्षे त्यातून उपज काढल्यामुळे असलेल्या झाडोऱ्याची पुर्ननिमितीची जणू काही शक्तीच कमी झालेली असते. गावाच्या परिसरात जर अशा प्रकारची जंगले असली तर तेथे साग, तेंदू (ज्याची पाने बिडी-करिता मोठ्या प्रमाणात वापरली जातात). बांबू, रोशा गवत इत्यादींची पूरक लागवड करता येईल व जंगलाचा दर्जा वाढविता येईल.

**(क) हलक्या प्रतीची वनाची जागा** : पंचायतीची जमीन.

**महसूलखात्याच्या ताब्यातील जमीन** : अशा प्रकारच्या हलक्या जागेचा बहुतांशी सध्या योग्य उपयोग होत नाही. अशा जमिनीचा मोठ्या प्रमाणावर तांत्रिक पद्धतीने मृदसंधारणार्थ वनीकरणाकरिता (सिसु-शिरस, आइलॅनथस, हिवर, अगेव्ह इत्यादी प्रकारची झाडे लावून) तसेच वैरणीचा पुरवठा वाढविण्यासाठी (अंजन, सुबाभूळ, चांगल्या प्रकारचे गवत इत्यादींची लागवड करून) उपयोग होऊ शकतो. चिंच, आंब्याची झाडे यांची पंचायतीच्या जमिनीवर, जमीन चांगली असेल तर, लागवड होऊ शकते.

**(ड) रस्ते, कालवे, रेल्वेलाईन, नदी, नाले यांच्या बाजूची रिकामी जागा** : सर्वसाधारण वरील भागाची माती चांगल्या प्रकारची असते. त्यातल्या त्यात प्रामुख्याने कालव्याच्या बाजूची जागा चांगलीच असते. या ठिकाणी कोणत्या प्रकारची झाडे लावावयाची हे प्रत्यक्ष जागा पाहूनच ठरवावे लागेल. तरीपण उपयोगाची झाडे दुतर्फा लावणे योग्य ठरेल. याकरिता सिसु, सिरस, गुलमोहर, पेल्टोफोरम, ग्लिरिसिडीया, बांबू, सुबाभूळ, नीम इत्यादी झाडे महत्त्वाची वाटतात.

**(इ) गावठाणाची जागा** : सर्व रस्त्यांची, बाजूची जागा गुलमोहर, पांगारा व इतर जातीची झाडे लावून सुशोभित करता येऊ शकते. याशिवाय आठवडी बाजाराच्या जागी सावली मिळेल अशा प्रकारची झाडे लावल्यास उपयोगी ठरतील व धार्मिक ठिकाणी फुलांची झाडे असणे योग्य ठरते.

**(फ) वहितीखाली नसलेली खाजगी रिकामी जागा** : शेताचे बांध वगैरे वरील प्रकारच्या जमिनीवर चांगल्या प्रकारच्या झाडांची लागवड करण्यास वाव आहे. या बाबतीत असे सुचविले जाते की, शेतीच्या धुऱ्यावर साग, सिसु, सिरस, बांबू इत्यादी प्रकारची झाडे सरळ रेषेत ५ मीटर अंतरावर लावावीत. बुलढाणा जिल्ह्यात शेतीच्या बांधाखाली एकूण अंदाजे २, २८, ६४२, किलोमीटर अंतराची जागा आहे असे समजते.

वरील पद्धतीने बुलढाणा जिल्ह्यात बांधावर चार कोटी सत्तावन्न लाख वीस हजार इतकी इंधन, लाकूड-फाटा व वैरण देणारी झाडे लावता येतील. प्रति हेक्टरी ४०० वृक्षसंख्या ही जर 'वना'ची व्याख्या धरली तर शेताच्या बांधावर ५ मीटर अंतरावर लावण्यात येणारी झाडे ११४३ चौ. कि. मी. वनक्षेत्राची बरोबरी करतात. हे प्रमाण जिल्ह्याच्या संपूर्ण क्षेत्राच्या ११.८ टक्के आहे. अशा रीतीने शेतीखाली नसलेल्या खेड्यांतील जमिनीवर झाडे लावून आपण राष्ट्रीय वनधोरणानुसार ठरविलेल्या ३३ टक्के प्रमाणाकडे वाटचाल करू शकतो.

शेतीच्या बांधावर सुबाभुळीची झाडे जर एक मीटर अंतरावर लावली तर बांधाची उपयुक्तता आणखीनच वाढविता येते. सुबाभुळीच्या झाडोऱ्याच्या फांद्या नियमित कापून जनावरांना वैरण देता येते; परंतु त्या १.५ मीटर उंचीपेक्षा जास्त वाढू देऊ नयेत अशा रीतीने शेतकऱ्यांस सहजतेने जनावरांच्या वैरणीकरिता फांद्या कापता येतील. सुबाभूळ झाडांची पाने जर दुसऱ्या प्रकारच्या वैरणीत ३३ टक्के मिसळून जनावरांना खाण्यास दिली तर जनावरांना उत्तम प्रतीचे खाद्य मिळू शकते. सुबाभूळ झाडांची पाने जमिनीसाठी उत्कृष्ट हिरवे खत म्हणून उपयोगात येतात. असा अंदाज आहे की एक मीटर अंतराने जर झाडे लावली तर बुलढाणा जिल्ह्यात २२ कोटी सुबाभुळीच्या व इतर सर्पणाच्या झाडांची लागवड शेतीच्या बांधावर करणे शक्य आहे. अशी सुबाभुळीची लागवड निःसंशय बुलढाणा जिल्ह्यातील दुभती जनावरे व दुग्धव्यवसायाच्या विकासासाठी पोषक आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या

घरी इंधन वरण, लाकूड फाटा इत्यादींची गरज भागल्यास राखीव वनाकडे तो जाणार नाही. पर्यायी राखीव वनांवरील दडपण कमी होऊन त्यात सुधारणा होईल.

हे सर्व प्रथम दर्शनी विलक्षण वाटले तरी शासनाच्या "कामासाठी अन्न" कार्यक्रमांतर्गत खेडोपाडी बेरोजगारीमुळे वाया जाणाऱ्या अमाप शक्तीचा उपयोग करून घेण्याचा विचार केल्यास ही विलक्षण बाब आवाक्याबाहेर नाही असे वाटते.

**(जी) अंमलबजावणीची पद्धती** : अशा जिल्हावार भरभक्कम वनीकरणाच्या कार्यक्रमाकरिता पुरेसा कर्मचारी वर्ग आणि अवजारे लागतील हे उघडच आहे. या बाबतीत असे सुचविता येईल की प्रत्येक पंचायत समिती पातळीवर एक नियमन घटक तयार करून त्याला "प्रकल्प घटक" असे नाव द्यावे. असा प्रत्येक प्रकल्प घटक, प्रकल्प संचालक यांच्या अधिकाराखाली राहील. हा प्रकल्प संचालक अधिकारी विभागीय वन अधिकारी यांच्या दर्जाचा असावा.


त्यांच्या सहकार्याकरिता २ सहाय्यक प्रकल्प संचालक असावेत, जे उपविभागीय वन अधिकारी यांच्या दर्जाचे राहतील. याशिवाय ५ विस्तार अधिकारी, वनक्षेत्रपालाच्या दर्जाचे १० सहाय्यक विस्तार निरीक्षक, वनपालाच्या दर्जाचे व १ विस्तार निरीक्षक वनरक्षक दर्जाचे असे असावेत. त्यांना नियमानुसार ऑफिस सवलत राहील. प्रत्येक विस्तार अधिकारी "वनक्षेत्रपाल" यांना लिपीक, त्यांचे कार्यालय सांभाळण्याकरिता, त्यांचे लेख व अभिलेख हाताळण्याकरिता राहील, प्रकल्प संचालक, सहाय्यक प्रकल्प संचालक, विस्तार परिक्षेत्र अधिकारी यांची कार्यालये व निवासस्थाने पंचायत समिती मुख्यालय, पाटबंधारे विभागाच्या कॉलनीप्रमाणे बांधलेली राहतील. विस्तार अधिकारी व विस्तार निरीक्षक हे कामाच्या सोईनुसार खेडोपाडी मुख्यालयास राहतील, जेणे करून प्रत्यक्ष कामावरती परिणामकारक देखरेख करता येईल. प्रत्येक प्रकल्प दरवर्षी १० खेडी काम करण्याकरिता घेईल.

बुलढाणा जिल्ह्यांत एकूण १४९७ खेडी आहेत. त्यांची विभागणी जिल्ह्यांतील एकूण १३ पंचायत समित्यामध्ये केली आहे. जर प्रत्येक वर्षी १० खेडी प्रत्येक पंचायत समितीमधील, या योजनेअंतर्गत घेतली गेली तर दर वर्षी जिल्ह्यांतील एकूण १३० खेडी स्वयंपूर्ण होऊ शकतील. म्हणजे शून्य वर्षापासून सुरवात केली तर १५ वर्षात १४९७ खेड्यातील जागा पूर्ण लागवडीखाली येऊ शकते. (किंवा १४९७ खेड्यांतील जागा संपूर्ण लागवडीखाली येण्यास शून्य वर्षापासून सुरवात केल्यास पुढील १५ वर्षे लागतील.)

हा सगळा प्रपंच रोजगार हमी योजने अंतर्गत नियमात ६० टक्के मजुरी, २० टक्के कर्मचारी व २० टक्के साधन सामुग्री यांत बसेल असे वाटते आणि या माध्यमांतून जनता जनार्दनाची प्रचंड ताकद खेडोपाडी अर्थपूर्ण वृक्षारोपणाच्या कामात लावता येईल आणि सध्याची वने आणि वनउपजाविषयीची हलाखीची परिस्थिती निश्चितपणे बदलता येईल. ज्या विस्तृत प्रमाणात आणि ज्या गतीने आपल्याला वृक्षारोपण करणे अत्यंत आवश्यक आहे ते करण्याकरिता वरील गाव हा एक घटक धरून सुचविलेली कार्यपद्धती महत्त्वाची वाटते तरी याचा योग्य विचार व्हावा.

(वनशक्तीच्या सौजन्याने)

(विभागीय वन अधिकारी, 'वनशक्ती'च्या सौजन्याने



# रोजगार हमी योजना



**मधुसूदन दत्तात्रय साठे**

आजपर्यंतच्या नियोजनाचा सर्वसाधारण अनुभव विचारात घेता रोजगार हमी योजनेची वैशिष्ठ्ये लक्षांत येतात. अगदी प्रथमदर्शनीसुद्धा रोजगार हमी योजना आणि नियोजनच्या कालखंडातील इतर सर्व आर्थिक विकासाच्या योजना यांत एक मूलभूत फरक ठळकपणे जाणवतो. रोजगार हमीच्या कामांवर येणारे मजूर सर्वार्थाने गरीब म्हणून धरता येतील. अर्थात या मजुरांहूनही अधिक गरीब ग्रामीण भागात असण्याची शक्यता आहे परंतु त्यांचा विचार पुढे चर्चेच्या ओघात करता येईल. नियोजनाच्या इतर कोणात्याही दुसऱ्या योजनेबाबत असे विधान करता येणार नाही. ग्रामीण भागात गरिबांना संघटित करणे हेच काम प्रमुख मानणाऱ्या स्वंयसेवी गटांना हा मुद्दा महत्त्वाचा वाटेल.

विकासाच्या कार्यक्रमांत रोजगार हमी योजना आणि इतर योजना असा फरक करण्याची गरज का भासावी ? योजनाकार, भाष्यकार, राज्यकर्ते आणि विरोधक यांचे एका मुद्यावर जवळपास एकमत आढळते. तो मुद्दा म्हणजे नियोजनाच्या संपूर्ण कालखंडात गरीबांचे प्रश्न अजिबात सुटले नाहीत. जो काही आर्थिक विकासाचा फायदा काही गटांना आणि वर्गांना मिळाला त्याखेरीज सर्वसाधारण गरीब माणूस या विकासाच्या प्रक्रियेत कोरडाच राहिला. तसेच त्याचा सहभागही यात नव्हता.

नियोजनांतील विविध प्रकारच्या विकास कार्यक्रमांची दोन गटांत विभागणी करता येईल. एक प्रकारच्या योजना म्हणजे रस्ते, शाळा, पिण्याच्या पाण्याची सोय, पाटबंधाऱ्याचे छोटे मोठे प्रकल्प यांचा फायदा अगदी सार्वत्रिक प्रमाणावर संपूर्ण ग्रामीण समाजाला होत असतो असे सहाजिकपणे गृहीत धरले जाते. दुसरा प्रकार व्यक्तिगत फायद्याच्या योजना. यात व्यक्तिगत लाभासाठी गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या यासाठी कर्ज वा अनुदान देण्यात येते. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या पिकांसाठी खते, बी–बियाणे, कीटकनाशक औषधे, विहीर खणण्यासाठी अनुदान अशा प्रकारच्या योजना राबवण्यात येतात. याहीपेक्षा अधिक महत्त्वाची कल्पना म्हणून ग्रामसभेच्या पातळीवर सर्व लोकांचा सहभाग असेल अशी आणि विशेषतः गरीबांना लाभदायक ठरेल अशी बांधिलकी नियोजनाच्या संकलपनेत आढळत नाही.

अशा पार्श्वभूमीवर रोजगार हमी योजना काही अंशी वेगळी आणि महत्त्वाची मानता येईल. वेगळी यासाठी की निदान रूढ अर्थाने सर्व गरीब या कामावर पावसाळ्याचे दिवस सोडून जगण्यासाठी एकत्र येऊ शकतात; आणि कायद्याच्या नैतिक आधाराने संघटित होऊन शासनावर दबाव आणू शकतात. परंतु आज या कार्यक्रमाची जी परवड चालली आहे त्यावरून भविष्यकाळात ही योजना कुठे भरकटत जाणार याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे.

## व्यवहारी योजना हव्या

रोजगार हमी योजनेचा दोन दृष्टिकोनातून अलग विचार करता येईल. एका विचारधारेनुसार ग्रामीण रोजगाराचे मुख्य सूत्र धरून स्थानिक विकासाचा आंतर्गिकदृष्ट्या सुसंगत असा आराखडा तयार करून स्थानिक पातळीवर त्याची अंमलबजावणी करावयाची. यामध्ये ग्रामीण जनतेचे श्रम आणि रोजगाराची गरज लक्षात धरून वेगवेगळ्या विकास कार्यक्रमाची आखणी आणि अंमलबजावणी करण्यात येईल. यासाठी रोजगार हमीचा सर्वमान्य असलेला कायद्याचा आधार घेऊन

क्षेत्रविकासाच्या संकल्पना — आराखडे तयार करता येतील. वास्तविक पाहता सध्या प्रसारात असलेल्या रोजगार हमी कायद्यामध्ये अशा प्रकारची जबाबदारी सरकारवर सोपविण्यात आलेली आहे, पण त्याकडे अजून कोणाचे लक्ष गेलेले नाही. आज घाईगर्दीने केलेल्या "कामाच्या नील प्रती" (blue print of works) याला कोणताही व्यवहाराचा आणि शास्त्राचा निकष लावता येत नाही. त्याऐवजी सर्वांगीण क्षेत्र-विस्ताराच्या (area development) छोट्या प्रकल्प योजना बनवून ग्रामीण श्रमशक्तीचे नियोजन अधिक परिणामकारक व गरिबांच्या फायद्याचे ठरेल. आज रोजगारहमीचा मर्यादित विचार फक्त रोजच्या गरजे-पोटी श्रम करून दोन-चार रुपये वेतन मिळवण्याचा आहे तो न राहता त्यातून निर्माण होणारी साधनसंपत्ती समाजाच्या मालकीची होऊन ग्रामीण विकासाचा आधार बनू शकेल. यासाठी जमीन आणि पाणी मूलभूत विकासाची साधने मानून गावपातळीवर सर्व माणसांचा आणि जनावरांचा एकत्रित विचार करता येईल. गेल्या काही वर्षांत ग्रामीण नियोजनाचा आधार पाणलोटाचे क्षेत्र (watershed development) हे मानून जमीन आणि पाणी या साधनसामुग्रीचा विचार करावा असा विचारप्रवाह सर्वमान्य होत आहे.

या विचारात आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीची भर घालणे आवश्यक आहे. पाणलोटाच्या क्षेत्राधाराने ग्रामीण श्रमशक्तीचे नियोजन करतानाच या विकासाचा गाभा सामाजिक न्यायाला धरून असेल असा आग्रह धरायला हवा आणि असा आग्रह गरिबांच्या संघटना उभारून दबाव आणला तरच स्थायी स्वरूपाचा ठरेल.

गेल्या काही वर्षांत पुणे जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त पुरंधर तालुक्यात नायगाव येथे आणि आणखी काही सभोवतालच्या गावात असा सामाजिक न्यायाला धरून पाणीवाटपाचा कार्यक्रम राबविण्याचा प्रयत्न चालू आहे. ग्राम गौरव प्रतिष्ठान या संस्थेने दुष्काळी भागातील एक प्रातिनिधिक स्वरूपाचे क्षेत्र निवडून ग्रामीण श्रम-शक्तीच्या आधाराने रोजगार हमीमुळे जी पाणी अड-विण्याची कामे पुरी झाली तिच्या पार्श्वभूमीवर कोरड-वाहू शेतकऱ्यांचे छोटे-छोटे समूहगट संघटित करून ग्रामपातळीवर "पाणी पंचायत" अशी संघटना उभा-रण्याची निश्चित प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रयोगात दुष्काळी भागात पडणारे पावसाचे पाणी अडवून गावातल्या प्रत्येक कुटुंबाला काही किमान गरजेच्या प्रमाणात पाण्याचे वाटप करावयाचे अशी मुख्य कल्पना आहे. अशा पाण्याच्या आधाराने स्वतःचे व कुटुंबाचे श्रमबळ वापरून शेती अधिक भरवशाची करता येते असा नायगाव प्रकल्पाचा मुख्य अनुभव आहे.

## सर्व समाजाची मालकी हवी

या लेखात नायगाव प्रकल्पाचा उल्लेख रोजगार-हमीच्या संदर्भात यासाठी केला आहे की, रोजगार हमी योजना आणि कायदा या दोन्हींच्या आधारे निव्वळ कामापोटी मिळणाऱ्या रोजंदारीवर समाधान न मानता त्याचबरोबर सार्वत्रिक श्रमशक्तीतून निर्माण होणाऱ्या पाण्याच्या साधनसंपत्तीवर **सर्व समाजाची मालकी** स्थापन करण्याचा आग्रह धरता येईल. यासाठी परत स्वयंसेवी संघटनांनी ग्रामीण मजुरांच्या जागृतीचे काम करताना हा दृष्टिकोन ठळकपणे डोळ्यापुढे ठेवला पाहिजे. यात सामाजिक न्यायाची मूलभूत कल्पना तर महत्त्वाची आहेच, पण त्याचबरोबर पाण्यावरची सार्व-त्रिक मालकी आणि तिचे समान वाटप यातून शेतीच्या आधारे स्वयंरोजगाराची निश्चित कल्पना निर्माण होईल. त्या प्रमाणात रोजगार हमी कामांवर कायमचे अवलंबून राहण्याची गरज कमी होत जाईल.

वरील चर्चेत अनुस्यूत असलेली समान पाणीवाटपाची आणि सामाजिक न्यायाची कल्पना सर्व गावसमुहाची जळणाची गरज आणि गावातल्या दुभत्या जनावरांच्या वैरणीसाठी चाऱ्याची गरज लक्षात घेण्यासाठी उपयोगी पडू शकेल. यासाठी सामाजिक वनीकरणाची कल्पना राबवून स्थानिक जनतेच्या मूलभूत गरजा भागवता येतील आणि रोजगार हमीच्या माध्यमांतून ग्रामीण रोजगाराची संधी वाढवता येईल. या स्थानिक गरजा भागवण्याची संधी नियोजनातून उपलब्ध करून देता आली तर गरिबांचा नियोजनातला सहभाग वाढवता येईल. तसेच जंगलसंपत्तीचे संरक्षण करण्याची जबाब-दारी वनखात्याकडून ग्रामपातळीवरच्या संघटित जनां-कडे सोपवता येईल. अन्यथा आज निर्माण झालेल्या वनसंपत्तीची नासधूस आणि त्याबरोबरचे बिकट प्रश्न यांना समाधानकारक उत्तरे शोधता येणार नाहीत.

लेखाच्या सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे रोजगार हमीचा आणखी एक अलगपणे विचार करता येईल. आधी म्हटल्याप्रमाणे बहुतांशी गरीब ग्रामीण मजुरवर्ग रोजगार हमीच्या कामावर गोळा होत असल्यामुळे गरिबांना

संघटीत करण्याचा ठोक कार्यक्रम म्हणून हा विचार करता येईल. यासाठी रोजगार हमीचा कायदा आणि त्यातील तरतूदी, विविध कामावर मिळणारी मजुरी आणि सवलती, मजुरीपोटी धान्याचे वाटप इत्यादी बाबींचा या संघटना कार्याच्या दृष्टीने विचार करता येईल. नवसाक्षरतेचे प्रयत्न, स्वस्त धान्य दुकानांची सुविधा, कुटुंबस्वास्थ्य आणि प्राथमिक औषधोपचार, किमान वेतनाचा हक्क आणि कायदा अशा विविध शक्यतांची तपासणी संघटना बळ वाढविण्यासाठी करता येईल. जाणीव जागृतीचे काम प्रामुख्याने करणाऱ्या स्वयंसेवी संघटनांच्या कार्यपद्धतीचा हा भाग होऊ शकेल का याचा विचार या संघटनांना करता येईल.

### सदोष मांडणी

रोजगार हमी योजनेचा आदिवासी भागामध्ये एक विशेष संदर्भ आहे. बहुतेक ठिकाणी आदिवासी उपयोजनेची मांडणी सदोष झाली असून ग्रामीण रोजगाराचा आधार धरून या उपयोजनेची क्षेत्र विकासाच्या दृष्टीने पुर्नमांडणी व्हायला हवी. डोंगरी भागात अधिक पावसाच्या आणि भातशेतीवर अवलंबून असलेल्या आदिवासी जनांना ग्रामीण रोजगाराची संधी स्थिर पायावर उभी करून देणे आजही जमलेले नाही. रोजगार हमी योजनेच्या सर्व दोषांचा विचार करूनही ही योजना थोड्याफार प्रमाणात दुष्काळी भागातील कोरडवाहू शेती करणाऱ्या ग्रामीण जनतेला फायद्याची आहे असे म्हणता येईल. परंतु आदिवासी भागात इतके माफक विधानही करणे अवघड आहे. आदिवासी भागात रोजगार सातत्याने पुरवता आला तर पावसाळ्यात खावटी कर्जाच्या माध्यमातून होणारे शोषण बऱ्याच अंशी कमी करता येईल. यासाठी रोजगार हमीतून मिळणाऱ्या वेतनापोटी रोजच्या गरजेच्या धान्य व इतर वस्तू मिळाल्या पाहिजेत. रोजगार मिळण्यात वर्षभर, निदना पावसानंतर, सातत्य राहिल्यास काही धान्य पावसाळ्यात मिळण्याची सोय करता येईल. आपण जशी बँकेत पैशाची बचत करून गरजेच्या वेळी तिचा वापर करतो त्याप्रमाणे ग्रामपातळीवर असा धान्यकोठा रोजगार हमीच्या वेतनापोटी निर्माण करता येईल. यासाठी परत मजुरीपोटी धान्य, मिरची, कांदा, गोडेतेल, कपडा अशा गरजेच्या वस्तु मिळण्याचा आग्रह धरावा लागेल. आज कायद्याप्रमाणे रोख मजुरी देण्याखेरीज इतर कोणत्याही संघटनात्मक तरतुदींना शासन बांधलेले नाही. ही चौकट बदलता येणे शक्य आहे पण त्याचा आग्रह धरावा लागेल.

या सर्व विवेचनात एक सूत्र अंतर्भूत आहे. रोजगार हमीवर येणाऱ्या मजुरांचे संघटन करणे ही मूलभूत आणि सार्वत्रिक गरज आहे. अशा प्रकारचे संघटना कौशल्य आणि बळ वाढविल्याशिवाय कोणताही लाभ गरीबांना मिळू शकणार नाही. हा सर्वमान्य अनुभव इतर सर्व योजनांप्रमाणेच रोजगार हमीलाही लागू आहे. फक्त येथे गरीबांचे संघटन करण्याची निश्चित शक्यता आणि परिस्थिती आहे. याचा फायदा कसा घ्यावयाचा हा विचार स्वयंसेवी संघटनांनी करण्यासारखा आहे.

**सेक्रेटरी**
**डेव्हलपमेंट ग्रुप**
**यशोधन, २०७१ विजयनगर, पुणे ४११०३०**



# ग्रामीण मजुरीचा दर काय असावा ?

## पागे समितीच्या पद्धतीत आवश्यक दुरुस्त्या व नवा दर

अभय बंग

शेतमजुरीचा किमान दर व रोजगार हमी योजनेतील (हमी योजना) मजुरीचा दर याविषयी पुर्नविचार करण्यासाठी नुकतीच महाराष्ट्र सरकारने पुन्हा श्री. पागे यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नियुक्ती केली आहे. भारत सरकार देशातील शेतमजुरीचा किमान दर ठरविणारा कायदा बनविण्याच्या विचारात आहे. या संदर्भामुळे या विषयावर जाहीर विचारमंथन होण्याला ही अत्यंत योग्य वेळ आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील जवळपास पाऊण कोटी स्त्री-पुरुष भूमिहीन मजूर व लहान शेतकरी यांच्या जिवाभावाचा हा प्रश्न आहे.

किमान मजुरी ठरवण्याचा आधार काय असावा ? या विषयावर अपार मतभिन्नता असण्याचा संभव आहे. अधिक विवाद टाळण्यासाठी आपण सध्या पागे समितीची मूळ पद्धत (१९७३) चौकट म्हणून मान्य करू व त्यांत असलेल्या चुका शास्त्रीय आधारावर दुरुस्त करू. कमी मजुरीचे शास्त्रीय गुपित या चुकांमध्ये दडलेले आहे.

### पागे समितीची पद्धति

समिती आपल्या अहवालात पान ११३वर म्हणते– "किमान मजुरीचा जीवनाविषयक खर्चाशी संबंध असला पाहिजे. अन्न, वस्त्र, निवारा, औषध व शिक्षण या किमान गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत.

हे तत्व मूलभूत म्हणून आपणही मान्य करू.

असला किमान जगण्याचा खर्च ठरविण्याची पागे समितीची पद्धती अशी :–

* "मजुरी प्रथम ज्वारीच्या रूपात ठरवावी व नंतर त्याचे रोखीमध्ये रूपांतर करावे. हे करतांना प्रथम दर्जाच्या ज्वारीचा रेशन दुकानातला विक्रीचा दर रूपांतरासाठी वापरावा."

* "श्रम करणाऱ्या पुरुषाची रोजची सरासरी गरज २००० ते २२०० कॅलरीज आहे. ६२५ ग्रॅम धान्याने ही गरज भागेल. सर्वसाधारण कुटुंब हे ३ युनिट्सचे मानून (पुरुष, त्याची पत्नी व ३ मुले) त्यांची गरज २१८७ ग्रॅम राहील. सरासरी कुटुंबाची ही धान्याची गरज झाली" (पान १०६).

* "सर्वसाधारणपणे कुटुंबाच्या एकंदर खर्चाच्या ४० ते ५० टक्के खर्च हा धान्यावर असतो. ४० टक्केच खर्च धान्यावर हा आधार धरून हिशोब केल्यास कुटुंबाचा एकूण खर्च ५४६८ ग्रॅम ज्वारी इतका येईल. आठवड्यातला एक दिवस सुट्टीचा धरावा लागेल. म्हणून गरीब श्रमिक कुटुंबाची दररोजची एकंदर आर्थिक आवश्यकता ६००० ते ६४०० ग्रॅम ज्वारी इतकी राहील. सर्वसाधारणपणे ही ६ किलो ज्वारी दोन व्यक्तींनी कमाई करावी.

* "पुरुष व स्त्रीला समान मजुरी असावी" अशा तऱ्हेने एका मजुराची मजुरी ३ किलो ज्वारी इतकी असावी. १९७४ मध्ये महाराष्ट्र सरकारने या शिफारसीवर आधारित दर रोख रूपात ठरविले. १९७८ मध्ये त्यात महागाईनुसार थोडासा सुधार केला. त्यानुसार झोन चार व रोजगार हमी योजनेमध्ये ४ रु., तीन – ४.५ रु., झोन दोन – ५ रु. कमाल ओलीताच्या शेतीच्या विभागाला झोन एक करून त्यासाठी ५.५ रु. अशी मजुरी ठरविली.

### पद्धतीतील चुका व आवश्यक सुधारणा

**१. मजुराची कॅलरीजची गरज :–** सर्वात मोठी घोडचूक ही की श्रमिक पुरुषाची कॅलरीजची आवश्यकता २००० ते २२०० कलरीज धरली आहे. वस्तुतः ती ३१०० आहे. समितीच्या अहवालात हा २२०० चा आकडा कुठून घेतला या विषयी काही उल्लेख नाही. पण प्रत्यक्ष चर्चेत श्री. पागे यांनी मला माहिती दिली की

हा आकडा ३ आधारावर आहे.

१. नॅशनल सँपल सर्व्हे २. वि. म. दांडेकरांनी मान्य केलेली २२५० कॅलरीजची दारिद्र्य रेषा. ३. आहार व पोषण तज्ज्ञांनी दिलेली माहिती.

आपण एकेकाचा विचार करू ...

(१) नॅशनल सँपल सर्व्हेद्वारा लोक किती धान्य विकत घेतात व खातात याची माहिती मिळते. भारतात ५० टक्के जनता दारिद्र्य रेषेखाली राहते. म्हणजे जिला पोटभर पुरेसे अन्नदेखील प्राप्त होऊ शकत नाही अशा स्थितीत लोक प्रत्यक्ष किती खातात या आकडेवारीला लोकांची अन्नाची खरी गरज किती ह्याच्या समकक्ष मानणे हास्यास्पद आहे.

(२) दांडेकर व रथ यांनी आपल्या 'भारतामध्ये दारिद्र्य' या प्रसिद्ध पुस्तकात २२५० कॅलरीज पुरेशी आहेत या विधानाला काहीच आधार दिलेला नाही. तसेच स्त्री, पुरुष, लहान मुले, वृद्ध, बैठे काम करणारे या सर्वांची सरासरी म्हणून दांडेकरांनी व नॅशनल सँपल सर्व्हेने दिलेला २२५० कॅलरींचा आकडा समितीने 'श्रमिक पुरुषाची गरज' म्हणून वापरण्याची चूक केली आहे.

(३) ज्या आहारतज्ज्ञांनी हा सल्ला दिला असे श्री. पागे म्हणतात ते मुंबईतील मधुमेह तज्ज्ञ आहेत. मधुमेहाने पीडीत रोग्यांना अर्थातच कमी आहाराचा वैद्यकीय सल्ला असतो. पण हाच आकडा त्या तज्ज्ञांनी किंवा समितीने श्रमिक मजुरांनाही लावलेला दिसतो.

एकूण निष्कर्ष हा की २२०० कॅलरीज हा आकडा श्रमिक मजुराला लागू पडत नाही.

इंडियन कौंसिल ऑफ मेडिकल रिसर्च (आय. सी. एम. आर.) ही वैद्यकीय संशोधनातील भारतातील सर्वोच्च अधिकृत संस्था. आय. सी. एम. आर. ने वेगवेगळ्या व्यवसायातील व्यक्तींच्या कॅलरींजच्या आवश्यकता ठरवल्या आहेत. वैद्यकीय क्षेत्रात सर्वत्र त्यांना मान्यता आहे. ही आकडेवारी वापरल्यास वरील सर्व अडचणी दूर होतात. शेतमजुरी व हमी योजनामधील मजुरी ही कामे 'कठीण परिश्रम' या अंतर्गत येतील, यासाठी पुरेसा शास्त्रीय पुरावा उपलब्ध आहे.

**२. लहान मुलांची कॅलरीजची गरज :–** समितीने केलेली दुसरी चूक ही की मुलांच्या गरजा मोजताना लहान मुलांची गरज सरासरीच्याही अर्धी मानली (खरे म्हणजे 'सरासरी' म्हटली की ती सर्वांना सारखी लागू करायला हवी.) शिवाय मुलांना वयस्क माणसापेक्षा अर्ध्या कॅलरीज पुरतात हाही समितीचा भ्रम आहे.

आय. सी. एम. आर. च्या आकड्यांमध्ये वेगवेगळ्या वयोगटांच्या कॅलरीजच्या आवश्यकताही नेमक्या दिलेल्या आहेत. या आधाराचा वापर करून ५ व्यक्तींच्या कुटुंबाच्या दररोजच्या कॅलरीजची नेमकी आवश्यकता ठरवता येईल.

(१) पुरुष ... कठीण परिश्रम ... ३९०० कॅलरीज
(२) स्त्री ... ,, ,, ... ३००० कॅलरीज

यात वेगवेगळ्या वयांच्या तीन मुलांच्या आवश्यकता जोडल्यास.

| | | | |
|---|---|---|---|
| (३) मुलगा – १३ वर्षे | गैरश्रमिक | ... २५०० | कॅलरीज |
| (४) मूल – ७ वर्षे | | ... १८०० | ,, |
| (५) मूल – ४ वर्षे | | ... १५०० | ,, |
| एकूण ५ सदस्य | | ... १२,७०० | कॅलरीज |
| सरासरी | | ... २,५४० | ,, |

मुलाचे वय यापेक्षा कमी धरल्यास अंगावरच पाजण्यामुळे स्त्रीच्या कॅलरीजच्या गरजा आणखी ७०० कॅलरीज प्रती दिवसाने वाढवाव्या लागतील. तसेच गरोदरपण व बाळंतपणाच्या कामावरच्या गैरहजरीसाठी मजुरीमध्ये सोय करावी लागेल. सध्या तो मुद्दा टाळण्यासाठी मुलांचे वय थोडे वरच्या बाजूला धरले आहे.

**(३) गरीब कुटुंबातील सदस्य संख्या :–** पागे समितीने मजूर कुटुंबातील सदस्यांची संख्या सरासरी ५ धरली आहे. ग्रामीण मजूर हा आर्थिकदृष्ट्या समाजातील खालच्या ५० टक्के वर्गामध्ये येतो असे मानल्यास या वर्गाची सरासरी कुटुंब सदस्यसंख्या ५ नसून ५.६ आहे.

**मजूर कुटुंबाची कॅलरीजची गरज :–** म्हणून ५.६ सदस्यांच्या कुटुंबाची दररोजची कॅलरीजची खरी गरज २५४० × ५.६ = १४२२४ कॅलरीज आहे. पागे समितीने केलेल्या हिशोबापेक्षा (२२०० × ३.५ = ७७०० कॅलरीज) हा आकडा कितीतरी मोठा आहे.

**(४) मजुरांच्या आहारातील अन्नाचे प्रकार :–**

१. धान्य व डाळ (स्टेपल फूड) हे पुरेशा प्रमाणात देणे भाग आहे.

२. इतर प्रकारचे अन्न (भाजी, साखर, तेल, दूध, इ.)

'इतर प्रकारचे अन्न' कमीत कमी असावे ? आय. सी. एम. आर. च्या संतुलित आहाराच्या याबाबतीत शिफारसी आर्थिकदृष्ट्या न झेपणाऱ्या म्हणून सध्या

पुरत्या बाजूला सारून आपण ग्रामीण, गरीब प्रत्यक्ष ज्या प्रमाणात या वस्तू आज खातो (प्रति व्यक्ती २०० कॅलरीज) त्याच प्रमाणात त्या धरू. म्हणून ५.६ व्यक्तींच्या कुटुंबात ११२० कॅलरीज या प्रकारच्या अन्नातून येतील. म्हणजेच उरलेल्या कॅलरीज (१३१०४) यांना ज्वारी व डाळी (स्टेपल फूड) यातून प्राप्त कराव्या लागतील.

(५) **स्टेपल फूड म्हणजे ज्वारी + डाळ** :– पागे समितीने "स्टेपल फूड"ची सर्व गरज ज्वारीनेच पूर्ण होईल असे मानले आहे. वस्तुस्थिती अशी नाही. बहुतेक प्रत्येक मजुर काही प्रमाणात डाळ खातो. तसेच आहाराच्या दृष्टीनेही निव्वळ ज्वारी खाल्ल्यास मजुरांना प्रोटीन्स व अमिनोअॅसिडसचे असंतुलन, पेलाग्रा यासारखे भयानक रोग होतील. डाळी प्रोटीन्सचा सर्वांत स्वस्त स्त्रोत म्हणून गरीबांसाठी काही प्रमाणात डाळीचा अंतर्भाव 'स्टेपल फूड'मध्ये करणे भाग आहे. आय. सी. एम. आर.च्या नुसार मजुराच्या वर दर्शविलेल्या कुटुंबास ४०० ग्रॅम डाळ आवश्यक आहे.

यानंतर उरलेल्या कॅलरीज ज्वारीतून मिळण्यासाठी ३३५० ग्रॅम ज्वारी लागेल. अशा प्रकारे मजुर कुटुंबाची 'स्टेपल फूड'ची ३.३५ किलो ज्वारी व ०.४ किलो डाळ इतकी आहे. हे मोजताना आपण कॅलरीज व डाळींच्या बाबतीतच आय. सी. एम. आर.च्या शिफारसी वापरल्या आहेत. आहारातील इतर पदार्थांच्या बाबतीत गरीबाची आजचीच वस्तुस्थिती स्वीकारली आहे.

६. **इतर खर्चाची सोय** :–धान्याव्यतिरिक्त इतर खर्च (६० टक्के) व आठवडी सुटी या धरून कुटुंबाचा एकूण खर्च समितीने ६.४ किलो काढला, पण त्याला उगाच ६ किलोवर पूर्ण आकडा केला. हेच प्रमाण व पद्धत वापरून पण स्टेपल फूडची एकूण खरी गरज ३.३५ किलो ज्वारी व ०.४ किलो डाळ घेऊन मजूर कुटुंबाचा रोजचा एकूण निर्वाह खर्च ९.८ किलो ज्वारी व १.७ किलो डाळ इतका येतो.

७. **ज्वारी पैशात रुपांतर** :–एकूण निर्वाह खर्च किंवा मजुरी ज्वारीच्या रूपात ठरवून मग त्याचे रोखीमध्ये रूपांतर करण्याच्या समितीच्या पद्धतीत दोन मोठ्या चुका आहेत.

(१) जेव्हा भाववाढ होते तेव्हा इतर आवश्यक वस्तूचे, (उदा. कपडा, तेल, केरोसीन, औषध, साखर इत्यादी औद्योगिक उत्पादन) भाव हे ज्वारीच्या तुलनेने अधिक झपाट्याने वाढतात. तसेच ज्वारीचे भाव सीझनप्रमाणे कमीजास्त होत राहतात. म्हणून ज्वारीचा भाव हा सदोष आधार वापरण्याऐवजी शासनाने ग्रामीण उपभोक्ता महागाई निर्देशांक हा आधार वापरावा.

(२) प्रथम प्रतीच्या ज्वारीचा रेशनच्या दुकानातील विक्रीचा दर नोव्हेंबर १९७३ मध्ये १.०३ रुपये किलो होता. तेव्हा समितीने ३ किलो ज्वारी म्हणजे ३ रु. असा मजुरीचा दर ठरविला व एप्रिल १९८१ मध्ये तो १.२५ रु होता. म्हणजे भाववाढ जवळपास २० टक्क्याने झाली. याच दरम्यान इतर जीवनावश्यक वस्तूंचे भाव कमीतकमी दुपटीने किंवा जास्त वाढले आहेत. त्यामुळे रेशनच्या विक्रीदराने ३ किलो ज्वारीची होणारी रोख मजुरी इतर महागाईच्या फार मागे पडली.

## मजुरांना न्याय द्यावयाचा असेल तर खालील पद्धत वापरावी.

(अ) प्रत्यक्ष खाण्यासाठी कुटुंबाला जितकी ज्वारी लागते (३.३५ कि.) ती रेशनच्या दुकानातून शासनाने पुरविल्यास तेवढ्या ज्वारीचे रेशनच्या विक्रीदराने रोखीमध्ये रूपांतर करावे. ३.३५० किलो × १.२५ रु. = ४.२० रु.

(ब) उरलेली (६.४५ कि.) ज्वारी ही जीवनाच्या इतर गरजा पुरविण्यासाठी आहे. म्हणून या ज्वारीचे रोखमध्ये रूपांतर करताना महागाई निर्देशांकाचा किंवा ज्वारीचा खुल्या बाजारातील चिल्लर विक्रीचा चालू दर हिशोबात वापरावा. आज खेड्यामध्ये ज्वारी पावणेदोन ते दोन रु. किलो भावाने विकत मिळते. ६.४५ × १.७५ = ११.३० रु.

(क) डाळीचे (१.१७ कि.) रूपांतर खुल्या बाजार भावाने करावे. कारण ती कंट्रोल दराने उपलब्ध नसते. १.१७ किलो × ५ रु. = ५.८५ रु.

**कुटुंबाचा एकूण निर्वाह खर्च व मजुरी** :–याप्रमाणे कुटुंबाचा एकूण निर्वाह खर्च दिवसाला ४.२० + ११.३० + ५.८५ = २१.३५ रु. होतो. ही मजुरी एका जोडप्याने करावयाची आहे. पुरुष व स्त्रीला समान मजुरी दिल्यास १०.७० रु. रोज द्यावा.

जर शासनाने ३.३५ किलो ज्वारी रेशन दुकानातून १.२५ पैसे भावाने नियमित दिली नाही (असे अनेकदा होते) तर या ३.३५ किलोचे रूपांतर १.२५ रु.

ऐवजी १.७५ रु. भावाने रोखीमध्ये करावे.

**मजुरांचा निर्वाह खर्च म्हणजे श्रमाचा उत्पादन खर्च** :—याप्रमाणे २१.३५ रु. हा मजूर कुटुंबाचा किमान निर्वाह खर्च आहे. दुसऱ्या शब्दात हा एका जोडप्याला त्याचे एका दिवसाचे श्रम निर्माण करण्यासाठी लागणारा उत्पादन खर्च आहे. मजूर नावाचे मशिन चालवायला एवढा उत्पादन खर्च येतो.

**न्याय्य दर** :— अनेकांना हा आकडा (१०·७० रु.) बराच जास्त वाटेल, कारण आजपर्यंत आपण फार कमी, अन्यायी अशा ४ रु. च्या आकड्याला रुळलो आहोत. हे मजुरीचे दर योग्य की अयोग्य याबद्दल विचार करताना २ गोष्टी लक्षात ठेवाव्या.

१. २१·३५ रु. रोज × २६ दिवस महिन्यातून कामाचे = ५५६ रु. महिना मजुरी ५–६ व्यक्तींच्या कुटुंबाला मिळेल. आपल्या राष्ट्रीय प्रति व्यक्ती सरासरी उत्पन्नाच्या आत हे प्रमाण असल्याने आजच्या राष्ट्रीय आर्थिक स्थितीमध्ये हा निर्वाह खर्च व मजुरी देणे संभव आहे. पण त्यासाठी इतर काहींचे भरमसाठ उत्पन्न छाटावे लागेल. शेवटी हा राजकीय इच्छा शक्तीचा प्रश्न आहे. किमान मजुरी किंवा हमी योजना या शासनाने मजुरांवर दया दाखवून मर्जीनुसार केलेल्या खैराती किंवा दानधर्म नाही. मजुराला या द्वारे किमान निर्वाह वेतन मिळावे हा मजुराचा कायदेशीर अधिकार आहे व शासनाची वैधानिक जबाबदारी व प्रतिज्ञा आहे.

**व्यावहारिक उपाय** :— या नव्या दरांना अधिक तर्कसंगत व व्यवहार्य बनवण्याच्यादृष्टीने माझ्या दोन सूचना आहेत.

(१) वरील दराने शेतमजुरी देणे शेतकऱ्यास आज कठीण जाऊ शकते. पण त्यावर उपाय ही मजुरी कमी करणे हा नाही कारण ती " किमान " गरज आहे. तर हा मजुरीचा दर आपल्या उत्पादन खर्चात धरून शेतकऱ्याने कृषिमालाचा भाव मागावा.

(२) शेती व हमी योजनेमध्ये रोजंदारी प्रमाणे (दिवसाला ठरलेली मजुरी) लावलेले काही मजुर प्रामाणिकपणे ८ तास श्रम न करताही हा नवा दर (ज्यात ८ तास कठीण परिश्रम अनुस्यूत आहे) प्राप्त करण्याचा प्रयत्न करतील. यावर उपाय हा की रोजंदारीचा दर कठीण परिश्रमाऐवजी मध्यम परिश्रम करणाऱ्याच्या कॅलरीज गरजेनुसार ठेवावा. वरील पद्धत वापरून गणित केल्यास तो ८.९० रु. येतो व कामाप्रमाणे दाम या पद्धतीने करण्यात येणाऱ्या कामाचे किंवा शेतींतील कठीण कामाचे दर असे ठरवावे की ७ तास कठीण व प्रामाणिक परिश्रम करणाऱ्या मजूर जोडप्याला २१.३५ रु. सुटावे. या पद्धतीने योग्य मजुरी प्राप्त करण्यासाठी प्रामाणिक परिश्रम करण्याची जबाबदारी व बंधन मजुरावर येईल.

---

# अपूर्ण कविता

रात्री अेकांतात कविता लिहिताना
दारूच्या नशेत माझा बाप घुसतो घरात
उमरखय्याम जसा मयखान्यात.
वैतागलेली आअी :
: आई दिवसेंदिवस वैतागलेलीच दिसते
उगवणाऱ्या हरेक दिवसरात्रींवर
नेहमीच्याच.
शिव्यागाळचा. मारामारी. आरडाओरड.
ऊदासीनता.
मी रेडिओचा आवाज खूपच वाढवतो.
' लैला ओ लैला 'च्या तालावर क्षणभर
झिनत अमान
नाचताना तरळते नजरेसमोर.
मी बधिर.
बरं वाटतं आपलं घटकाभर.
कविता अजून अपूर्णच आहे.

**भगवान निळे**
वरळी, मुंबई ४०० ०१८.

# रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या प्रशिक्षित मजुराचे अनुभव

भिमसिंग गिरासे

गेल्या अनेक वर्षापासून ठाणे जिल्ह्यातील गरीब शेतकरी, शेतमजुराच्या प्रश्नासाठी भूमिसेना लढा देत आहे त्याचप्रमाणे सरकारच्या काही विकासाच्या योजना राबविण्यासाठीही धडपड करीत आहे.

इतर राज्यापेक्षा महाराष्ट्र राज्य सरकारचे वैशिष्टय आणि गौरवशाली भूषण म्हणजे रोजगार हमी योजना. ही योजना गरीबाच्या आणि खऱ्या गरजू लोकांच्या हितासाठी आम्ही राबवित असतो. भूमिसेनेच्या अनेक कार्यक्रमापैकी रोजगार हमी योजना हा आम्ही महत्त्वाचा कार्यक्रम मानतो. त्यासाठी या योजनेवर काम करणाऱ्या मजुरांना आम्ही संघटित करीत असतो व योजनेवर वेगवेगळ्या थरातील, जातीतील मजूर कामावर असतात. त्यांच्या सामाजिक जाणीवा वाढवून जाती जातींमधील उच्चनिचता हा भेद नष्ट करण्याचे कामही आम्ही करीत असतो.

आमच्या कार्यक्षेत्रात रस्त्याची, पाझर तलाव, गाव तलाव, मृदूसंधारण, खडीची इ० कामे रोजगार हमी-खाली घेतली जातात. तसेच वनखात्यामार्फतही अनेक कामे रोजगार हमीतर्फे असतात. परंतु दरवर्षी फार थोडी कामे शेवटपर्यंत व्यवस्थित चालू असतात. एकूण योजनेखाली काम मागणाऱ्या मजूरांपैकी फक्त २५% लोकांनासुद्धा सलग ३ महिने रोजगार पुरविला जात नाही. म्हणून योजना, प्रत्यक्ष कायदा चांगला असूनही मागेल त्याला काम दिलेच जाते असे नाही हेच खरे दु:ख ! एकतर ठाणे जिल्ह्यात भरपूर पाऊस त्यामुळे संपूर्ण ६ महिने ही कामे बंदच. नंतरच्या ६ महिन्यात जास्तच मागणी आणि खूपच दबाव आणला तर मग एक दोन कामे चालू केली जातात. गेल्या तीन वर्षापासून आम्ही या योजनेत संपूर्ण लक्ष घालून काम करीत आहोत.

प्रथम बेरोजगार लोकांच्या नावाची यादी तयार करून त्यांची ग्रामसेवक/तलाठी यांच्याकडे नावे नोंदवून नोंदणीची कार्डे घेतली. आम्ही एकूण ५००० च्यावर लोकांची कामासाठी नोंदणी केली आहे. त्यानंतर भाताचा हंगाम संपल्यावर सधन शेतकऱ्यांकडे शेती-वरची कामे नसतात त्यावेळी मोठ्या संख्येने लोकांची कामासाठी मागणी येते. तेव्हा आम्ही गावागावातील लोकांच्या सह्यांनी तहसीलदाराकडे कामाच्या मागणीसाठी अर्ज पाठवितो. त्याची १५ दिवस वाट पाहतो. त्यांच्याकडून उत्तर आले नाहीतर संबंधीत अधिकाऱ्याकडे चौकशी करतो. जास्त लोकांची मागणी असेल, अर्ज विनंती करून काम मिळत नसेल तर लोकांच्याकडून संघटीतपणे दबाव आणून काम मिळवून घेतो.

## सारखीच मजुरी

अशा प्रकारे सुरवातीस काम मिळवून घेतल्यानंतर प्रत्यक्ष कामावर लावल्यानंतर मजुरांना किती मजुरी मिळते, वेळेवर पगार होतो की नाही, मस्टरवरची हजेरी चेक करणे अशा प्रकारच्या कामाकडे लक्ष द्यावे लागते. एवढे असूनही ज्यावेळी आम्ही अशा कामावर फिरतो तेव्हा आम्हाला बऱ्याच ठिकाणी सारखीच मजुरी दिली जाते असे आढळून आले. मजुरांना विचारले, तुम्हाला काय मजुरी मिळते ? तेव्हा मजुराकडून रु. ३—०० (प्रत्येक दिवसाला) असेच उत्तर मिळते. तुम्हाला दर काय विचारल्यावर मजुराचे सरळ उत्तर तीन रुपये. जे लोक कामाला जात नसत त्यांना कामाला का नाही जात असे विचारल्यावर ते लगेच उत्तर देत की त्या ठिकाणी फक्त रु. ३—०० मजुरी मिळते. तेव्हा आमच्या लक्षात आले की रोजगार हमी योजनेच्या कायद्यात असे नाही. कारण प्रत्येक कामाला वेगवेगळे दर ठरविले आहेत त्याप्रमाणे काम केले तर त्याचे मोजमाप करून ठरवून दिलेल्या दराप्रमाणेच मजुरी दिली जाते. असे असताना सर्व मजुरांना मजुरी

तीन रुपयेच का मिळावी ? त्यासाठी आम्ही रोजगार हमी योजनेचे कौन्सिल सदस्य डॉ. मधुसूदन साठे यांची मदत घेऊन कार्यकर्त्यांना रोजगार हमी योजना समजावून देण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली.

अशा तऱ्हेने आम्ही प्रथम २५ ते ३० निवडक कार्यकर्ते घेऊन तीन दिवसांचे प्रशिक्षण शिबर आयोजित केले. त्यासाठी डॉ. साठे तीन दिवस त्या शिबीरात आले होते. त्यांनी संबंधीत खात्याचे अधिकारी बोलावून प्रत्येकाने वेगवेगळ्या (रस्त्याची, खडी, पाझरतलाव, वनखाते) कामाची माहिती, त्याचे दर, मोजमाप कसे घेतात, सवलती काय असतात याची माहिती करून दिली. कार्यकर्त्यांच्या मनात असलेल्या शंकाचे निरसन करून ही योजना कशी आहे हे समजावून घेण्यासाठी आम्ही आलेल्या अधिकाऱ्यांना पुन्हा पुन्हा योजनेचा हेतू काय हे समजावून देण्यास सांगितले. त्याचप्रमाणे केलेल्या कामाचे मोजमाप कसे केले जाते, खड्डयाचे माप कसे घेतात, मातीचा ढीग असला तर त्याचे माप कसे घेतात ह्याची सर्व माहिती करून घेतली. योजनेच्या सवलती काय असतात, हत्यारे कुणाची असावीत, स्वतःची हत्यारे असतील तर त्यासाठी वेगळे भाडे दिले जाते का, हजेरी कशी ठेवतात, आठवडयाचे एकूण पगार, त्यांच्यातून प्रत्येक दिवसाला काय मजुरी पडते याची उदाहरणे सोडविली. तसेच वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या खात्यात लाकूड कटाई, जंगल साफ करणे, खड्डे खोदणे यासाठी काय काय दर असतात याची माहिती दिली.

अशा प्रकारे आम्ही निवडक लोकांनी याचे शिक्षण घेतल्यानंतर आम्ही प्रत्येक रोजगारहमी योजनेवर काम करणाऱ्या (निवडक) मजुराचे प्रशिक्षण करण्याचे आम्हीं ठरविले. प्रत्येक विभागातील ४० मजुरांना एकत्र करून त्यांचे तीन दिवस प्रशिक्षण केले.

## ग्यानबाची मेख

वरीलप्रमाणे प्रशिक्षण घेतलेले लोक आपापल्या गावी परत गेल्यावर त्याच्यातील बरेच लोक रोजगार-हमीच्या कामावर लागले. प्रशिक्षित मजुराच्या बाबतीतील अनुभव म्हणजे वसरा येथील पाझर तलावाचे काम. या कामावर एकूण १० मजुरांनी प्रशिक्षण घेतलेले होते. हे काम गेल्या तीन वर्षांपासून चालू आहे. प्रथम या कामावर तीन रुपयेच मजुरी मिळत होती. एकूण ३०० पासून ५०० पर्यंत मजूर काम करीत असत, परंतु कोणी कोठेही काम करावे, मजुरी मात्र दिवसाला तीनच. परंतु प्रशिक्षण घेतलेल्या १० मजुरांनी सर्व योजना मजुरांना समजावून सांगितली. तेव्हा पहिल्याच मस्टरला प्रत्येक गँगला ४ रु. पासून ते ७ रु. पर्यंत मजुरीचा दर पडल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढला. मोठ्या उत्साहाने प्रत्येक गट कामाला लागला. मग नंतर प्रत्येक गट रु. ५=०० च्या पुढे मजुरी मिळवू लागला. काही काही वेळेस काही गटांनी रु. १२-०० पर्यंत मजुरी घेतली.

प्रत्येक मजूर आपल्या गटाची हजेरी ठेवीत, आपल्या कामाचा हिशेब ठेवीत. त्यामुळे त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारच्या भ्रष्टाचारास वाव मिळत नसे. अशा प्रकारे रोजगार-हमी योजनेचे प्रशिक्षण घेतल्यावर मजूर स्वतःहूनच काम मिळवून घेण्यासाठी प्रयत्न करतो. त्याला मग योजनेविषयी प्रेम वाटू लागते. परंतु हे काम करण्यासाठी योजना राबविणाऱ्या कुठल्याही यंत्रणेला हे सगळे करण्यात रस नसतो. त्यामुळे मजुरनां योजनेविषयी अनास्था वाटू लागते. मग अशा प्रकारच्या काही चांगल्या योजना आपोआप बंद पडू लागतात. तेव्हा सरकार किंवा संबंधित अधिकारीवर्ग मजुरांनाच योजनेमध्ये रस नाही असा आरडाओरडा करतात.


**जोपर्यंत त्या योजनेविषयी संपूर्ण माहिती लोकांना मिळत नाही तोपर्यंत लोक ती योजना आपली आहे, आपल्यासाठी आहे असे मानित नाही. परंतु तिच्यातील सर्व अर्थ जर लोकांना समजावून दिला, त्यासाठी लोकांना उद्युक्त केले तर लोक नक्की ती योजना स्वतः राबविण्यासाठी पुढे येतात.**

अशा प्रकारचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात व्हावेत, जास्तीत जास्त लोकांना योजनेचे प्रशिक्षण द्यावे आणि हे काम विशेषतः सरकारने घ्यावे. कारण या योजनेतून मिळणारे धान्य ज्यावेळी सरकारने बंद केले तेव्हासुद्धा मजुरांमध्ये मोठ्या प्रमाणावर निराशा निर्माण झाली होती. कारण रोजगार हमीतून मिळणारे धान्य हाच मोठा आधार लोकांना वाटतो.

तरी ही योजना सरकारने मोठ्या प्रमाणात राबवून तिच्यातून उत्पादक कामे हाती घ्यावीत, त्यासाठी मजुरांचे प्रशिक्षण करावे. म्हणजे लोकच ही योजना राबवतील अशी आमच्या अनुभवावरून खात्री वाटते.

# रोजगार हमी योजना आणि मजूर स्त्रिया

मंगल खिंवसरा



२८ मार्च १९७२ रोजी महाराष्ट्र शासनाने रोजगार हमी योजना मर्यादित अर्थाने राबविण्याचा निर्णय घेतला. ग्रामीण भागांतील बेकारी व गरिबी हटविणे ह्या या योजनेमागील हेतू होता. मर्यादित अर्थाने का होईना पण ही योजना अंमलात येऊ लागली आणि या कामावर मजूरबायांचे घोळकेच्या घोळके दिसू लागले. २० सप्टेंबर १९७४ पासून रोजगार हमी योजनेची अधिकृत घोषणा झाली.

८०% भारतीय समाज खेडयात रहातो आणि त्यात निम्मी संख्या स्त्रियांची. कमालीचे दारिद्र्य. शाळा पोहोचल्या आहेत पण लेकरं नाहीत — लेकरं आहेत तर शिक्षक नाहीत अशी शिक्षणाची दैना ! या गरिबीत स्त्रियांच्या दु:खाची कल्पनाच करवत नाही.

भारतीय हिंदु संस्कृतीने स्त्रियांना गुलामीत ठेवलंय. घरातील स्वयंपाक, लेकराबाळांची कामं, जनावरांची देखभाल, दोन-दोन मैलावरनं दळण आणायचं, पाणी शेंदायचं, सकाळी ९ च्या दरम्यान डोक्यावर फावडं — घमेलं आणि कमरेवर लेकरू घेऊन कामावर जायचं.

गावात वर्षाची जत्रा सोडल्यास बाया (जत्रेतसुद्धा ठराविक वेळीच) कधी एकत्र येत नाहीत. आपल्या सुख–दु:खावर विचार करीत नाहीत. गावची चावडी ही दिवस मावळतीला आला आणि पुरुष घरी आले, की त्यांना विश्रांती घेण्यासाठी असते. पण बायांसाठी अशी एखादी जागा नाही. परपुरुषासंगं बोलायचं नाही — भर गावातून, सर्वांसमोरून जायचं नाही—अशा कितीतरी कल्पना रूढ केलेल्या.

पाटील — देशमुख जाती व्यवस्थेतील वरचे. त्यामुळे त्याच्या स्त्रियांचे दु:ख ही वरच्याच पातळीवरचे. गोशा पद्धती. कुणाशी बोलायचे नाही—शेजारीपाजारी जायचं नाही — बोलायचंच झालं तर गोशातूनच बोलायचं—लग्न करताना मुलीसोबत हुंडा पण द्यायचा मोठ्या रकमेचा.

दलित जातीतील स्त्रियांच्या दु:खाला तर सीमाच नाही. गावात सार्वजनिक विहिरीवर पाणी भरले, गावकीची कामे सोडली किंवा मंदिरात प्रवेश केला तर दलित जातींवर सामाजिक बहिष्कार पडतो. आर्थिक कोंडी केली जाते. स्त्रियांवर सामूहिक बलात्कार केले जातात. नग्न धिंड काढली जाते.

गरोदर राहून ८–८ महिने होईपर्यंत बाईला दवाखाना माहीत नसतो. बाळंतपणाच्या कळा येऊ लागल्यावर डोली, बैलगाडी बघितली जाते आणि मग ८–१० मैलावरच्या दवाखान्यात तिला नेले जाते. बऱ्याच गावात तर अजूनही गावातल्या गावातच बाळंतपण केले जाते. यातील काही सामाजिक पाश रोजगार हमी योजना अंमलात येताच थोडे ढिले होऊ लागले. प्रथमच गावातून बाया घोळक्याने सकाळ-संध्याकाळ ये–जा करू लागल्या. सोबत पुरुषही असतात. कामावर निघताना बाया एकमेकींना हाका मारू लागल्या. आपल्या सारखीच दु:खी, कष्टी माणसं या दुनियेत असतात याची तिला जाणीव होऊ लागली.

रोजगार हमीच्या कामावर सर्व जाती-धर्मांच्या बाया एकत्र ऊठ बैस करू लागल्या. रोज त्यांची गांठ-भेट होऊ लागली. वेळप्रसंगी एकाच गँगमध्ये सर्व जातीधर्मांच्या बाया येऊ लागल्या.

घरच्या आर्थिक व्यवहारात बाईचाही निम्म्याने हिस्सा येऊ लागला याची स्त्री आणि पुरुष दोघांनाही जाण आली.

## स्वतंत्र अस्तित्वाची जाण

खाजगी शेतावर मजूर म्हणून काम करताना शेत-मालकाशी सर्व देवघेव मजूर स्त्रियासंबंधित पुरुष

(बाप, नवरा, भाऊ) करीत असतो. म्हणजे घरातील पुरुषाची दासी या स्वरूपात तो शेतमालकाशी व्यवहार करीत असतो. तिची मजुरीसुद्धा पुरुषच घेतो. पण ज्यावेळी रोजगार हमीच्या कामावर स्त्री जाऊ लागली तेव्हा तिला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले. ती एक मजूर म्हणून तेथे साईटवर वावरू लागली; परिणामी ती सरकारी अधिकाऱ्यांकडून आपल्या कष्टाचा मोबदला – मजुरी हक्काने, ताठ मानेने घेऊ लागली. बाप, भाऊ, नवरा हे 'मध्यस्थ' या आर्थिक व्यवहारातून प्रथमच हटले.

खाजगी शेतावर काम करीत असताना स्त्रिला १.२५ रु. ते १.५० रु. पर्यंत रोज पडतो तर पुरुषाला २ ते २.५० रु. मिळतात. ही असमान मजुरी या रोजगार हमी योजनेवर नसते. स्त्री-पुरुषाला समान वेतन येथे मिळते. खाजगी शेतमालकांना स्त्रियांच्या या कमी मजुरीविषयी विचारताच त्यांचे ठरलेले उत्तर असते – 'बाया कमी काम करतात, त्यांना निंदणी, खुरपणीची साधी कमी कष्टाची कामं दिलेली असतात.'

स्त्रिया कमी काम करतात हा समज रोजगार हमीच्या कामावर जाऊन स्त्रियांनी साफ खोटा पाडलाय. स्त्रियाही पुरुषाच्या बरोबरीने खणतीचे (खोदकाम) काम करू शकतात याची अनेक उदाहरणे पहायला मिळतात.

परिणामी शेतीच्या काळात खाजगी शेतमालकांना कमी मजुरीत स्त्रिया राबायला मिळत नाहीत आणि स्त्रियाही या शेतावर जायला तयार नसतात. त्यामुळे शेतीच्या काळात रोजगार हमीची कामे चालू ठेवा अन्यथा किमान आणि समान वेतन कायद्यांची खाजगी शेतांवर अंमलबजावणी करा अशी मागणी मजूर करताना दिसतात. यात स्त्री-मजूर आघाडीवर रहाताना दिसतात. कारण त्यांना या दोन्ही कायद्यांसाठी झगडायचे आहे.

प्रथमदर्शनी पटो वा न पटो पण घरात बाईच्या मजुरीची आपल्या एवढीच मदत होत आहे; त्यामुळे तरी पुरुष मजूर समान वेतनाचा पाठ पुरावा करताना दिसतोय.

## पर्यायी उत्पन्नाचे साधन

सर्वात मोठी हमी मिळालीय ती दलित जातीतील स्त्रियांना. वर सांगितलेली परिस्थिती दलित जातींच्या बाबतीत निर्माण होताच त्यांना पर्यायी उत्पन्नाचे साधन म्हणून रोजगार हमी योजना अत्यंत महत्त्वाची ठरू पहातेय. (अर्थात शेवटी तेथील जातीयवाद, राजकीय दबाव ही योजना दलित जातींच्या पदरात पडू न देण्याचा बऱ्याच वेळा यशस्वी प्रयत्न करताना दिसतात). आर्थिक कोंडी काही प्रमाणात फुटताना दिसतेय.

निमसरंजामशाहीत गावच्या मालकाच्या भोवती दलित – कष्टकरी स्त्री-पुरुषांना रोजगारहमी खऱ्या अर्थाने मिळाली तर या स्त्री-पुरुषांना स्वतंत्र आर्थिक पाया मिळतो. मालकापासून ते दूर जातात. निमसरंजामशाहीच्या नाड्या काही प्रमाणात तुटताना दिसतात.

## चांगल्या वाईटाची जाण

परिणामी स्त्रीचा आत्मविश्वास वाढू लागला. ती पूर्वीपेक्षा अधिक बोलू लागली. साईटवर अधिकाऱ्याशी धिटाईने बोलू लागलीय. हे परपुरुषाशी बोलणं वा 'साहेबां'शी बोलणं त्या मजुर पुरुषाला अजिबात पटत नसते. पण आपल्याच घरातील आपली बायको, आई, बहिण आपल्याच कामाच्या बाबत न्याय्य आणि सत्य बाजू मांडताना पाहाताच तो पुरुष गप्प बसतोय. स्त्रीला डोकं असतं आणि ती स्वतंत्रपणे चांगलं-वाईट ठरवून स्वतःचे विचार मांडू शकते हे नकळत त्याला मानावं लागतं.

गावात पगार वाटप होताना मजूरबाया एकत्र भरगावात वावरू लागल्या. दोन-तीन घंटे एकत्र बसू लागल्या. गावच्या वर्षाच्या जत्रेपेक्षा अन्य दिवशी बाया आता इतका वेळ एकत्र येऊ लागल्या.

आपल्या कामाचा योग्य मोबदला मिळतो की नाही याविषयी साक्षर अगर निरक्षर बाया विचार करू लागल्या. साक्षर बाईला प्रथमच आपल्या लहान वयात शिकलेल्या आकड्यांची आठवण होऊ लागली ! तिला मनापासून आनंद होऊ लागला.

सरकारी कामात राबताना एक प्रकारची शिस्त बायांमध्ये येऊ लागली. वेळेविषयी जाण, जेवणाची सुट्टी, आठवड्याची सुट्टी इ. इ.

सरकारी नोकरांची (ओव्हरसीअर, मस्टर कारकून इ.) बायांना जवळून ओळख पटली. परिणामी सरकार आणि त्या सरकारचे नोकर याविषयी बायांमध्ये उघडपणे चर्चा झडू लागल्या.

सामाजिक आणि आर्थिक बाबीत रोजगार हमी योजनेने हे जे थोडेफार बदल घडवून आणले आहेत; त्याचप्रमाणे स्त्रीवर अधिक भारही पडू लागलाय.

रोजगार हमीच्या कामावर ठराविक वेळेतच पोहोचणे — तत्पूर्वी घरची उपनिर्दीष्ट कामं उरकायची — शेतीवरच्या कामाच्या तुलनेत येथील काम हे अधिक कष्टाचे — परिणामी स्त्रीला प्रचंड प्रमाणात शारिरीक कष्ट करावे लागतात. लेकुरवाळी स्त्री असेल तर भर उन्हात लेकराला सोडून काम करायचे — त्याला अधून मधून पाजायचे — त्यात 'साहेब' शिव्या घालील म्हणून जीवाची सारखी घालमेल चाललेली. त्यामुळे मानसिक ताणही खूप पडत असतो.

विधवा स्त्री किंवा एकटी स्त्री असल्यास एखाद्या गॅंगमध्ये फार कमी वेळा तिला सामावून घेतले जाते. स्त्री-पुरुष अशा जोडचाच गॅंगमध्ये प्रामुख्याने आढळतात. त्यामुळे अशा एकल्या बायांना पुरुषांच्या हातापाया पडावे लागते कामासाठी.

स्त्रीचे समाजातील मानलेले कमीपणाचे स्थान रोजगाहमीच्या कामावरही त्याचे दृश्यस्वरूप पहायला मिळते. २०—२५ मजुरामागे एक गॅंगमन असतो. मजुरांना अडचणीच्या काळात मदतनीस म्हणून काम करीत असतो. केव्हा केव्हा तोही राबतो. त्याला थोडं फार लिहिता वाचता येणं अपेक्षित असतं. कारण कामाचं मोजमाप घेताना ओव्हरसीअरसोबत गॅंगमन असतो. सर्वत्र या ठिकाणी पुरुषच गॅंगमन झालेले आढळून येतात. त्या गॅंगमध्ये एखादी शिकलेली हुशार स्त्री असली तरी आंगठेबहाद्दर पुरुष तेथे गॅंगमन होतो. कारण बाईच्या हाताखाली आपण पुरुषांनी काम करणे कसे चालेल ?

मात्र वौरगांव( ता. वैजापूर) येथे गॅंगवुमन (महिला) नेमण्याचा प्रयत्न येथील युक्रांत-लोकसमितीने केला आणि तो यशस्वीही झाला.

हणमंतगाव येथील मजूर कार्यकर्त्यांनी विधवा स्त्रियांना लेकरं सांभाळायला रोजगारहमीवर लावायला भाग पाडले अधिकाऱ्यांना. त्यांच्या रोजगाराचा तात्पुरता प्रश्न सोडविला.

**नव्या शक्तीचा उदय**

असंघटित असा हा स्त्रियांचा वर्ग संघटित म्हणून गावात वावरू लागताच त्यांना राजकीय जाणही येऊ लागलीय. त्यांना संघटित ताकदीचा आत्मविश्वास येऊ लागलाय. अधिकाऱ्यांना घेराव, तहसीलवर मोर्चे, गावात सभांना येणे, शेतमजूर स्त्रियांचे मेळावे-परिषद होऊ लागल्या आहेत. तुरुंगातही स्त्रिया जाण्याचा प्रयत्न करताहेत. तुरुंगाविषयीची भिती जाऊ लागलीय.

गावच्या ग्रामपंचायत निवडणुकीवर याचा निश्चितच परिणाम होणार आहे. राजकीय क्षेत्रात लढाऊ ग्रामीण स्त्रियांची शक्ती उदयाला आलेली दिसेल.

२६ जानेवारी १९७९ रोजी 'रोजगार हमी कायदा' अंमलात आल्याची घोषणा करण्यात आल्याने स्त्री-मजुरांना एक कायदेशीर आधार प्राप्त झाला आहे.

नजिकच्या काळात याच ग्रामीण लढाऊ स्त्रीया आपल्याला संघटित शक्तीच्या जोरावर आपल्या हक्कासाठी झगडताना दिसतील. औद्योगिक स्त्री-कामगारांसारख्या 'मजूर कायद्यां'च्या प्रस्थापनेसाठी लढे करताना याच रोजगा हमी योजनेवरील स्त्रिया दिसतील.

●

## वर्गणीदारांना आवाहन

दलित-आदिवासींच्या प्रश्नामध्ये आपल्याला आस्था आहे. 'परिषद' व 'हाकारा'चे वर्गणीदार होऊन आपण या सामाजिक 'हाकाऱ्या'त सहभागीहि झाला आहात. आपला सक्रीय सहभाग कायम राहील याची खात्री आहे.

हाकाराची १९८२ सालची वर्गणी रुपये पंधरा अथवा हाकारा व परिषदेची संयुक्त वार्षिक वर्गणी रुपये वीस कृपया पुढील पत्त्यावर पाठवावी.

महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषद,

द्वारा जगदीश गोडबोले, सीमा—ब ७, शिरोळे मार्ग, पुणे ४११००४

संपादक

# रोजगार हमी योजनेचा आढावा व काही शिफारशी

निकीभाऊ कार्डोझो

राज्यातील रोजगाराच्या शाश्वतीला महाराष्ट्र सरकारने १९७७ च्या रोजगार हमी कायद्यान्वये कायदेशीर आधार दिला आहे. हा कायदा २६ जानेवारी १९८० पासून लागू करण्यात आला. या कायद्यान्वये ग्रामीण भागातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीला शारीरिक श्रमाचे अकुशल काम मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.

श्रम करण्याची तयारी असून काम मिळू शकत नाही अशा ग्रामीण भागातील अकुशल प्रौढ व्यक्तीला शासनाने आधी मान्य केलेल्या कामावर उत्पादन (अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने) व किफायतशीर (त्या व्यक्तीच्या दृष्टीने) रोजगार उपलब्ध करून देणे हे या रोजगार हमी योजनेचे उद्दीष्ट आहे. रोजगाराची ही हमी केवळ अकुशल शारीरिक श्रमाच्या कामाचीच आहे. तसेच या योजनेत सहभागी होणाऱ्या व्यक्तीला कामाचे स्वरूप वा ठिकाण याविषयी निवड करता येत नाही.

ठाणे जिल्ह्यांतर्गत डहाणू व तळासरी विभागात मार्च १९८० पर्यंतच्या एक वर्षाच्या अवधीत रोजगार हमी योजनेखाली सुरू केलेल्या कामाचे कष्टकरी संघटनेने जवळून व लक्षपूर्वक निरीक्षण केले. या कायद्याचा अभ्यास केला, या योजनेसंबंधीचे काही सरकारी ठरावही पाहिले. रोजगार हमी योजनेखालील काही कामाचे मूल्यमापनही केले. रोजगार हमी योजनेखालील कामांची व्याप्ती वाढविणे शक्य आहे व ती तशी वाढविली पाहिजे अशी धारणा असल्यामुळे त्या संदर्भात काही कामाचे परीक्षण करून संघटनेने काही शिफारशी केल्या आहेत.

आमचा अनुभव केवळ एक वर्षाचा आहे. तोही ठाणे जिल्ह्यातील डहाणू व तलासरी या दोन तालुक्या पुरताच मर्यादित आहे. तसेच श्रम व श्रमजीवी हेच आमच्या अभ्यासात केंद्रस्थानी आहेत हे आम्ही प्रथमच नमूद करतो.

रोजगार हमी योजना कायद्यामध्ये अंतर्भूत असणाऱ्या उद्दिष्टांपेक्षा त्यापासून प्रत्यक्षात मिळालेला फायदा हा निश्चितच जास्त आहे. आदिवासींमध्ये श्रमविषयक जाणीव निर्माण करण्याच्या संदर्भात यायोजनेने फारच भरीव कामगिरी केली आहे. रोजगार हमी योजनेने हजारो ग्रामीण कुटुंबांना समाजात मानाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाला अर्थ देऊन त्याची पूर्तता करण्यात रोजगार हमी योजनेने मदत केली आहे. या कायद्यामुळे आदिवासींमध्ये स्वावलंबनाची जाणीव निर्माण झाली आहे. आत्मप्रतिष्ठा ठेऊन मानाचे आयुष्य जगण्याची शक्यता या कायद्याने निर्माण केली आहे. आदिवासी समाजाला स्थैर्याचा व प्रामाणिकपणे जगण्याचा मार्ग या कायद्याने थोडचाफार प्रमाणात दाखविला.

आदिवासींमधील सत्तर टक्क्याहून अधिक लोक सरासरी दीड एकर जमिनीचा तुकडा असणारे छोटे भू-धारक आहेत. अशा परिस्थितीत अल्प भू-धारकांना त्यांच्या शेतीत राबण्यासाठी काही प्रमाणात शाश्वती व आधार या योजनेने प्राप्त करून दिले आहे. एक-दीड एकराच्या छोट्या तुकड्यांवर राबणाऱ्या सरासरी पाच माणसांच्या कुटुंबातील लोकांना अर्ध बेकारी वा बेकारी सतत अनुभवावी लागते. अशा कष्टकऱ्यांना रोजगार हमी योजनेने पुन्हा आपल्या शेतात वा जंगलात आणले आहे.

या रोजगार हमी योजनेखाली काम मिळणाऱ्या लोकांना मिळणारा शारीरिक श्रमाचा मोबदला केवळ नाण्याच्या स्वरूपात मोजणे योग्य नाही. कारण

स्वतःच्या मालकीची तुटपुंजी जमीन असणारे छोटे शेतकरी वा भूमिहीन शेत मजूर अशा श्रमजिवीकेतील राबण्याची शारीरिक कुवत असणाऱ्या लोकांचे श्रम वापरून त्यायोगे सामुहिक मालकीची उत्पादन साधने निर्माण करून ग्रामीण दारिद्र्याच्या समस्येशी मुकाबला करणे हे या योजनेचे उद्दीष्ट आहे. त्यामुळेच मानवी श्रमाचा अधिकाधिक वापर करून जास्तीत जास्त उत्पादन केले व असे करतांना श्रमणाऱ्यांना पुरेसे वेतन देऊन उत्पादनाचे सुयोग्य वाटप केले आणि ही योजना राबवितांना योग्य प्रकारची कामे सुरू करून सामुहीक मालकीची उत्पादन साधने निर्माण केली तरच यातून भविष्यकाळांत आर्थिक लाभ उठविता येईल असे आम्हांला वाटते.

## रोजगार हमी योजनेखालील कामे

प्रस्तावना : डहाणू व तलासरी या तालुक्यामध्ये चार प्रकारची कामे हाती घेण्यात येतात. त्यांचे महत्व व प्राधान्य यानुसार असणारा क्रम खालीलप्रमाणे--

(१) रस्ते बांधणे, (२) जंगलातील कामे, (३) तलावांचा उपसा व डागडुजी, (४) जमिनीवर भराव घालण्याचे काम.

रोजगार हमी योजनेखाली, कामाला देण्यात येणारे हे प्राधान्य आमच्या मते चुकीचे आहे. आदिवासी विभागात रस्त्याच्या कामांना प्राधान्य दिले जावे असे आम्हाला वाटत नाही. कारण रस्त्यांच्या कामासाठी प्रचंड रक्कम खर्ची पडते तर अशा गुंतवणुकीपासून आदिवासींना मिळणारा फायदा अत्यंत अल्प असतो. काही वेळा तर आदिवासींचे त्यामुळे नुकसान होण्याचाच संभव असतो. ग्रामीण भागातील लोकांचे जाणे पायीच होते. यासाठी ते कमी अंतराच्या पायवाटाच वापरतात, त्यामुळे रस्त्यांचा वापर ते अभावानेच करतात. परंतु अशा रस्त्यांमुळे नको ते लोक मात्र आदिवासींच्या भागात आक्रमणे करू लागतात. अशी मंडळी जंगलाच्या अंतर्भागात व तेथे राहणाऱ्या थोड्या आदिवासींच्या घरांपर्यंत या नव्या रस्त्यामुळे सुलभ रितीने पोहोचतात. मग जंगले उध्वस्त करून त्यांची लूट करून ती बोडकी करण्यात येतात व आदिवासींनाही नागवण्यात येते. गवताचे, लाकडाचे व्यापारी, ठेकेदार, जमीन बळकावणारे असे हे सर्व लोक लॉऱ्या व महागडी आधुनिक साधने यावर तुटून पडतात. मंद गतीने चालणाऱ्या बैलगाड्यापेक्षा वेगवान लॉऱ्या पसंत पडल्यामुळे बैलगाड्यांना रजा मिळू लागते व प्रदुषणाला सुरुवात होते. आपल्या बैलगाड्या हाकून जोड धंदा म्हणून चार पैसे मिळवणाऱ्या आदिवासींचे उत्पन्न कठोरपणे तोडण्यात येते. अशारितीने या रस्त्यामुळे आदिवासींचे नुकसान होते [तर ज्यांच्याजवळ मोठ्या प्रमाणांत भांडवल गुंतवणूक करण्याची क्षमता आहे त्यांचा मात्र फायदा होतो असेच म्हणावे लागते.

या बरोबरच हे रस्ते आदिवासींच्या खाजगी जमिनीवर अतिक्रमण करतात. आदिवासींच्या खाजगी जमिनीच्या संकोचाची प्रक्रिया आधीच सुरू झाली आहे. बड्या जमीनदारांनी आदिवासींची जमीन बळकवण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. याचवेळी ठाणे जिल्ह्यात अनेक मोठ्या योजनांची कार्यवाही सुरू आहे. अशा छोट्या मोठ्या योजना राबविताना आदिवासींची त्यांच्या जमिनीवरून उचलबांगडी होते व त्या जमिनीवर शहरी लोकांसाठी जलाशय बांधले जातात. त्यातच होणाऱ्या या रस्त्यामुळे आदिवासींच्या दुःखात भर पडते. रोजगार हमी योजनेखाली बांधलेल्या रस्त्यांसाठी अशी गरीब आदिवासींची किती चांगली जमीन गेली याचा शोध घेणे हे चांगले काम होईल. तसेच सदर जमिनीचा मोबदला म्हणून आदिवासींना दिलेली आर्थिक भरपाईही पहावी लागेल. आमच्या मते आदिवासींचे अज्ञान व अशिक्षितपणा याचा गैर फायदा घेतला जात आहे. ज्या कागदपत्रात काय मजकूर आहे हे माहिती नाही अशा कागदावर आदिवासींना आंगठा उठवावा लागतो. काही ठिकाणी आदिवासींना त्यांच्या जमिनीचे हस्तांतर झालेलेही ज्ञात नाही. इतर काही [ठिकाणी तर नुकसान भरपाई देण्यात दिरंगाई केली जाते. काही ठिकाणी तर जमिनीचा ताबा घेण्याचे कागदपत्र करताना व त्यासंबंधी नुकसान भरपाई देताना अक्षम्य दिरंगाई केली जात आहे.

## अनाठाई खर्च

रस्त्याच्या कामासाठी होणारी भांडवली गुंतवणूक प्रचंड असते. तर त्यामुळे उपलब्ध होणारा रोजगार अल्प प्रमाणात असतो. एवढेच नव्हे तर जेव्हा रस्त्याचे काम अपूर्ण रहाते तेव्हापासून सुरू झाली की पावसामुळे रस्ते धुपून निघतात व त्याचा उपद्रव होतो. खरे तर पावसाचे प्रमाण प्रचंड असल्यामुळे पूर्ण झालेले

रस्तेही येथे धुपतातच. पावसाळ्यात येथे सतत पूर येतात. तशात अपुऱ्या अयोग्य जागी मोऱ्या, अपुरी व अर्धवट गटाराची कामे ही धूप वाढवण्यास मदत करतात. रोजगार हमी योजनेखाली उभ्या केलेल्या साधन संपत्तीला लागलेली ही गळती म्हणजे राष्ट्रीय संपत्तीचा अनाठाई व्ययच आहे. एवढेच नव्हे तर अशा कामासाठी वर्षानुवर्षे राबणारे आदिवासी या प्रकारामुळे वैफल्यग्रस्त होतात. त्याचे असे धूपून गेलेले श्रम अपूर्ण ठरतात. यामुळेच एकूण समाजाच्या दृष्टीने ही अशी कामे संचयाची न ठरता व्ययाचीच ठरतात.

आम्ही रस्ते होण्याच्या विरोधी नाही. खरे तर गावातील लोकांना विशेषतः पावसाळ्यात हे रस्ते उपकारक ठरू शकतील. परंतु आमचे ज्ञान व अनुभव यावरून या कामाला आज दिले जाणारे प्राधान्य आम्ही समजू शकत नाही.

**जंगलातील काम हे खरे तर श्रमप्रधान असूनही या कामासाठी एवढ्या अल्प प्रमाणात श्रम कसे वापरण्यात आले याचे आम्हांला आश्चर्य वाटले. हे रहस्य आम्हांला समजलेले नाही. ते उलगडण्यासाठी कोणालाही सखोल अभ्यास करावा लागेल.**

**जंगल व जंगलातील कामे यासाठी फारच अल्प रक्कम गुंतविली जाते. या विषयी केवळ आश्चर्य व्यक्त करून भागणार नाही तर याचे कारण नीट शोधावे लागेल. जंगलामधून मिळणारे उपन्न व जंगलातील केली जाणारी गुंतवणूक यांच्या रकमेत आज कोणतेही तारतम्य नाही. जंगलामधून मिळणाऱ्या उत्पनाची तशी आकडेवारी आपल्यापाशी नाही.**

परंतु यासंबंधीचा साधारण तर्कही येथे पुरेसा ठरणार नाही. उदाहरणार्थ, लाकडाच्या एका लिलावासाठी जेव्हा मुंबई व गुजराथमधून व्यापारी आले तेव्हा लिलावाची किंमत ३२ लाख रुपयांची झाली. ही रक्कम एका लिलावाची आहे. प्रतिवर्षी २०–२५ लिलाव येथे होतात. तसेच जंगलखाते दर वर्षी सुमारे ८०० हेक्टर जमीन उघडी–बोडकी करते तर जंगल विकास निगम वर्षाला ३०० हेक्टर जमिनीवरील जंगल तोडते, काय ही उघळपट्टी !

जंगल लागवडीचे काम अत्यंत मंद गतीने सुरू असते. आमच्या माहितीप्रमाणे केवळ २०० हेक्टर जंगल जमिनीवर पुन्हा जंगलाची लागवड केली. जंगल उध्वस्त करण्याच्या या कामाला इमारती लाकूड मंडळ व जंगल सोसायटचादेखील हातभार लावतात. जंगलखाते, जंगलविकास निगम, इमारती लाकूड मंडळ व जंगल सोसायटचा यांच्या मदतीने फार मोठचा प्रमाणावर जंगलाचा नाश सुरू आहे. आम्ही केलेल्या पाहाणीमुळे आमच्या हे निदर्शनास आले आहे.

## अधिकाऱ्यांचा हात

जंगलाचा नाश करणारे दुसरे गुन्हेगार म्हणजे चोरटे लाकूड व्यापारी, ठेकेदार व जमिनदार हे होत. उदा. डहाणू, तलासरी विभागातील बागायतदारांच्या वाडचांची तपासणी करा. या वाडचांच्याभोवती असणाऱ्या कुंपणासाठी त्यांनी लाकडाचे व खांब कोठून विकत घेतले याचा शोध घ्या. तसेच उध्वा, डहाणू, व इतर ठिकाणच्या लाकूड कापणाऱ्या गिरण्यात तपास करा व त्यांच्याकडे लाकूड कोठून येते याचा शोध घ्या. उध्वा, येथील लाकूड गिरणी, नजिकच असणाऱ्या नगर हवेली तालुक्यात लॉऱ्या भरभरून लाकूड पाठवत असते हे सर्वांना ठाऊक आहे. जंगल खात्याच्या संरक्षकाचे कार्यालय या ठिकाणाच्या जवळच आहे. यावरून जंगल खात्याच्या अधिकाऱ्यांचा लाकडाच्या अशा चोरटचा व्यापारास हात असल्याचेच सिद्ध होते. असा छुपा व्यापार फार मोठचा प्रमाणावर संघटीतपणे व सातत्याने चालू आहे. आम्ही आमचे जीव धोक्यात घालून एक वर्षात दोनपेक्षा जास्त वेळा अशा जंगल चोराना पकडले.

जंगल नष्ट करण्यात अगदी माफक प्रमाणात का होईना पण हातभार लावण्यात शेवटी क्रमांक आदिवासींचा आहे. त्यांना त्यांच्या घरासाठी लाकूड, लागते व ते वापरतात. तसेच त्यांना जळणासाठी सुकलेले लाकूड लागते. आज काही प्रमाण आदिवासींना जंगलापासून अलग करण्यात आले आहे. तसेच जंगलापासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या बाबतीत सरकारी अंमलदार स्वतःच एवढे लुटारू व लालची आहेत की त्यामुळे आज आदिवासींही जंगलाकडे व्यापारी दृष्टीकोनातून पहातात. म्हणून ते अल्पशा मोबदल्यात दलालांना मोठ्या प्रमाणात लाकूड चोरण्यासाठी मदत करतात. आज जंगलात जी कामे काढली जातात त्याचे स्वरूपही मुख्यतः जंगल तोड व जंगल जाळणे अशा स्वरूपाचे असते.

हे काम अत्यंत मोठ्या प्रमाणावर चालते. यामुळे बाजारात विकण्यासाठी जंगलतोड करावी लागते. अशा स्वरूपाच्या जंगलविषयक बाजारी दृष्टीकोन लोकांच्या मनात उत्पन्न होतो. याला आळा घातला

पाहिजे. या उलट जंगल लागवडीच्या कार्यक्रमाला प्राधान्य मिळाले पाहिजे. परंतु असे असताना रोजगार हमी योजनेखाली या कार्यक्रमासाठी खर्ची पडलेली रक्कम पाहिली तर जंगलासाठी फारच थोडी रक्कम खर्च करण्यात येते असेच म्हणावे लागेल.

### तलाव बांधावे

गरीबांना उपयुक्त ठरतील अशा तलावातील गाळ काढणे हे आवश्यक काम आहे परंतु आदिवासींना उपयोगी पडणारा तलाव आमच्या तरी पहाण्यात नाही. त्यामुळे अशी कामे कोठे केली गेली याची माहिती मिळाली तर ती उपकारक बाब होईल. असे तलाव कोणाच्या जमिनीवर बांधले ? त्यांचा फायदा कोणाला मिळाला ? असे तलाव आदिवासींसाठी का बांधले जात नाहीत ? खरे तर आदीवासींच्या वापरासाठी अशा प्रकारचे तलाव मोठ्या प्रमाणावर बांधले गेले पाहिजेत. आदिवासींच्या गुरांसाठी या पाण्याचा उपयोग होईल व यातूनच आदिवासीत मत्सोद्योग विकसित होईल.

आमच्या मते भराव घालण्याचे कामही महत्त्वाचे आहे. अशा प्रकारच्या कामाला सुरुवातही झाली आहे असे म्हणतात. अशा कामाच्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण घेणे आम्हांला आवडेल. परंतु आम्हाला असे काम चालू असणारे ठिकाण अजून सापडलेले नाही. टेकड्यांच्या प्रदेशात भराव घालण्याचे काम अत्यावश्यक या सदरात मोडते. जव्हार व मोरवाडा तालुक्याला लागून असणाऱ्या डहाणू तालुक्यातील डोंगर व टेकड्या पाहिल्या तरी हेच स्पष्ट होईल. या प्रदेशात भर न घातलेली उतारावरील शेती पहावयास मिळते. येथे उतारावरील माती धुवून निघते. व तेथे केवळ दगड धोडेंच शिल्लक उरलेलें दिसतात. यामुळेच भर घालण्याचे काम केवळ एका व्यक्तीपुरते नव्हे तर एकूण समाजाच्या व अर्थ व्यवस्थेच्यादृष्टीनेही उत्पादक ठरते. या कामामुळे शेती उत्पादनाला मोठी मदत होऊ शकते. म्हणूनच सरकारने या कामावर विशेष लक्ष केंद्रीत केले पाहिजे असे आमचे मत आहे.

अर्थात सुरुवातीला कसे तरी तग धरून राहिलेल्या छोट्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर ही योजना प्रथम राबवली पाहिजे. मोठ्या जमिनदारांना व बड्या शेतकऱ्यांना स्वखर्चाने हे काम करणे परवडेल. जिल्ह्यात मुख्यतः आदीवासी भू-धारकांच्या जमिनी अविकसित आहेत. यामुळेच सरकारने या प्रकारची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू केली पाहिजेत.

सन १९७१ च्या जनगणनेप्रमाणे डहाणू तालुक्यात एकूण ग्रामीण श्रमिकांची संख्या ४,७४१ एवढी होती. यातील केवळ २,५१९ लोकांची रोजगार हमी योजनेसाठी नावे नोंदवली आहेत. खरे तर आजपर्यंत श्रमिकांची संख्या निदान ५०,००० एवढी तरी वाढलेली असणारच.

१९७१ च्या जनगणनेनुसार तलासरी तालुक्यातील एकूण ग्रामीण श्रमिकांची संख्या १४,६१८ होती. यापैकी केवळ ७.४८४ लोकांनी फेब्रुवारी ८० मध्ये रोजगार हमी योजनेखालील कामासाठी आपली नावे नोंदवली आहेत. परंतु या योजनेखाली जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध झाला होता मे १९७९ मध्ये व तोही केवळ १३५९ लोकांना.

यामुळेच इतर श्रमजीवी कोठे गेले आहेत असा प्रश्न निर्माण होतो म्हणून तालुक्यात ५०,००० श्रमजीवी आहेत. त्यातील फक्त २५,००० लोकांनी रोजगारासाठी नावे नोंदवली आहेत. पण आश्चर्याची गोष्ट अशी की, दर महिन्याला काम करण्यासाठी फिरकणाऱ्या लोकांची संख्या १,५०० पेक्षाही कमी आहे. तलासरी तालुक्यात असणाऱ्या सुमारे २०,००० श्रमजीवींपैकी कमी लोकांनी रोजगारासाठी नावे नोंदवली तर दर महिन्याला काम करण्यासाठी केवळ ७४७ लोक फिरकताना दिसतात.

बाकीचे श्रमजीवी गेले कोठे ? जव्हार, मोरवाडा तालुक्यांतील श्रमजीवी स्वस्त दराने मजुरी करण्यासाठी तलासरी व डहाणू तालुक्यांत मोठ्या संख्येने येतात. तरीही सुमारे १०,००० स्थानिक लोक बड्या जमीनदारांच्या बागा व शेते यामध्ये काम करतात. तसेच ६,००० लोक रोजगार हमी योजनेखाली काम करतात असे म्हटले तर १६,००० मजुरांचा हिशोब लागतो. तरीही राहिलेले ५४,००० श्रमजीवी कोठे जातात ? आम्ही वारंवार असे दाखवून दिले आहे की, हे लोक कामासाठी स्थलांतर करतात. या विभागातील श्रमिक सुरत किंवा रत्नागिरीसारख्या दूरच्या ठिकाणी कामासाठी नेले जातात.

जुलै १९८० च्या सुरुवातीला, ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांपुढे नेण्यात आलेली स्थलांतरित श्रमिकांची गोष्ट बोलकी आहे. आदिवासींतील कातकरी जमातीच्या ज्या लोकांना काम करण्यासाठी रत्नागिरीला नेण्यात

आले होते त्यांना पूर्ण रोजगार न देताच ठाण्याला सोडून देण्यात आले. अशा प्रकारच्या घटना ही खरे तर नेहमीचीच बाब आहे.

### अमानुष स्थलांतर

काम शोधत आदिवासी विटांच्या भट्टया, मिठागरे, जमीनदारांच्या बागा व हातभट्टया यांच्या दारात जाऊन पोहचतात. आम्ही श्रमजीवींच्या स्थलांतराच्या विरोधी नाही. परंतु ज्यायोगे पिळवणूक व फसवणूक होते, अर्ध वेतन देऊन श्रमजीवींना लुबाडले जाते अशा अमानुष स्थलांतराच्या विरोधी आम्ही निश्चित आहोत. रोजगार हमी योजना ही असले प्रकार थांबवण्याचा एक मार्ग आहे. अनोळखी विभागात अशा स्थलांतरित श्रमजीवींना कोणत्या धोक्यांना तोंड द्यावे लागते हे आम्हाला माहिती आहे. विशेषतः ट्रक अपघातात सापडून वस्तीच्या वस्ती बरबाद होण्याचे प्रकार दरवर्षी आमच्या कानी येत असतात.

स्थलांतरित श्रमजीवींमुळे स्वस्तात उपलब्ध होणारी श्रमशक्ती यांच्यात मूलभूत स्वरूपाचा फरक आहे. तेव्हा ७५ टक्के लोक कामधंदा शोधण्यासाठी बाहेर पडतात तेव्हा हे लोक त्यांची घरेदारे व शेती सोडून का जातात असे म्हणून लोक आश्चर्य व्यक्त करतात. परंतु या संदर्भात आम्ही स्वतः पुढील सत्यपरिस्थिती अवलोकिली आहे.

(अ) आदिवासी कुटुंबाकडे कसण्यासाठी स्वतःची अशी सरासरी दीड एकरापेक्षा कमी जमीन असते. त्यामुळे शेतींमधून मिळणारे उत्पन्न त्यांना सहा महिनेही पुरू शकत नाही. म्हणूनच रोजगार शोधणे त्यांना भाग पडते.

(आ) आदिवासींचे सरासरी कुटुंब ६ माणसांचे असते. ते बहुसंख्य काळ अर्धबेकार वा पूर्ण बेकार असतात. यामुळेच कुटुंबातील निदान एका व्यक्तीला तरी रोजगार मिळावा यासाठी ते प्रयत्नशील असतात. या रोजगाराचा उपयोग त्यांना स्वतःची शेती करण्यासाठी होतो.

(इ) आदिवासी सदासर्वकाळ काही तरी रोजगार शोधत असतात. शक्यतो रोजगार त्यांना त्यांच्या घराजवळ वा गावाजवळ हवा असतो. परंतु तसे काम न मिळाल्यास घरादारांपासून दूर जाऊन रोजगार शोधणे त्यांना भाग पडते.

(ई) त्यांना स्थलांतरित श्रमजीवी म्हणणे चूकच आहे. खरे तर त्यांना कामाच्या शोधात फिरणारे बेघर श्रमजीवी असेच संबोधले पाहिजे. घरी राहिले तर वाटयाला येणारी भूक व म्हणून कामाची निकड यामुळे आदिवासी काम मिळण्याची शक्यता असणाऱ्या ठिकाणी जातात. बोरीवली, घाटकोपर अशा रेल्वे स्टेशनांवरील पुलांच्या पायऱ्यावर उभे राहून रोजगार मिळण्यासाठी प्रतिक्षा करताना ते सहज दृष्टीस पडतात.

(उ) रोजगार हमी योजनेखाली कामासाठी नाव नोंदण्याचे काम अत्यंत संथपणे केले जाते. हा सर्व प्रकार वैफल्य उत्पन्न करणारा आहे. ज्या ग्रामसेवकाकडे हे काम सोपवण्यात आले आहे त्यांनी त्यांचे काम केलेले नाही. पुन्हा पुन्हा विनंती करूनही नमुना अर्ज उपलब्ध केले जात नाहीत. मी स्वतः नमुना अर्ज क्रमांक ४ मिळवण्याचा जेव्हा प्रयत्न केला तेव्हा मलाही त्यासाठी चारी दिशा धुंडाव्या लागल्या. शेवटी दहा खेपा घातल्यावर मला एक नमुना अर्ज मिळाला. यावरून हमी योजनेखालील कामासाठी स्वतःचे नाव नोंदवू इच्छिणाऱ्या गरीब, अज्ञानी व अशिक्षित आदिवासी व्यक्तीची होणारी परवड कोणाच्याही लक्षांत येईल. काही ठिकाणी केवळ नाव नोंदवण्यासाठी दारू, कोंबडे वा पैसे मागितले गेले व आदिवासींनी असल्या मागण्या पुरवल्याचे आम्हाला कळले आहे.

(ऊ) आदिवासी कामासाठी उपलब्ध नसतात अशा प्रकारची तक्रार सरकारी अंमलदाराकडून करण्यात येते. मात्र आम्हांला आमचे निरिक्षण ज्ञान व अनुभव यावरून असे दिसते की वास्तवस्थिती याच्या अगदी उलटी आहे. उदा. मस्टर कारकुनासारखी सरकारी नोकरच कामचुकार असतात व तेच कामाच्या ठिकाणी उपस्थित नसतात. सार्वजनिक निधीतून पगार उचलणाऱ्या या सरकारी नोकरांना आपल्या कामात रस नसतो. हेच लोक त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांच्या सोईचे असे अर्धसत्य कथन करतात. रोजगार हमी योजनेच्या कामावर गेलेले व कामचुकार मस्टर कारकुनाच्या गैरहजेरीमुळे कंटाळून परत आलेले अनेक लोक आमच्या माहितीत आहेत.

(ए) रोजगार हमी योजनेखालील कामापोटी दिल्या जाणाऱ्या मुजुरीचे वाटप वेळच्या वेळी केले जात नाही. धान्याच्या कुपन्स वरील धान्यही वेळीच वाटले जात नाही. काही वेळा तर अत्यंत निकृष्ट प्रतीचे धान्य लोकांना देण्यात येते. त्याना आठवडयाच्या कामाची

मजुरी मिळवण्यासाठी तीन चार वेळा फेऱ्या माराव्या लागतात. तसेच बहुसंख्य वेळा त्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन त्यांना फसवण्यात येते, लुबाडण्यात येते असे आमच्या निदर्शनास आले आहे.

(ऐ) वरील आरोप सिद्ध करण्यासाठी व जेथे सरकारी अधिकारी स्वतःच न्याय व योग्य वेतन देवू शकले नाहीत हे दाखवून देण्यासाठी आम्ही गांगणपाडा व पाटीलपाडा येथील लोकांचे प्रकरण धसास लावले. येथील मजुरांना त्याचे वेतन व रेशन या दोन्ही बाबतीत जंगल खात्याचे अधिकारी श्री. रोडे यांनी व त्यांच्या कनिष्ठांनी लुबाडले होते.

अल्प मोबदल्याची फसवणूक पदरात पाडून घेण्यासाठी या लोकांना करंजगाव गेटवर चार फेऱ्या माराव्या लागल्या होत्या. त्या सब–डिव्हीजनचे जंगल अधिकारी श्री. महाजन यांच्या उपस्थितीत जेव्हा तपासणी झाली तेव्हा २ जुलै १९८० रोजी केलेल्या कामाची मजुरी वाटताना केलेल्या अनेक गफलती उघड झाल्या. दर दिवसाला तीन रुपये हा वेतनाचा दर असताना प्रत्यक्षात किती प्रमाणात फसवणूक करण्यात आली होती हे कोणाच्याही लक्षात येईल. हा केवळ मोठ्या हिमनगाचा दृष्टीस पडणारा छोटा भाग आहे. कारण ही निर्भयपणे पुढे येऊन साक्ष देण्यास तयार असणाऱ्या लोकांची एक कथा आहे. प्रत्यक्षात शेकडो लोक भिऊन गुपचूप बसतात. किंवा भविष्यात याचा बदला घेतला जाईल वा काम मिळणार नाही या भितीपोटी लोक घाबरतात किंवा वैतागून गप्प बसतात. फारतर जंगलातील कामासाठी पुन्हा फिरकत नाहीत. असे प्रकार डहाणू जंगल विभागाच्या सातही उपविभागात घडत होते. सुदैवाने तेव्हाचे विभागीय वन अधिकारी श्री. डि. व्हि. घाणेकर हे सहकार्य देणारे व तावडतोब कृती करणारे तडफदार अधिकारी होते. वर निर्दिष्ट केलेल्या प्रसंगी उपविभागाच्या वन अधिकाऱ्याने आपली चूक मान्य करून लोकांकडे क्षमा याचना केली होती. तो स्वतःची पदरमोड करून मजुरांच्या नुकसानीची भरपाई करण्यास तयार होता. (अर्थात लोकांचे पैसे खाऊन झाल्यावर सुचलेली ही बुद्धी) परंतु स्थानिक लोकांनी वरिष्ठांकडे तक्रार नेणेच पसंत केले.

(ओ) डहाणू तालुक्यात ग्रामीण श्रमजीवींची संख्या प्रत्यक्षात ५०,००० /– हून पुष्कळच जास्त आहे. तर तलासरीत ती २०,००० पेक्षा जास्त आहे. कारण आदिवासीमध्ये खूप तरुणपणीच लग्ने होतात. त्याचे कुटुंब ते १८ वर्षाचे होण्यापूर्वीच अस्तित्वात येते. जेव्हा ते १८ वर्षाचे होतात तेव्हा त्यांचे स्वतःचे वेगळे कुटुंब असते. त्यांची १२ वर्षाखालील लहान मुलेही प्रौढ माणसाप्रमाणे काम करतात. जंगल खात्यात व डहाणू शहराच्या आसपासच्या फुग्यांच्या कारखान्यात नजर टाकली तर याची सहज प्रचिती येते.

(औ) आम्ही पुन्हा एकदा प्रतिपादन करतो की, श्रमजीवींचे नाव नोंदवण्यात हयगय केली जाते. या कामासाठी नेमलेल्या शासकीय अधिकाऱ्यांनी हे काम अधिक गंभीरपणे केले पाहिजे. ही कामे नोंदवण्याची पद्धतही अधिक सोईची केली पाहिजे. वेळकाढूपणाचे प्रकार कोणत्याही परिस्थितीत थांबले पाहिजेत.

(अं) वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या कामावर वेळोवेळी देखरेख ठेवली पाहिजे. अशा कामासाठी जाताना त्यांनी त्याच्या आगमनाची आगावू सूचना न देता धडक भेटी दिल्या पाहिजेत. असे केले तर अनेक गोष्टी उघडकीस येतील.

## नेहमीचे अनुभव

(क) रोजगार हमी योजनेची माहिती देण्यात येत नाही. खरे तर नाक्यानाक्यावर अशा माहितीचे फलक लावून ती जाहिर केली पाहिजे. या संबंधीची सर्व माहिती आदिवासीना दिली पाहिजे. तसेच त्यांच्या मजुरीचे वाटप केव्हा होणार आहे हे सुद्धा त्यांना कळवले पाहिजे.

(ख) आदीवासीना कामाची सर्वात जास्त गरज असते तेव्हा कामे सुरू केली पाहिजेत. लावणी नंतरच्या काळात म्हणजेच ऑगष्टच्या पहिल्या आठवड्यात आदिवासींची परिस्थिती हलाखीची असते त्यावेळी ते काम शोधत वणवण भटकत असतात. तेव्हा काही कामे काढली पाहिजेत. त्यानंतरच्या सप्टेंबर महिन्यात मोठ्या प्रमाणावर कामे सुरू केली पाहिजेत. म्हणजे मग दिवाळीच्या सणाच्या निमित्ताने ते जेव्हा वर्षाची कापड खरेदी करतात तेव्हा त्यांना पैसे मिळतील. दिवाळीच्या सुमारास आदीवासी जवळ खाण्यासाठी धान्य असते पण त्याच्यापाशी रोख रक्कम नसते. त्यामुळेच कापड वगैरेची खरेदी करण्यासाठी त्यांना या काळात वेतन म्हणून रोख रक्कम दिली जावी. पुढे फेब्रुवारी नंतर त्यांना निम्मे वेतन धान्याच्या स्वरुपात देण्यात यावे.

(ग) रोजगार हमी योजनेत अनेक निर्णयात लोकांचा सहभाग नसतो ही मोठी त्रूट आहे. ती भरून काढण्यासाठी अधिकाऱ्यांनी लोकांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी रोजगार हमी योजना व त्यापासून मिळणारे फायदे या संबंधी बोलले पाहिजे. कोणत्या प्रकारचे काम काढावे व ते कोठे सुरु करावे या विषयी लोकांशी सल्लामसलत केली तर बराच फायदा होऊ शकेल.

(घ) लोकांच्या स्वैर संचारामुळे मजुरामध्ये कामासाठी स्पर्धा सुरू होते व यातून मजुरीचे दर घटत जातात. यामुळे जबरदस्तीने पिळवणूक करणाऱ्यापुढे गरीब आदिवासी उघडे पडतात. यातूनच आदिवासीच्या तरुण मुली व स्त्रिया वाईट धंद्याला बळी पडतात.

(च) मजुरांसाठी काही सुखसोई उपलब्ध करणे हे आवश्यक आहे. या कामासाठी बऱ्याच तरतुदी करण्यात आल्या आहेत. परंतु आम्ही डहाणू व तलासरी विभागात कोठेही अशा सुखसोई पाहिलेल्या नाहीत' यामुळे केवळ कागदावरच अशा योजना राहातात व प्रत्यक्ष व्यवहारात त्या उतरत नाहीत. असेच कोणाच्याही अनुभवास येते. मजूरांना विश्रांती घेण्यासाठी मांडव उभे केले पाहिजेत, त्यांच्या पाण्याची सोय झाली पाहिजे, मजूर स्त्रीयांच्या बालकांसाठी पाळणाघरे व शिशुसंगोपन गृहांची सोय झाली पाहिजे. मजुरांना हत्यारे पुरवली पाहिजेत. अपघाताच्या प्रसंगी डॉक्टरची सोय उपलब्ध झाली पाहिजे अशा अनेक सुखसोईची त्यांना गरज आहे.

(छ) गावच्या लोकांकडून हजेरी बुकाची तपासणी करून घेऊन हजेरी पटावर उगाच जास्त लोकांची हजेरी मांडली जात नाही ना याची शासनाने खात्री करून घेतली पाहिजे.

## शिफारसी

जमीन, जल, वनसंपत्ती व लोक यांच्यात सुयोग्य समतोल साधला जाणे ही बाब त्या भागातील लोकांच्या एकात्म विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. यातूनच सकस शेतजमीन अनुत्पादक पडीक जमीन मुद्दाम पाडून ठेवण्याच्या प्रकारांना आळा बसेल. तसेच छोट्या शेतकऱ्याची भूमिहीन शेतमजुरात भरती होऊन त्यांना जगण्यासाठी भ्रमंती करावी लागणार नाही. यासाठी रोजगार देणारी व उत्पादक कामे काढून सार्वजनिक मालकीची साधन संपत्ती निर्माण केली पाहिजे. हे लक्षात घेऊन व सर्वांगीण विकासाच्या दिशेने पावले पडावीत यासाठी आम्ही कष्टकरी संघटनेतर्फे चार प्रकारची कामे सुचवू इच्छितो.

ही कामे एकमेकांना पूरक आहेत तशीच परस्परावलंबी आहेत. प्राधान्यानुसार ही कामे क्रमशः पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) सामाजिक वन-संवर्धन व मातीचे रक्षण (मृद् संधारण)

(ब) जमीनीचा सर्वांगिण विकास.

(क) जल साठ्यांची संभाव्यता लक्षात घेऊन त्यांना योग्य वळण लावून त्यांचा वापर.

(ड) लोकांना कौशल्य शिकवणे.

## (अ) सामाजिक वन-संवर्धन ही तुलनेने नवी संकल्पना आहे.

झाडांची लागवड, गावच्या सामाईक जमिनीवर कुरणांचा विकास, रस्त्यांच्या व कालव्यांच्या दुतर्फा झाडे लावणे...(रोजगार हमी योजना १९७९।१८३७ इ. एम्. वी.—३) यांसारख्या सरकारी वर्तुळातील मर्यादित अर्थाने ती समजून घेता कामा नये. तर या संकल्पनेचा व्यापक अर्थ ध्यानात घेतला पाहिजे. नैसर्गिक समतोलाच्या सुयोग्य आकलनावरून सामाजिक वनरक्षण विद्येची कल्पना आली आहे. आणि नैसर्गिक समतोल हे शब्दही जेव्हां आचरणात आले नव्हते तेव्हापासून आदिवासीच ही कल्पना आचरणात आणीत आहेत. त्यांच्या जीवनाशी ती एकरूप झाली आहे. आदिवासी जणू जंगलाशी संवादी जीवन जगत आले आहेत. जंगले आणि (आदिवासी) यांच्यात जणू परस्परावलंबित्व व परस्पर सुरक्षिततेचे संबंधच निर्माण झाले होते. त्यांच्याकडूनच ही सामाजिक वनरक्षण विद्येची संकल्पना आम्ही समजून घेण्याचा प्रयत्न केला व आता ही संकल्पना आम्ही पुन्हा वास्तव जीवनात आणू पहात आहोत.

आमच्या दृष्टीने सामाजिक वनरक्षण विद्या ही संकल्पना परस्परामध्ये नाते निर्माण करणारी आहे. समाजाच्या जाळ्यांमध्ये जंगलें लावली जातात तर जंगलाच्या आराखड्यात मानवी समाज बसवला जातो. या अर्थाने जंगले लावणे, त्याची वाढ करणे, त्यांना खते घालणे, त्याचे रक्षण करणे या साऱ्याची जबाबदारी समाज म्हणजे आपल्या संदर्भात आदिवासी

उचलतात. थोडक्यात समाज जंगलें वाढवण्याची, त्यांची पूर्णपणे भरभराट होईल याची हमी घेतो. तर याच्या बदल्यात जंगले समाजाच्या (येथे आदिवासींच्या) गरजा भागविण्यासाठी तयार होतात व अशा रीतीने त्यांची देखभाल करणाऱ्याच्या सेवेसाठी तत्पर राहतात.

थोडक्यात समाज जंगलासाठी जगत असतो तर जंगले समाजासाठी अस्तित्वात असतात.

आम्ही या संकल्पनेविषयी व त्याच्या परिणामाविषयी लोकांचे मत जाणण्याचा प्रयत्न केला. सर्व आदिवासी या संकल्पनेच्या बाजूचे आहेत असे आम्हांला दिसले आहे. आश्चर्य म्हणजे आम्हांलाच त्याच्याकडून पुष्कळशा गोष्टींची माहिती मिळाली. सुरुवातीला त्यांच्या वाडवडिलांच्या काळात जंगलाचा नाश करून त्यांना उघडे बोडके करून त्यांची लूटमार करण्यात आली. जंगल खाते येथे येण्यापूर्वी अशीच परिस्थिती होती असे तें सांगतात. मात्र ते व जंगले यामध्ये पूर्वी अस्तित्वात असणारी शांतता व सुसंवाद या विषयीची माहिती जुने लोक सांगतात. पूर्वी जंगलातून त्यांच्या गुरांवासरांना व जंगली प्राण्यांना कित्येक गोष्टी मिळत असत. त्यांनी आम्हांला अशा घनदाट जंगलात नेले की जेथे आजही शिल्लक राहिलेले अवशेष म्हणून असे साग आहेत की जे दोन माणसांच्या मिठीतही मावत नाहीत. त्यांना जंगलें व त्यांची वाढ यांच्या कामात सहभागी व्हायचे आहे. खरे तर निसर्गाशी विसंवादाचा अनुभव प्रथम त्यांनाच येत असल्याने जंगले उघडी बोडकी केल्याची त्यांनाच बोचणी लागते. जंगले उध्वस्त झाल्यामुळे चित्ते व वाघ यांनी छोटचा जंगल विभागात कसा आश्रय घेतला आहे व ते दिवसाला पाच गुरे या प्रमाणे आदिवासींच्या गुरांचा कसा फडशा पाडीत असतात हे त्यांनीच आम्हांला सांगितले. किनवली आणि दिवशी दाभाडी या डहाणू तालुक्यातील विभागात तसेच मोखाडा जव्हार व नासिक जिल्हा यांच्या सीमा भागात असले प्रकार घडतात. पाऊस कमी पडतो त्याचा अनुभव त्यांनाच येतो पूर्वी कधीही होत नव्हते असे कडे कोसळण्याचे प्रकार त्यांनाच अनुभवावे लागतात. तसेच वाडवडिलांच्या काळात सतत हिरव्या गर्द दिसणाऱ्या पर्वत शिखरांच्या जागी आज केवळ खडकांचे दर्शन होते. जंगलाचे व्यापारीकरण सुरू झाले. त्या वेळेपासून आम्ही जंगलापासून दुरावू लागलो असेच ते म्हणतात. कारण आता फक्त सागवानाची व इतर काही व्यापारी झाडांची लागवड करण्यात येते व फळे देणाऱ्या झाडांना राम राम ठोकण्यात येतो व त्यामुळे त्यांना जंगलचा मेवा मिळू शकत नाही. असे त्यांचे म्हणणे आहे. जंगल खात्याच्या नोकरवर्गाच्या मदतीने चोरटचा व्यापाऱ्यांना साग व इतर प्रकारची व्यापारी झाडे तोडून पुरविण्याची कामगिरी त्यांनी स्वतःच केली. हेही ते मान्य करतात व यामुळेच ते जंगलापासून दुरावले असे त्यांना वाटते.

खरे तर त्यांची आम्हांला स्वीकारण्याची उत्सुकता व तयारी दाखवण्यासाठी १५ गावातील सुमारे ६२० खेडूतांनी २५००० झाडे त्यांच्या स्वतःच्या खाजगी जमीनीवर लावण्याचा विडा उचलला आहे. परंतु यासाठी जंगलखात्याने त्यांना रोपे उपलब्ध करून द्यावीत अशी त्यांची मागणी आहे. योग्य दिशेकडे जाण्याचे पहिले पाऊल यामुळे पडेल असे ते म्हणतात. ते लागवडीच्या बाजूचे आहेत. आता जंगल खात्याने या आव्हानाला प्रतिसाद द्यावयाचा आहे. या कामात पाण्याचा प्रश्न किंवा गुरांनी झाडे खाण्याचा प्रश्न निर्माण होईल. परंतु एकजुटीतून हे प्रश्न कसे सोडवता येतील हे पहाण्यासाठी एकजूट करायलाही लोक तयार आहेत.

यावर्षी जवळ जवळ पाच ते दहा गावे एकूण जंगल लागवड व ते वाढवण्याचे काम हाती घेण्याचे आव्हान स्वीकारायला तयार आहेत. आपण हा प्रयोग करू शकणार नाही का? उदा. पाच-दहा खेड्यांना जंगल जमीन द्यावी व त्यांना त्यावर मिश्र जंगले लावू द्यावीत. मिश्रझाडे विविध गरजा भागवतात व त्यामुळे ती झाडेच परस्परांना आधारभूत होतात. काही झाडे फळे देतात, काही जळणासाठी लाकूड पुरवतात. इतर काही झाडे पुष्कळ पाला देतात, जो जमिनीना कस वाढवतो व झाडाचेच खाद्य बनतो. राहिलेली बाजारासाठी इमारती लाकूड पुरवतात. कांही गुरांना खाद्य पुरवतात. लोक यासाठी तयार आहेत असे दिसते. तसेच कष्टकरी संघटना, भूमिसेना, आणि ग्राम स्वराज्य समिती यासारख्या इतर संघटनांबरोबर गावे व जंगले यांची जबाबदारी घेण्यात तयार आहे.

आम्ही कष्टकरी संघटनेचे लोक व इतर संघटना हे प्रचंड व राष्ट्रीय दृष्टचा आवश्यक काम हाती घ्यायला तयार आहोत. अवघड सर्व योजना रोजगार हमी

योजनेखाली करता येईल. अर्थात निधी हाताळण्याचे काम संबंधित खात्यानेच करावे. निसर्गाच्या सान्निध्यात लोक त्याच्याशी एकात्म पावतात त्यामुळे ते असल्या व्यापात अधिक गुंततात व मग अंदाज प्रत्यक्षात उतरतात. लोक हे आव्हान स्वीकारण्यास तयार आहेत. सरकार तयार आहे काय ?

### (ब) जमिनीचा विकास :

ही संकल्पना चांगली माहितीची व समजलेली आहे. या कामांची गरज फार पूर्वीपासूनच स्वीकृत करण्यात आलेली आहे. रोजगार हमी योजनेमार्फत छोटया शेतकऱ्यांच्या जमीनीच्या सर्वांगीण विकासाची कामे काढता येण्यासारखी आहेत. अर्थात आदिवासी, छोटे व गरीब शेतकरी यांच्या जमीनीवर प्रथम लक्ष केंद्रीत केले पाहिजे. या कामाच्या बाबतीत स्थानिक लोकांना विश्वासात घेतले पाहिजे आणि योजना अंमलात आणली पाहिजे. आमच्या माहितीप्रमाणे ग्रामपंचायतींना लोक बुजतात. कारण व्यवहारात ज्यांची पूर्ती होत नाही अशी आश्वासने, कागदावरील योजना त्यांनी अनुभवल्या आहेत. त्यामुळे कोणताही पक्ष वा पंथ विचारात न घेता लोकांनी कोठेतरी कामाला सुरुवात केली पाहिजे. निरनिराळया राजकीय पक्षांशी ग्रामीण लोकांच्या बांधिलकीमुळे विकासाच्या चाकाला अनेक आरे निर्माण झाले आहेत. त्यामुळे लोकांच्या नव्हे तर पक्षीय बांधिलकीला मदत होते.

भू-विकासाच्या कार्यक्रमाखाली खालील उपक्रमांना सुरुवात करता येऊ शकेल.

(अ) जमीन सखल करणे व आवश्यक तेथे भराव घालणे.

(ब) शेतांना बंधारे घालणे, ज्याजोगे त्यात पाणी साठेल.

(क) नाल्यांना बंधारे घालणे.

(ड) शेतात पाणी खेळण्यासाठी वाटा करणे.

(इ) भराव घालणे.

(फ) प्रतवार आराखडा तयार करणे.

आम्ही कष्टकरी संघटनेचे लोक आणि इतर काही संघटना निरनिराळया प्रत्येक तालुक्यातील पाच-दहा गावात प्रायोगिकतेचा एक भाग, नमुना म्हणून हे काम सुरू करण्यास तयार आहोत. ठाणे जिल्ह्याच्या डहाणू व तलासरी या दोन तालुक्यात आम्ही या प्रयत्नात यशस्वी होऊन दाखवू. रोजगार हमी योजना एका बाजूने जास्तीत जास्त श्रमप्रधान करणे व दुसऱ्या बाजूने समाजाच्या दृष्टीने करणे या कामाचे आव्हान स्वीकारण्यास आम्ही तयार आहोत.

अशा कामामधून गरीब, छोटया व जेमतेम उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना फायदा मिळतो. त्यांच्या उत्पादन शक्तीत वाढ होते. जमीनीचा विकास होतो व ती अधिक उत्पादन देते. यामुळे अशी कामे काढून देशासाठी अधिक धान्योत्पादन करणे शक्य होईल. यातून रोजगार हमी योजनेवरील लोकांचे अवलंबीत्व हळूहळू कमी होत जाईल. अधिकाधिक आदिवासी प्रमुख राष्ट्रीय प्रवाहात येतील. त्यांचा कर्जबाजारीपणा कमी होऊन त्यांना मानाने जगता येईल.

### जल संपत्ती

गेल्या वर्षी २१ जून ८० रोजी दुपारी बारा वाजता मुसळधार पाऊस सुरू झाला तो २२ जूनच्या पहाटेपर्यंत कोसळतच होता. केवळ चौदा तासात सुमारे सोळा इंच पाऊस पडला. वर्तमानपत्रांनी पुरेशा व चांगल्या पाऊसाची बातमी प्रसारित केली. परंतु या पावसाचा परिणाम भयानक होता. या पावसाने बांध बंधारेच नव्हे तर पेरा व पेरा करण्यासाठी तयार केलेली जमीन उध्वस्त केली. सर्वत्र पूर आले व त्यांनी दहा वर्षात केलेल्या कामाचे वाटोळे केले. यामुळे तथाकथित 'पुरेशा' पावसामुळे गरीब अधिकच दरिद्री बनले. दहा दिवस पाऊस पडला व त्यानंतर एक महिना पाऊसाने दडी मारली. असे नेहमी घडते.

वरील घटना तपशीलवार सांगून आम्ही पावसाचा लहरीपणा व अनिश्चितपणा या घटनेकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. यामुळेच अशा पाण्याला योग्य वळण देवून जल संपत्तीचा वापर व्हावा म्हणून रोजगार हमी योजनेखालील कामे तातडीने राबवली जावीत या अत्यंत जरुरीच्या समस्येकडे आम्ही आपले लक्ष केंद्रीत करु इच्छितो. ही संकल्पनाही तशी नवीन नाही परंतु मनापासून त्याची कार्यवाही नाही. त्यामुळे आपल्याला वाया जाणाऱ्या पाण्याबरोबर लोकांच्या आशा आकांक्षा वाहत नेणाऱ्या व समुद्राला मिळणाऱ्या प्रचंड प्रमाणावरील पाण्याचा वापर करावयाचा असेल तर या कार्यक्रमाचा भाग म्हणून समाजाच्या व राष्ट्राच्या दृष्टीने किफायतशीर ठरणारी कामे हाती घेता येतील व ती तशी घेतली पाहिजेत.

या कार्यक्रमाद्वारे आम्ही मोठ्या वा मध्यम जलसिंचन योजना सूचवू इच्छित नाही. आम्ही त्याच्या विरूद्ध आहोत. कारण अशा योजना आदिवासींना भूमिहीन करतात व त्यांना हुसकावून लावतात. जंगलाखालील जमिनीचे मोठे पट्टे उध्वस्त करतात व दूरच्या काळात निसर्गात प्रचंड असमतोल निर्माण करतात. या कारणामुळे काही शास्त्रज्ञांच्या मते धरणीकंपही होतात व असल्या योजनांचा फायदा केवळ शहरी लोकांना होतो. त्यामुळेच मुख्यतः प्रथम छोट्या व जेमतेम तग धरुन राहिलेल्या शेतकऱ्यांना तसेच मोठे शेतकरी व राष्ट्राला फायदेशीर ठरणाऱ्या जलयोजना आम्ही सुचवू इच्छितो.

(ड) कुशलतेचे शिक्षण

सतत वाढणारी प्रचंड बेकारी ही दीर्घकाळची खरी राष्ट्रीय समस्या आहे. यामुळेच रोजगार हमी योजना ही वाढत जाणारी बेकारीच्या समस्येवरील एक तात्कालीक व अपुरे उत्तर ठरण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेतल्यामुळेच आम्हाला असे वाटते की आदिवासींना काही कौशल्ये शिकवून त्यांच्या तरुणांत स्वतंत्रपणे रोजगार मिळवण्याची कुवत निर्माण केली पाहिजे. या कामाची सुरुवात कोठून व कशी करावयाची ते ठरविण्यासाठी लोकांनी व तज्ज्ञ मंडळींनी विचार विनिमयासाठी एकत्र बसले पाहिजे.

निष्कर्ष – आम्ही ज्या गोष्टी विसरलो त्या संबंधी. आज भाजीपाल्याची किंमत चार रुपये किलोपेक्षा कमी नाही. रोजगार हमी योजनेखाली मजुरांना केवळ तीन रुपये मजुरी मिळते. ही गफलत दूर झाली पाहिजे. त्यामुळे किमान वेतन दिवसाला सात रुपयाएवढे वाढले पाहिजे. तसेच कामाचा दर्जा व बोजा लक्षात घेऊन अधिक वेतनही दिले पाहिजे. वाढत्या किंमतीमुळे केवळ जगणे ही बाबही आश्चर्यकारक ठरत आहे.

रोजगार हमी योजनेसंबंधी आमचे मापन व काही शिफारशी आम्ही मांडल्या आहेत. आम्हाला या योजनेत बरीच शक्ती जाणवते व म्हणून त्याचा अधिकाधिक लाभ उठवण्यासाठी आम्ही सहकार्य व मदत करायला तयार आहोत.

(कष्टकरी संघटनेकरिता)

---

# ॥ आंधळेपणा ॥

आंधळीच श्रद्धा आणि आंधळे रिवाज
युगे युगे जपतो आहे, आंधळा समाज ॥ धृ ॥

देव्हाऱ्यात दगडोबाची, भक्तीभावे पूजा
माणसात माणसाने, केला भाव दूजा
जप तप करितो कोणी, पढतो नमाज ॥ १ ॥

सत्य काय सांगत असता आजचे विज्ञान
चंद्र-ग्रहणात वेडे, करीतात स्नान
जाईनाच 'बाट' करा, कितीहि इलाज ॥ २ ॥

पिंडदानासाठी ठरतो, कावळाच बाप
गंगेमध्ये न्हाता म्हणती, जाय सारे पाप
ब्रह्मपुत्रा हस्ते होती, सर्व काही काज ॥ ३ ॥

मानतात देवाजीने केले चारवर्ण
'वर्ग व्यवस्थेचे' त्यांवर चढवून स्वर्ण
किर्तनात दृष्टांताने, सांगे महाराज ॥ ४ ॥

धर्म-कर्म-कांडावरती, करिताच हल्ला
'दुखावल्या भावना' हे करितात गिल्ला
'श्याम' देश एकतेला, हेचि धोकेबाज ॥ ५ ॥

– मा. तु. खैरकर (श्याम)

# ' मूक संस्कृती बोलकी झाली...'

चंद्रकांत वानखेडे


छात्र युवा संघर्ष वाहिनीच्या राष्ट्रीय समितीच्या धोरणानुसार सघन क्षेत्रामध्ये काम करण्याचा निर्णय घेतला. एखाद्या विशिष्ट क्षेत्रामध्ये काम करायचे तर कोणत्या क्षेत्रामध्ये हा सर्वप्रथम प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला. विचारांती यवतमाळ जिल्ह्यातील मेटीखेडा परिसर हे कामाचे क्षेत्र म्हणून निवडले. हा परिसर निवडण्यामागे खालील कारणे प्रामुख्याने होती.

इजारदारी अवशेष आजही ह्या परिसरात मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असल्यामुळे जमिनीचे केंद्रीकरण काही नेमक्या मोजक्या लोकांकडेच झाले आहे.

त्यामुळे अपरिहार्यपणे भूमिहीन शेतमजुरांची संख्या विदर्भातील इतर जिल्ह्यांपेक्षा या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आढळून येते.

हा परिसर आदिवासी बहुसंख्य असा आहे. यामध्ये कोलाम, गौड, गवार, लमाणी, परधान इ. मागासलेल्या आदिवासी जमातींचा प्रामुख्याने समावेश आहे.

वरील तीन प्रमुख कारणांमुळे व योगायोगाने मेटीखेडा येथील हायस्कूलमध्ये माझ्या पत्नीला नोकरी मिळाल्यामुळे जुलै, १९८० पासून येथे येऊन राहण्यास सुरुवात केली. कोणत्याही प्रकारच्या कार्यक्रमांची किंवा कृतीची आखणी न करता केवळ ह्या भागामध्ये रहावयाचे, डोळसपणे येथील परिस्थितीची पहाणी करायची, येथील समाजात असलेले ताणतणाव, राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक संबंधीची परस्पर विरोधांची जाणीव करून घ्यावी व मुख्यत: येथील परिस्थितीशी आपली ओळख व्हावी एवढाच उद्देश आपल्याला गरीबवर्गामध्ये वाहून त्यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करून वर्गीय आधारावर त्यांच्या संगठना बांधावयाची आहे ही दृष्टी ठेवून येथे कोणत्याही कार्यक्रमाचे नियोजन न करता रहावयास सुरुवात केली.



ज्या गरीब वर्गामध्ये आपल्याला काम करावयाचे आहे, त्यांच्याशी संवाद साधणेच कठीण काम वाटत होते. मी बोलतो ती भाषा व त्यांची संस्कृती ह्यामध्ये मेळच बसत नव्हता. म्हणून सर्वप्रथम ह्या मूक संस्कृतीला बोलकी करणे अतिशय महत्त्वाचे पण तेवढेच जिकरीचे आहे याची जाणीव पदोपदी होत होती. चेतनाशून्य व आकांक्षाहीन माणसांमध्ये चेतना जागृतीचे काम करणे म्हणजे फार मोठे आव्हान आहे.

## शेतमजुरांचे प्रश्न

विदर्भामध्ये कापसाला ७०० रुपये मिळालेच पाहिजे ही मागणी घेऊन शेतकऱ्यांचे आंदोलन तापत होते. २० नोव्हेंबर १९८० ला शेतकऱ्यांचा अभूतपूर्व असा " चक्का जाम " झाला. ह्या चक्का जाममध्ये आमच्या येथील जमिनदारांनी हिरीरीने भाग घेतला. छोट्या कास्तकारांनाही त्यांनी त्यात खेचले व शेतमजुरांनाही शेळ्यामेंढ्यासारखे हाकलत नेले. शेतमजुराला ७ रुपये मजुरी मिळालीच पाहिजे ह्या मागणीचाही त्यात अंतर्भाव होता. त्या आंदोलनाने ग्रामीण भाग ढवळून निघाला. प्रथमच शेतमजुरांच्या मनात काही प्रश्न निर्माण झाले.

शेतकऱ्यांना ठरवून दिलेला हमीभाव आज परवडत नाही. पण शेतमजुरांना सरकारने ठरवून दिलेली

मजुरीही शेतकऱ्यांकडून दिली जात नाही. शेतमजुरांना सात रुपये रोज मिळालाच पाहिजे पण हा रोज कोण देणार ? सरकार का कास्तकार (शेतकरी) आणि जर कास्तकार हा रोज देणार असतील तर ह्यासाठी रस्त्यावर येऊन सात रुपये रोज मिळालाच पाहिजे ही बोम्ब का ? दीड ते दोन रुपये महिलेला मजुरी आणि माणसाला चार रुपये रोज. हा रोज ह्या महागाईच्या जमान्यात कसा पुरणार ?

आम्ही सामूहिक केले. त्या प्रश्नाला संगठीत केले आणि ह्या सामूहिकतेतून आणि संगठीत प्रश्नातून ह्या परिसरातील शेतमजुर आंदोलनाने पेट घेतला.

१३ डिसेंबर १९८० ला मेटीखेडा येथे शेतमजुरांची जाहीर सभा झाली. शेतमजुरांच्या मजुरीची मागणी ह्या दरम्यान घेऊन लढा उभारणे शक्य नव्हते. कारण शेतीवरील बहुतांशी कामे संपलेली होती. त्यामुळे त्यावेळेस सालदारांचा प्रश्न हाती घ्यावा व त्यांना सर्व

## ‘.......बाकी मजेत आणि मस्तीत !’

प्रिय मित्र,

जेव्हा कामाला सुरुवात केली तेव्हा माझ्या एकटेपणाच्या मर्यादा मला जाणवू लागल्या. त्यामुळे इतरही बाहेरच्या साथींनी यामध्ये लक्ष घालावे असेही मी वारंवार सुचवित होतो. त्याला प्रतिसाद म्हणून देवकुमार वाचीकवार व प्रकाश बोनगीरे या परिसरात जाऊन-येऊन असत.

कालांतराने केवळ जाऊन-येऊन त्यांचे असणे पुरेसे नाही हेही जाणवायला लागले. कारण जोपर्यंत कार्यकर्ता तेथील माणसांमध्ये मिसळत नाही, त्यांच्याशी एकरूप होत नाही तोपर्यंत तेथील परिस्थितीचे आकलन येण्याला, कार्यक्रमांचा शोध घेण्याला मर्यादा पडतात हे प्रकर्षाने जाणवायला लागले. त्यामुळे त्यांनी यावयाचेच असेल तर परिसरात येऊन राहावे अशी मी त्यांना विनंती केली. त्या विनंतीला प्रतिसाद म्हणून देवकुमार वाचीकवार ह्यांनी या परिसरात रहायला सुरुवात केली.

कामात असतांना, आंदोलन सुरू असतांना आर्थिक चणचण नेहमीप्रमाणे जाणवायची ती आता तीव्र स्वरूपात जाणवते. आता या कामाला केवळ आपल्या हार्दिक शुभेच्छा असूनही भागणार नाही तर आर्थिक सहाय्यतेचाही हात देण्याची आवश्यकता आहे.

आम्ही करतो त्या प्रकारचे काम विविध जिल्ह्यात संघर्ष वाहिनीचे कार्यकर्ते करताहेत. सोलापूरला भाग्यवान शिंदे हा तेथील चादर कामगारांमध्ये, सातारा जिल्ह्यात म्हसवड येथे विजय सिंहा तेथील शेतमजुरांमध्ये, भिमराव म्हस्के धुळे जिल्ह्यात आदिवासींमध्ये, मच्छींद्र ताडे जायकवाडी प्रकल्पावर रोजंदारीने काम करणाऱ्या मजुरांमध्ये अशा किती माणसांची नावे घ्यावीत. आज त्यांना दोन वेळेला तर सोडा एक वेळेच्या जेवण्याची व्यवस्थादेखील होणे शक्य नसेल तर ही गोष्ट तुम्हाला–आम्हाला शरमेची बाब आहे असे मला वाटते. केवळ आपण त्यांचे कौतुक करावे एवढ्यानीच त्यांचा आर्थिक प्रश्न सुटेल का ?

ह्याबाबत आम्ही आपल्यांकडून मासिक नियमीत निधीची अपेक्षा करतो. ही रक्कम दहा रुपयाच्या वर असावी. दर महिन्याला नियमितपणे आपण आपल्या सामाजिक जबाबदारीचा आर्थिक हिस्साठरवून घ्यावा. दर महिन्याला नियमीतपणे निश्चित रक्कम देणे शक्य नसेल तर एकदम वार्षिक रक्कम आपण ठरविलेल्या हिस्स्याची पाठवू शकता....

...बाकी मजेत आणि मस्तीत,

**चंद्रकांत वानखेडे,**

मु. पो. मेटीखेडा, जि. यवतमाळ.

एक नाही असे अनेक प्रश्न शेतमजुरांच्या मनामध्ये ह्या काळात निर्माण झाले. प्रश्न परिस्थितीने निर्माण केले. त्या प्रश्नांना आम्ही वेग दिला. प्रश्न प्रत्येक शेतमजुरांच्या मनामध्ये विखुरलेल्या अवस्थेत होता त्याला

शेतमजुरांनी साथ द्यावी असे ठरले. खालील मागण्यांसाठी शेतमजुरांचा मोर्चा काढण्यात आला.

(१) किमान वेतन कायद्यानुसार १८०० रु. साल सालदारांना मिळाले पाहिजे.

(२) किमान वेतन कायद्यानुसार वर्षाच्या २४ सुट्ट्या देण्यात याव्या.

(३) सालदारांच्या कामाचे तास ७ असावेत.

(४) रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे सुरू करावीत.

वरील निवेदन ग्रामसेवकाला देण्यात आले व त्याच दिवशी प्रत्येक मालकाला शेतमजुर संघटनेच्या वतीने मागण्यांची नोटीस पाठविण्यात आली व त्याची आठ दिवसांच्या आत अंमलबजावणी झाली नाही तर सालदार संपावर जातील असा इशाराही देण्यात आला.

१९ डिसेंबर—सालदारांच्या मागण्यासंबंधी मजूर व मालक ह्यांची संयुक्त बैठक होऊन त्यामध्ये सालदारांच्या मागण्या मान्य करण्यात आल्या. १८०० रुपयाला जी काही तूट निघत असेल ती एक महिन्याच्या आत देण्याचे मान्य झाले.

ह्या घटनेचे लोण आसपासच्या खेड्यामध्ये पोहचू लागले. मेटीखेड्यावरून एक दीड मैल अंतरावर असलेल्या पालोती या गावीदेखील अशाप्रकारे व ह्याच मागण्या घेऊन २८ डिसेंबरला शेतमजुरांची सभा झाली. १० जानेवारीपर्यंत ह्या मागण्यांबाबत मालकांनी विचार करावा, अन्यथा सालदारांना 'हाथजाम' करावा लागेल असा लेखी इशारा स्थानिक शेतमजुर संघटनेच्यावतीने देण्यात आला पण त्याची कसल्याही प्रकारे दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे ११ जानेवारीपासून सालदारांचा संप सुरू झाला. ११–१२–१३ जानेवारी ८१ पर्यंत हा संप सुरू होता. १३ जानेवारीला किमान वेतन कायदा निरीक्षक ह्यांनी मध्यस्थी केली आणि मालकांनी मागण्या मान्य केल्या. पण त्या गावातील एक जमिनदार नुरअली करमअली गिलानी ह्यांनी त्या फेटाळल्या. बऱ्याचअंशी मागण्या मान्य झाल्यामुळे संप मागे घेण्यात आला. त्यानंतर जिल्हा कामगार अधिकारी ह्यांना नुरअली गिलानी व त्याचे सालदार ह्यांच्या-मध्ये मध्यस्थी घडवून आणण्याचा प्रयत्न केला पण त्यालाही त्या मजुरमालकाने दाद दिली नाही.

२४ फेब्रुवारी ८१ ला स्थानिक शेतमजुर संघटनेच्या वतीने नुरअली गिलानीच्या प्रतिमेचे जाहीर दहन करण्याचे ठरविले. नेहमीप्रमाणे पोलिसांनी हा कार्यक्रम हाणून पाडण्याचा प्रयत्न केला. आम्हांला आदल्या रात्रीच अटक करण्याचा प्रयत्न झाला पण त्या दिवशी आम्ही त्यांच्या हाती पडलो नाही. ह्याच दरम्यान नुरअल्ली गिलानीने धर्माचा आधार घेण्यास सुरवात केली. मुस्लीम माणसाच्या प्रतिमेचे का होईना दहन करणे म्हणजे मुस्लिमांच्या धार्मिक भावना दुखविण्या-साठी हा प्रयत्न केला जात आहे असा कांगावा त्याने केल्यामुळे आर्थिक लढ्याला धार्मिक स्वरूप येऊ नये म्हणून केवळ पुतळा काढण्यात आला. त्याचे दहन करण्याचा कार्यक्रम मागे घेण्यात आला. पण एकंदरीत कार्यक्रमाचा प्रभाव व परिणाम तेवढा साधला गेला. हा मोर्चा व सभा मोहदा ह्या गावी झाला होता. त्या-मध्ये आसपासच्या दहा ते पंधरा गावच्या शेतमजुरांनी भाग घेतला. लढा प्रत्यक्षात दोनच गावात दिला गेला. पण त्याचे परिणाम व पडसाद आसपासच्या १५ ते २० गावांमध्ये झाला. लढ्याचे झालेले प्रत्यक्ष परिणामः—

(१) मेटीखेडा, पालोती ह्या गावातील १५० साल-दारांना सरासरी वर्षाला १३०० ते १४०० रु. साल पडायचे. ही तूट जर धरली तर त्या लढ्यामुळे १५० सालदारांना ३० ते ४० हजार रुपये तुटीची रक्कम म्हणून ताबडतोबीने द्यावी लागली.

(२) दर गुडीपाडव्याला (आमच्याकडे त्याला मांडवत म्हणतात) नवीन सालदार ठेवले जातात किंवा जुन्यामध्ये नवीन करार होतो. लढ्यापूर्वी ह्या परिसरात ५०० रुपये साल (रोख) व वर्षाची ७२० किलो ज्वारी वस्तुमध्ये, असे सर्वसाधारणतः साल असावयाचे. ह्या लढ्यानंतर ह्या परिसरातील २० ते २५ गावामध्ये सरासरी साल १२०० रु. रोख व वर्षाची ७२० किलो ज्वारी इतके वाढले म्हणजे रोख-मध्ये ७०० ते ८०० रु.नी वाढ झाली व त्यात ज्वारीची वाढलेली किंमत धरली तर १००० ते १५०० रु.ने सालदारांच्या सालामध्ये वाढ झाली.

१. शेत मजुरांमध्ये असलेल्या संग्रहीत शक्तीचे भान त्यांना झाल्यामुळे एकी केली, संघटना केली तर आपण काही मिळवू ह्याची जाणीव त्यांना झाली,

२. त्या परिसरातील जमीनदारांच्या शेतमजुरांच्या मनातील दरारा बऱ्याच अंशी कमी झाला. आज खुले-आमपणे त्यांच्याविषयी ते बोलतात.

३. शासनयंत्रणा (सरकारी कामगार अधिकारी वगैरे) हे केवळ नाममात्र आहेत व वेळ पडल्यास कायदा मजुरांच्या बाजूचा असूनसुद्धा ती यंत्रणा मात्र मालकधार्जिणी आहे ह्याची जाणीव झाली.

४. किमान वेतन कायद्याचा भंग करणारे जमीनदार

उजळ माथ्याने फिरतात पण त्याची अंमलबजावणी व्हावी असा आग्रह धरणाऱ्यामागे पोलिस मात्र हात धुवून लागतात. ह्याची जाणीवही ह्याना नंतर झाली. पोलीसांची असलेली भीति पूर्णतः नष्ट झालेली नसली तरीही ही भीती चेपली.

५. आम्ही कोणाच्या बाजूचे तर गरीबांच्या बाजूचे ही गोष्ट दोघांनाही (मालक व मजुरांना) स्पष्ट झाली.

६. सर्वांत महत्वाची बाब म्हणजे गरीबांची मुक-संस्कृती ही थोडी बोलकी झाली.

७. रोजगार योजनेची कामे आमच्या परिसरात लढयाच्या वातावरणाच्या रेटयाने सुरू झाली.

कोणत्याही प्रस्थापित हितसंबंधांना धक्का देणारा लढा झाला म्हणजे त्या लढयातील माणसांवर आर्थिक, शारीरिक अशा स्तरावर आघात केला जातो किंवा प्रयत्न केले जातात तसेच प्रयत्न याही बाबतीत झाले. जे सालदार मजूर पुढाकार घेऊन काही करीत असतील त्यांना कामावर घ्यावयाचे नाही. त्यांना सालदार म्हणून घ्यायचे नाही, रोजगार हमी योजनेच्या कामावर जे जात असतील तर त्यांना तेथेही काम मिळू द्यावयाचे नाही. लढयांतील प्रमुख लोकांना या ना त्या पोलीस केस खाली अडकविण्याचा प्रयत्न करावयाचा हे सर्व नित्यनेमाचे प्रकार येथेही प्रस्थापितांकडून घडून आलेत.

सालदारांच्या प्रश्नाला घेऊन, शेतमजुरांच्या सह-कार्याने हा जो लढा झाला त्याचे महत्त्व प्रथम टप्यामध्ये असले तरीही त्यातील बऱ्याच उणीवा आम्हाला जाणवत होत्या, पण आपल्यासमोर मांडणे अत्यावश्यक आहे. वृत्तपत्रांनी ह्या लढयाला तसे बरेच उचलून धरल्यामुळे ह्याचा गवगवा बराच झाला. त्यामुळे आम्ही खूप काही तरी मोठे काम केले आहे असा गैरसमज झाला असण्याची दाट शक्यता आहे. पण ती वस्तुस्थिती नाही.


१. एकतर लढा आम्ही सुरू केला नाही. शेतकरी आंदोलनाने जे प्रश्न निर्माण केले त्याला आम्ही केवळ वेग दिला. त्यामुळे परिस्थितीलाच ह्याचे श्रेय मोठ्या प्रमाणात जाते.

२. ह्या आंदोलनामध्ये आम्ही स्त्रियांना सहभागी करून घेऊ शकलो नाही. स्त्रियांच्या सहभागाचा अभाव ही फार मोठी उणीव ह्या लढयामध्ये आम्हाला जाणवत होती. त्यांच्या सहभागाच्या दिशेने आम्ही प्रयत्नही केले पण ते तोकडे पडले.

३. सालदाराच्या प्रश्नाला घेऊन लढताना शेतमजूर संघटना स्थापन केली. तो प्रश्न सुटला आणि शेतमजूर संघटना संपली असा काहीसा प्रकार घडला. एकतर त्या संघटनेची रचना कशी असेल, तिचा आधार काय असेल, तिच्यावरील सदस्यांची गुंफण कशी राहील ह्याविषयी आमच्याही मनात प्रश्न असल्यामुळे शेतमजुरांच्या शक्तीला ठोस संघटनेचे स्वरूप देण्यात आम्ही अयशस्वी झालो.

४. संपूर्ण लढयामध्ये मी व जगदीश दुबे हे 'हिरो' झालो. कार्यकर्त्यांशी पाहिजे त्या प्रमाणात फळी निर्माण करू शकलो नाही. जी काही कार्यकर्ते मंडळी त्या लढया-मधून समोर आलीत त्यांच्या प्रशिक्षणासाठी त्यांचा व्यापक सहभाग वाढविण्याच्या दिशेनेही आम्हाला अपयशच आले. त्यामुळे टीम अशी निर्माण झाली नाही.

५. ग्रामीण परिसरामध्ये सातत्याने चालविल्या जाऊ शकणाऱ्या कार्यक्रमांचा शोध घेण्याची क्षमता आमच्या-मध्ये नाही की काय असे वाटू लागले आहे. अशा कामांचा, अशा कार्यक्रमांचा शोध आम्हाला आहे की जी कामे हळूवारपणे चालतील, वरकरणी जी निरुपद्रवी वाटतील पण त्यामधून निर्माण होणारी शक्ती पुढे होणाऱ्या लढयाच्या उपयोगी येईल व समाज-परिवर्तनाच्या दिशेने लढा पुढे नेता येईल. जे काही दोष जाणवले ते सांगण्याचा वर प्रयत्न केला आहे.





# ' रोजगार हमी 'संबंधी

# १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम २०

**महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण क्षेत्रांत, अकुशल अंग-मेहनतीचे काम करण्यासाठी स्वत: होऊन तयार असलेल्या सर्व प्रौढ व्यक्तींना रोजगाराची हमी देऊन त्यांना काम मिळण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**रोजगार हमी योजनेची आवश्यक वैशिष्टये पुढील-प्रमाणे असतील :**

(१) या योजनेखाली केवळ उत्पादक कामेच हाती घेतली जातील.

(२) या योजनेखाली हाती घेतलेली कामे ग्रामीण क्षेत्रांत असतील; तथापि ग्रामीण क्षेत्रांव्यतिरिक्त इतर क्षेत्रांत विवक्षित प्रवर्गाची कामे हाती घेता येतील असा राज्य शासनाने निदेश देणे विधिसंमत असेल.

(३) योजनेत, शक्य असेल तेथवर, अकुशल काम-गारांच्या कुशलतेच्या प्रशिक्षणाची आणि त्यांचा दर्जा वाढविण्याचीही तरतूद असेल.

(४) वेतन हे प्रत्यक्षपणे कामाच्या गुणवत्तेवर व प्रमाणावर अवलंबून असेल.

(५) वेतन हे दरांच्या अनुसूचीनुसार देण्यात येईल. हे प्रमाण कामाच्या वेगवेगळ्या प्रकारांसाठी, वेळोवेळी, राज्य शासनाकडून निश्चित करण्यात येईल. साक्षेपाने एका दिवशी ७ तास काम करणाऱ्या व्यक्तीस सर्व-साधारणपणे, राज्य शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात आलेल्या सर्वांत कमी क्षेत्रातील शेतमजुरांच्या किमान वेतनाइतके एकूण वेतन मिळेल अशा रीतीने दरांची अनुसूची निश्चित करण्यात येईल.

(६) योजनेअन्वये अनुज्ञेय असलेले कोणत्याही प्रकारचे काम करण्यासाठी योजनेखालील रोजगारा-साठी स्वत: होऊन तयार असलेल्या कोणत्याही व्यक्तीस समिती अधिकारी निदेश देऊ शकेल.

(७) योजनेखाली हाती घेतलेली सर्व कामे कोणत्याही कंत्राटदारामार्फत न करता विभागाकडून करण्यात येतील :

परंतु असे की, अगदी आवश्यक असेल तेथे घळी भरणे, पाझर तलाव व लहान पाटबंधारे तलाव यांच्या उत्प्लव–बांधाचा ( वेस्ट-वेअरचा ) भाग यांसारखी कुशल कामे उक्त्या कामाच्या दराच्या पद्धतीच्या-आधारावर पार पाडता येतील परंतु अकुशल काम-गारांना द्यावयाचे वेतन योजनेनुसार विहित करण्यात आलेल्या कामांनुसार असेल.

(८) खाजगी जमिनीवर या योजनेखाली ज्या कामांचा प्रत्यक्ष लाभ त्या जमिनीच्या धारकांना होणार आहे अशी कामे हाती घेण्यात येतील तेव्हा, त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही काय-द्याच्या तरतुदीखाली किंवा कोणत्याही कार्यकारी आदेशांखाली अशा धारकांना अशा कामांबाबत अर्थ-सहाय्य मिळण्याचा हक्क आहे अशी वस्तुस्थिती असली तरी, आस्थापनेच्या खर्चाइतके परंतु कामाच्या खर्चाच्या ३३⅓ टक्क्यांपेक्षा अधिक होणार नाही इतके अर्थसहाय्य रोजगार हमी निधीतून दिले जाईल.

(९) जिल्ह्यातील शेतीच्या नेहमीच्या कामांवर प्रतिकूल परिणाम होणार नाही आणि एका बाजूने किमान वेतनावर हमीचे काम देण्याचे तत्त्व व दुसऱ्या बाजूने शेतीच्या कामासाठी असणाऱ्या मजूरविषयक

# हे राज्य ठरावे नंदनवन गरिबांचे !

महाराष्ट्र शासनाचा संपूर्ण कार्यक्रम समस्त गरीब जनतेच्या सर्वांगीण कल्याणासाठीच आखण्यात आला आहे. विकासाचा जास्तीत जास्त वाटा गरिबांना मिळावा हा त्यामागचा हेतू आहे.

हे उद्दिष्ट साधण्यासाठीच लहान शेतकऱ्यांची व्याख्या नुकतीच बदलण्यात आली आणि ६ हेक्टरांपर्यंत (१५ एकर) कोरडवाहू जमीन बाळगणाऱ्या किंवा ज्यांचा एकूण शेतसारा १५ रुपयांपर्यंत आहे अशा शेतकऱ्यांचा समावेश लहान शेतकरी ह्या सदरात करण्यात आला. बहुसंख्य शेतकरी आता ह्या सदरात मोडतील व लहान शेतकऱ्यांना मिळणारे सर्व लाभ आणि सवलती त्यांना प्राप्त होतील.

ज्यांचे कोणी नाही अशांना मदतीचा हात देणारी संजय गांधी निराधार अनुदान योजना, तसेच बेकार तरुणांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास सहाय्य करणारी संजय गांधी स्वावलंबन योजना ही शासनाच्या उपक्रमाची इतर महत्त्वपूर्ण अंगे आहेत. भूमिहीन मजुरांसाठी सहकारी तत्त्वावर फलोद्यान वसाहती स्थापन करणे हा असाच आणखी एक उपक्रम.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपल्या प्राणांचे मोल दिले अशा थोर हुतात्म्यांची स्मृति चिरंतर राहण्यासाठी राज्यात २०४ ठिकाणी उभारण्यात यावयाच्या स्मारकांच्या भूमिपूजनाचा शुभारंभ मुंबईत ९ ऑगस्ट रोजी करण्यात आला. त्याबरोबरच हुतात्म्यांच्या निकटच्या नातेवाइकांना आर्थिक मदत देण्याची योजनाही अंमलात आली. संपूर्ण देशात एकमेवाद्वितीय असलेल्या ह्या योजनेतून ज्यांचा समाजास आजवर विसर पडला अशा व अपेक्षित आणि गरजू लोकांबाबतची शासनाची बांधिलकी स्पष्टपणे प्रत्ययास येते.

पंतप्रधानांच्या वीस कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी येथे राज्याच्या पंचवार्षिक योजनेबरोबर जोमदारपणे करण्यात येत आहे. ह्या दोन्हींमध्ये बरेच साधर्म्य आहे. ह्या जोमदार अंमलबजाणीमुळे न्यायावर अधिष्ठित असा समाज निर्माण करण्याचे अंतिम उद्दिष्ट गाठण्यासाठी राज्यात अव्यहात सुरू असलेल्या निर्धारपूर्वक महान प्रयत्नांचे यथार्थ दर्शन घडून येते.

ज्यांचा प्रखर त्याग व थोर बलिदान ह्यामुळे आपण आज स्वातंत्र्याची फळे चाखीत आहोत अशा समस्त गरीब जनतेबाबतचे आपले कर्तव्य निर्धाराने व सर्व शक्तीनिशी पार पाडण्याची आजच्या ह्या पवित्र दिनी आपण सर्वजण पुन्हा एकवार प्रतिज्ञा करू या आणि कृतनिश्चयाने म्हणू या !

## *हे राज्य ठरावे नंदनवन गरिबांचे !*

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

गरजा, त्याचप्रमाणे राज्य शासनाची नेहमीची योजनांतर्गत व योजनेतर अशी जी कामे असतात त्यांच्या अंमलबजावणीसाठी असणाऱ्या मजुरविषयक गरजा यांमध्ये समतोल राखला जाईल, अशा रीतीने जिल्हाधिकाऱ्यांकडून या योजनेखाली हाती घेण्यात येणाऱ्या कामाचे आयोजन करण्यात येईल.

(१०) कामांचा दर्जा योग्य राखण्याची खात्री करण्यासाठी, त्याचप्रमाणे कोणतेही काम पूर्ण करण्यासाठी दिलेले एकूण वेतन हे केलेल्या कामाच्या दर्जाशी व परिणामाशी प्रमाणशीर आहे याची खात्री करण्यासाठी राज्य शासन या योजनेखाली हाती घेण्यात आलेल्या कामांचे नियतकालिक निरीक्षण करण्याची तरतूद योजनेमध्ये करील.

(११) योजनेखाली रोजगारावर लावलेल्या कोणत्याही व्यक्तीला तिच्या रोजगारामुळे आणि ती रोजगारावर असताना झालेल्या अपघातामुळे कोणतीही वैयक्तिक इजा पोहोचली असेल तर, त्या व्यक्तीला योजनेनुसार अनुज्ञेय असतील असे वैद्यकीय उपचार विनामूल्य करून घेण्याचा हक्क असेल आणि अशा व्यक्तीस रुग्णालयात ठेवणे आवश्यक असेल तेव्हा राज्य शासन जागा, उपचार व आहार याबरोबरच त्या व्यक्तीला रुग्णालयामध्ये ठेवण्याची व्यवस्था करील. त्या व्यक्तीवर रुग्णालयामध्ये उपचार करण्यात येत असतील त्या कालावधीमध्ये त्या व्यक्तीला, खंड (सात) मध्ये निर्देशिलेल्या किमान वेतनाच्या निम्मे इतक्या दराने वेतन मिळण्याचा हक्क असेल अशी व्यक्ती मरण पावल्यास, तिच्या कायदेशीर वारसांना योजनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या रीतीने अनुग्रहपूर्वक प्रदान म्हणून पाच हजार रुपये देण्यात येतील. अशी व्यक्ती विकलांग झाली तर तिला योजनेनुसार ठरविण्यात येईल त्याप्रमाणे रक्कम अनुग्रहपूर्वक प्रदान करण्यात येईल परंतु अशा प्रकरणामध्ये अशा प्रदानाची रक्कम पाच हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही,

(१२) राज्य शासन शक्य असेल तेथवर जल विभाजक क्षेत्राच्या (वॉटर शेडच्या) तत्त्वावर जमीन विकासाचे व्यापक कार्यक्रम हाती घेईल. अशी कामे शक्यतोवर, अशा कामांवर लावलेल्या मजुरांच्या गावापासून पाच किलोमीटरच्या परिसरात पुरवण्यात येतील.

(१३) अशा रीतीने तयार करण्यात आलेली योजना शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल. आणि तिचा सारांश राज्य शासन ठरवील अशा प्रत्येक जिल्ह्यात अधिक खप असणाऱ्या स्थानिक वृत्तपत्रातून देखील प्रसिद्ध करण्यात येईल. ●

# रोजगार हमी संबंधीच्या महत्त्वाच्या सरकारी आदेशातील काही भाग

## महाराष्ट्र रोजगार हमी नियम-२७ जानेवारी १९७९ प्रमाणे–

**३. हत्यारे, अवजारे व सुरुंगाची दारू यांचा पुरवठा –** (१) या योजनेखाली घेण्यात येणाऱ्या कामांवर, कामगारांना लागणारी अवजारे व हत्यारे राज्य शासन पुरवील व अशा हत्यारांस, धार लावण्याचा खर्च शासन सोशील. मजुरांनी स्वतःची अवजारे व हत्यारे आणल्यास त्या मजुरांस राज्य शासन वेळोवेळी ठरवील त्या दराने त्यांनी आणलेल्या अवजारांच्या व हत्यारांच्या भाड्यापोटी अधिक मजुरीच्या रूपाने पैसे देईल. कामगार वापरत असलेल्या हत्यारांस व अवजारांस वेळोवेळी धार लावणे आवश्यक असेल व ते शासनाच्या खर्चाने होत नसेल तर राज्य शासन वेळोवेळी ठरवील त्या दरांनी धार लावण्याचा खर्च कामगारांना दिला जाईल.

(२) काम चालू असताना कठीण खडक लागल्यास भोक पाडण्यासाठी व सुरुंग लावून फोडण्यासाठी लागणारी सुरुंगाची दारू राज्य शासन पुरवील.

**४. नोंदणी प्राधिकारी –** पंचायत समिती क्षेत्राचा समिती अधिकारी जिल्हाधिकाऱ्यांशी विचारविनिमय करून प्रत्येक गावासाठी ('क' वर्ग नगरपरिषदेचे क्षेत्र

धरून) पंचायत समिती क्षेत्रात काम करणाऱ्या तलाठी, ग्रामसेवक व सहायक ग्रामसेवकांमधून नोंदणी अधिकाऱ्याची नेमणूक करील.

**५. रोजगारासाठी नावांची नोंदणी करणे** – (१) ग्रामीण भागात राहणाऱ्या आणि रोजगार हमी योजनेखालील कामावर कोणतेही अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यास तयार असणाऱ्या कोणत्याही प्रौढ व्यक्तीला (म्हणजेच जी व्यक्ती १८ वर्षे वयाची आहे) नमुना क्रमांक १ मधील तपशील एका अर्जात देऊन गावच्या नोंदणी अधिकाऱ्यांकडे नावाची नोंदणी करून घेता येईल. अर्जदाराने नमुना क्रमांक १ मधील सर्व तपशील सादर केल्यास नोंदणी अधिकाऱ्याने ठराविक नमुन्यातील अर्जाचा आग्रह धरू नये. नावाची नोंदणी करू इच्छिणारी व्यक्ती लेखी अर्ज देऊ शकत नसल्यास, लेखी अर्जाचा आग्रह न धरता नोंदणी अधिकाऱ्याने त्या व्यक्तीने दिलेला तोंडी तपशील घ्यावा.

(२) नाव नोंदणीसाठी (लेखी किंवा तोंडी) अर्ज मिळाल्यानंतर रोजगार मागणाऱ्या व्यक्तीचा तपशील बरोबर असल्याबद्दल नोंदणी अधिकाऱ्याने सर्वसाधारणपणे आपली खात्री करून घ्यावी आणि त्या व्यक्तीचे वय १८ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास तिच्या नावाची नोंदणी करावी. नोंदणी अधिकाऱ्यास अर्जदाराच्या वयाबद्दल काही शंका असल्यास तो त्याबाबत पुरावा मागू शकेल व त्या बाबीवर निर्णय देऊ शकेल. कुटुंबात धडधाकट प्रौढ व्यक्ती नाही या कारणामुळे १८ वर्षांखालील परंतु १५ वर्षे वयाच्या व्यक्तीने नाव नोंदण्यासाठी अर्ज केल्यास, त्या बाबीसंबंधी स्वत:ची खात्री झाल्यावर नोंदणी अधिकारी त्या व्यक्तीचे नाव नोंदवील. नोंदणी अधिकारी रोजगार मागणाऱ्या सर्व व्यक्तींची नमुना क्रमांक २ मधील नोंदवहीत नोंद ठेवील.

(३) एखाद्या व्यक्तीची नोंदणी झाल्यावर नोंदणी अधिकारी त्या व्यक्तीस नमुना क्रमांक ३ मध्ये अहस्तांतरणीय ओळखपत्र देईल आणि ते मिळाल्याबद्दल त्या व्यक्तीची नमुना क्रमांक २ मधील नोंदवहीत सही किंवा अंगठ्याची निशाणी घेईल. यासाठी लागणारी ओळखपत्रे समिती अधिकारी पुरवील.

(४) रोजगार मागणाऱ्यांची नोंदणी तसेच ओळखपत्र देणे ही कामे विनामूल्य केली जातील.

**६. रोजगारासाठी अर्ज करण्याची पद्धती** – या योजनेखाली रोजगार मिळण्यासाठी ज्याचे नाव नोंदण्यात आले आहे आणि ज्याला रोजगाराची गरज आहे अशी व्यक्ती संबंधित पंचायत समितीचा समिती अधिकारी किंवा संबंधित गावाचा नोंदणी अधिकारी यांच्याकडे नमुना क्रमांक ४ मध्ये अर्ज करील. हा अर्ज अर्जदार जातीने समिती अधिकारी किंवा नोंदणी अधिकारी यांच्या हाती देईल. नमुना क्रमांक ४ मध्ये नमूद केलेला सर्व तपशील आणि हमी दिल्यास, विहित नमुन्यात अर्ज करावा असा आग्रह धरू नये. अर्ज स्वीकारणारा अधिकारी त्या अर्जाची पोच नमुना क्रमांक ५ मध्ये देईल. नोंदणी अधिकाऱ्याकडे आलेली रोजगार मागणीची पत्रे त्या अधिकाऱ्याने ती जसजशी येतील तसतशी, परंतु कोणत्याही परिस्थितीत, ती मिळाल्यापासून ३ दिवसांच्या आत समिती अधिकाऱ्याकडे पाठविली पाहिजेत. नोंदणी अधिकारी त्यांजकडे आलेल्या अर्जांची नोंद नमुना क्रमांक ६ मध्ये ठेवील.

**७. रोजगार पुरविणे** – समिती अधिकारी, त्यांच्याकडे आलेले किंवा नोंदणी अधिकाऱ्याने पाठविलेले रोजगार मागणीचे प्रत्येक पत्र विचारात घेईल आणि अर्जदाराचे नाव रोजगारासाठी आधीच नोंदविले आहे याबद्दल स्वत:ची खात्री करून घेईल; आणि नमुना क्रमांक ७ मधील पत्राद्वारे तो अर्जदाराला पंचायत समितीच्या क्षेत्रातील सदर योजनेखाली मंजूर केलेल्या एखाद्या कामावर जाण्याचा तत्काळ निदेश करील आणि पंचायत समिती क्षेत्रामधील कोणत्याही कामावर पाठविणे शक्य नसेल तर तो अर्जदारास त्याच जिल्ह्यातील अन्य पंचायत समिती क्षेत्रामधील कोणत्याही कामावर पाठवील. त्या पत्राची प्रत, त्या कामाच्या अंमलबजावणी अधिकाऱ्याकडेही पाठवावी. समिती अधिकाऱ्याने दिलेले पत्र मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत जर अर्जदार वरील कामावर हजर झाला तर अंमलबजावणी अधिकारी किंवा त्याचा प्रतिनिधी त्या अर्जदाराला त्या कामावर सामावून घेणे शक्य झाले नाही तर तो अधिकारी (किंवा त्याचा प्रतिनिधी) ती वस्तुस्थिती कारणसहित अर्जदाराने आणलेल्या पत्राच्या प्रतीवर नमूद करील आणि समिती अधिकाऱ्याला त्याप्रमाणे स्वतंत्रपणे कळवील. अंमलबजावणी अधिकाऱ्याकडून ही माहिती मिळाल्यानंतर समिती अधिकारी अर्जदाराला त्याच नमुन्यातील (नमुना क्रमांक ७) पत्र देऊन दुसऱ्या एखाद्या कामावर पाठवील.

**८. एखाद्या कामावर सतत रोजगार पुरविणे शक्य नसेल त्यावेळी रोजगार पुरविणे**— एखाद्या नोंदणी झालेल्या व्यक्तीच्या रोजगार मागणीच्या पत्रास अनुलक्षून समिती अधिकाऱ्याने तिला ज्या कामावर पाठविले, त्या कामास त्या व्यक्तीस अकुशल अंगमेहनतीचे काम सतत पुरविणे शक्य नाही असे अंमलबजावणी अधिकाऱ्यास आढळून आल्यास, तो अधिकारी ती वस्तुस्थिती आणि ज्या तारखेपासून अशा व्यक्तीस रोजगार देणे शक्य होणार नाही, ती तारीख, तसेच त्या व्यक्तीचे नाव व नोंदणी क्रमांक समिती अधिकाऱ्यास कळवील. अंमलबजावणी अधिकाऱ्याकडून तसा अहवाल आल्यावर समिती अधिकारी अशा व्यक्तीस तत्काळ आणि कोणत्याही परिस्थितीत ४ दिवसांच्या आत दुसऱ्या एखाद्या कामावर पाठवील.

**९. बेरोजगार भत्ता मिळण्याची पात्रता**— (१) या योजनेखाली नोंदणी केलेली आणि रोजगार मिळण्यासाठी पत्र देणारी व्यक्ती, प्रतिदिन १ रुपया किंवा राज्य शासन ठरवील त्या जास्त दराने बेरोजगार भत्ता मिळण्यास पात्र असेल, जर —

(अ) सदर व्यक्तीस कोणत्याही कामावर हजर होण्याचे निदेश असलेले समिती अधिकाऱ्याचे पत्र, त्या व्यक्तीने रोजगार मिळण्यासाठी दिलेले पत्र मिळाल्यापासून १५ दिवस पूर्ण होण्याचे अगोदर निर्गमित करण्यात आले नाही तर (अशा प्रकरणी ती व्यक्ती रोजगार मिळण्यासाठी पाठविलेले पत्र नोंदणी अधिकाऱ्यास किंवा समिती अधिकाऱ्यास मिळाल्यापासून १५ दिवसानंतर व कोणत्याही कामावर हजर होण्याचे निदेश असलेले समिती अधिकाऱ्याचे पत्र निर्गमित होईपर्यंतच्या काळासाठी) बेरोजगार भत्त्यास पात्र राहील; किंवा

(ब) समिती अधिकाऱ्याने सदर व्यक्तीस ज्या कामावर पाठवले, त्या कामावर सतत रोजगार पुरविणे शक्य नाही ही बाब अंमलबजावणी अधिकाऱ्याने समिती अधिकाऱ्यास कळविल्यानंतर समिती अधिकाऱ्याने त्या व्यक्तीस अंमलबजावणी अधिकाऱ्याकडून तत्संबंधीचे पत्र मिळाल्यापासून ४ दिवसांच्या आत दुसऱ्या एखाद्या कामावर पाठविण्याचे निदेश असलेले पत्र निर्गमित केले नाही तर (या प्रकरणी ती व्यक्ती अंमलबजावणी अधिकाऱ्याचे पत्र समिती अधिकाऱ्यास मिळाल्यापासून ४ दिवसानंतर व दुसऱ्या एखाद्या कामावर पाठविल्याचे पत्र निर्गमित होईपर्यंतच्या काळासाठी) बेरोजगार भत्त्यास पात्र राहील; किंवा

(क) समिती अधिकाऱ्याचे कामावर हजर होण्याचे पत्र मिळाल्यापासून ७ दिवसाचे आत सदर व्यक्ती कामावर हजर होण्यासाठी गेली असता अंमलबजावणी अधिकाऱ्याने तीस कामावर सामावून घेतले नाही तर (अशा प्रकरणी सदर व्यक्ती रोजगार मिळण्यासाठी दिलेले पत्र मिळाल्यापासून १५ दिवसानंतर व दुसऱ्या एखाद्या कामावर हजर होण्याचे आदेश निर्गमित होईपर्यंतच्या काळासाठी) बेरोजगार भत्त्यास पात्र राहील; किंवा

(ड) एखाद्या कामावर सतत रोजगार पुरविणे शक्य नसल्यामुळे दुसऱ्या एखाद्या कामावर हजर राहण्यास सांगितल्याचे समिती अधिकाऱ्याचे पत्र मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत ती व्यक्ती त्या दुसऱ्या कामावर हजर होऊन तीस त्या कामावर सामावून घेतले नाही तर (अशा प्रकरणी सदर व्यक्ती, पहिल्या कामावर सतत रोजगार पुरविणे शक्य नसल्याबद्दलचे पत्र मिळाल्यापासून ४ दिवसानंतर व अन्य कामावर हजर राहण्याचे निदेश असलेले पत्र निर्गमित होईपर्यंतच्या काळासाठी) बेरोजगार भत्त्यास पात्र राहील.

(२) मात्र उपरोक्त निर्देशित बेरोजगार भत्ता मिळण्याचा हक्क खालील अटीस अधीन असेल:—

(अ) पाऊस किंवा असाधारण नैसर्गिक आपत्ती यासारख्या माणसाच्या आटोक्याबाहेरील परिस्थितीमध्ये रोजगार पुरविण्यास राज्य शासन असमर्थ असेल (म्हणजेच, रोजगार मागणाऱ्यास कामावर हजर होण्याचे निदेश असलेले पत्र समिती अधिकारी निर्गमित करण्यास असमर्थ असेल किंवा अंमलबजावणी अधिकारी समिती अधिकाऱ्याने पाठविलेल्या व्यक्तीस कामावर सामावून घेण्यास असमर्थ असेल किंवा कामे अंमलबजावणीसाठी घेण्यास किंवा चालू असलेले काम चालू ठेवण्यास असमर्थ असेल) तर बेरोजगार भत्ता देण्याचे बंधन राज्य शासनावर असणार नाही.

(ब) एखाद्या व्यक्तीस कामावर हजर होण्यास सांगितल्यावर जर ती व्यक्ती ७ दिवसांच्या आत कामावर रुजू झाली नाही, किंवा अंमलबजावणी अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय सतत एक सप्ताहापेक्षा अधिक कालावधीकरिता गैरहजर राहिली किंवा तिचा कोणत्याही एका महिन्यातील गैरहजेरीचा एकूण

कालावधी एक सप्ताहापेक्षा जास्त झाल्यास अशी व्यक्ती ३ महिन्यांच्या कालावधीकरिता बेरोजगार भत्ता मिळण्यास अपात्र ठरेल. म्हणून एखाद्या व्यक्तीने बेरोजगार भत्ता मिळण्याची मागणी केल्यास ती व्यक्ती बेरोजगार भत्त्याची मागणी केलेल्या कालावधीच्या लगतपूर्वीच्या ३ महिन्यांच्या कालावधीत केव्हाही वरील निर्देशिलेल्या एखाद्या कारणामुळे बेरोजगार भत्ता मिळण्यास अपात्र होती काय याची खात्री करून घ्यावी.

(क) एखाद्या व्यक्तीने रोजगार असतानासुद्धा बेरोजगार भत्ता मिळण्यासाठी मागणी करून तो घेतल्याचे दृष्टोत्पत्तीस आल्यास ज्या कालावधीसाठी भत्ता घेतला त्या कालावधीच्या शेवटच्या दिवसापासून ३ महिन्यांच्या कालावधीपर्यंत ती व्यक्ती बेरोजगार भत्ता मिळवण्यास अपात्र ठरेल.

**१०. बेरोजगार भत्ता देण्याची कार्यपद्धती**— (१) ज्या कालावधीसाठी बेरोजगार भत्ता मागावयाचा आहे त्या कालावधीतील शेवटच्या दिवसापासून ७ दिवसांच्या आत संबंधित व्यक्ती नमुना क्रमांक ८ मध्ये अर्ज करील. बेरोजगार भत्ता मिळण्यासाठी प्रत्येक सलग कालावधीकरिता वेगवेगळे अर्ज केले पाहिजेत. एका अर्जात ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी बेरोजगार भत्त्याची मागणी करता येणार नाही. अर्जाच्या तारखेनंतरच्या काळासाठी बेरोजगार भत्ता मागता येणार नाही. रोजगार मिळण्यासाठी दिलेल्या पत्राच्या पोच पावतीची प्रत अर्जासोबत जोडावी. समिती अधिकाऱ्याने पाठविलेल्या कामावर आपणांस सामावून घेतले गेले नाही या मुद्यावर एखादी व्यक्ती बेरोजगार भत्ता मागत असली तर त्या व्यक्तीने समिती अधिकाऱ्याने कामावर हजर होण्यास सांगितलेल्या पत्राची आणि अंमलबजावणी अधिकाऱ्याने किंवा त्याच्या प्रतिनिधीने, कामावर सामावून घेता येत नाही या-बाबत दिलेल्या शेऱ्याची प्रत अर्जासोबत जोडावी. बेरोजगार भत्त्याची मागणी करणाऱ्यांनी या बाबी अर्जात पूर्ण केलेल्या नसल्यास तो अर्ज नाकारता येईल.

(२) अर्ज मिळाल्यानंतर समिती अधिकारी आवश्यक ती चौकशी करील आणि अर्जदाराने या योजनेअंतर्गत रोजगारासाठी नाव नोंदविले आहे व बेरोजगार भत्ता मिळण्यास तो पात्र आहे याबाबत त्याची खात्री झाल्यावर ज्या काळाकरीता बेरोजगार भत्ता द्यावयाचा आहे तो नमूद करून नमुना क्रमांक ९ मध्ये आदेश काढील आणि संबंधित गावच्या नोंदणी अधिकाऱ्यास अर्जदारास बेरोजगार भत्ता देण्याचा निदेश देईल. जर समिती अधिकाऱ्याने बेरोजगार भत्त्याची मागणी नाकारली तर तो ती नाकारण्याची कारणे नमूद करील आणि अर्जदारास नमुना क्रमांक १० मध्ये कळवील. बेरोजगार भत्त्याबाबतचा अर्ज आल्यापासून शक्यतोवर १० दिवसांच्या आत समिती अधिकारी त्यावर निर्णय देईल.

(३) नोंदणी अधिकारी बेरोजगार भत्त्याचे वाटप साक्षीदाराच्या समक्ष करील आणि तो मिळाल्याबद्दलची सही किंवा अंगठ्याची निशाणी पैसे घेणाऱ्या व्यक्तीकडून आणि साक्षीदाराकडूनही नमुना क्रमांक ११ मध्ये आवश्यक त्या नोंदी केल्यानंतर घेईल. बेरोजगार भत्ता वाटपाबाबतची मासिक विवरणपत्रे नोंदणी अधिकारी समिती अधिकाऱ्यास नमुना क्रमांक १२ मध्ये सादर करील,

**११. वादावर निर्णय देणे** – रोजगार मागणीसाठी पत्र देणारी व्यक्ती आणि समिती अधिकारी यांच्यामध्ये रोजगार पुरविणे आणि / किंवा बेरोजगार भत्ता याबाबत काही विवाद निर्माण झाल्यास समिती अधिकारी आपल्या क्षेत्राच्या उप-विभागीय अधिकाऱ्याकडे ते प्रकरण पाठवील. संबंधित व्यक्तीलाही थेट विभागीय अधिकाऱ्याकडे ते प्रकरण पाठवता येईल. परंतु ज्या आदेशामुळे ज्या व्यक्तीवर अन्याय झाला आहे त्या आदेशाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत तिने तसे केले पाहिजे. उपविभागीय अधिकारी संक्षिप्त चौकशी करून त्याबाबत निर्णय घेईल, आणि योग्य ते आदेश देऊन ते समिती अधिकाऱ्यास तसेच संबंधित व्यक्तीस कळवील. याकरिता उपविभागीय अधिकारी, समिती अधिकाऱ्यास किंवा पंचायत समिती पातळीवरील अंमलबजावणी अधिकाऱ्यास हजर राहण्यास सांगू शकेल. उपविभागीय अधिकाऱ्याने शक्यतोवर पंचायत समितीच्या मुख्यालयात चौकशी करावी. उप विभागीय अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम राहील.

**१२. ग्रामीण रोजगार निधीतून ग्रामपंचायतींना कामे हाती घेण्यास सांगण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार** – एखाद्या व्यक्तीस सदर योजनेखाली घेतलेल्या कोणत्याही कामावर रोजगार पुरविणे इष्ट वाटत नसल्यास, जिल्हाधिकाऱ्याने, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार निधी नियम, १९७४ खाली अनुज्ञेय असलेली कामे

ग्रामपंचायतींना, ग्रामीण रोजगार निधीतून हाती घेण्यास सांगावे. ग्रामीण रोजगार निधीमध्ये निधी शिल्लक असल्यास जिल्हाधिकाऱ्यांचे निदेश ग्रामपंचायतींना बंधनकारक राहतील. तसेच समिती अधिकाऱ्याने निदेश केलेल्या व्यक्तीस कामावर सामावून घेण्याचे बंधन ग्रामपंचायतीवर असेल.

[या आदेशांची सविस्तर माहिती डॉ. मधुसूदन साठे, सचिव, २०७१ डेव्हलपमेंट ग्रुप, यशोधन, विजयानगर पुणे ४११०३० यांच्याकडे मिळून शकेल.]

(रोजगार हमी योजनेच्या संदर्भातील अर्जाचे काही नमुने येथे दिले आहेत. अधिक तपशिलासाठी आदेशांची मूळ प्रत पाहावी.)

**नमुना क्र. १ (नियम ५ पहा)**

**रोजगार हमी योजनेखाली नोंदणीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना**

प्रति

नोंदणी प्राधिकारी,

गाव ............

पंचायत समिती ............

महोदय

रोजगार हमी योजनेखाली रोजगार मागणारा म्हणून माझ्या नावाची नोंदणी करावी अशी मी आपणांस विनंती करतो. माझ्यासंबंधीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :–

(१) नाव ..............................................

(२) पत्ता ..............................................

(३) अनुसूचित जात / जमात, विमुक्त जाती किंवा भटक्या जमातीचा / ची असल्यास जाती / जमातीचे नाव

(४) पुरुष / स्त्री

(५) वय

(६) जमीन धारण करीत असल्यास किती हेक्टर ............

आपला / ली विश्वासू

अर्जदाराची सही किंवा

अंगठ्याची निशाणी

दिनांक : ...............

ठिकाण : ...............

**नमुना क्र. ३ (नमुना क्र. ५ पहा)**

**रोजगार हमी योजनेखाली नोंदणी केलेल्या रोजगार मागणाऱ्यांचे ओळखपत्र**

(१) नाव ...

(२) पत्ता ...

(३) पुरुष / स्त्री ...

(४) नोंदणीच्या वेळी असलेले वय ...

(५) नोंदणीचा दिनांक ...

(६) नोंदणी क्रमांक ...

....................

नोंदणी प्राधिकाऱ्याची सही

गाव ................

पंचायत समिती ..............

नोंदणी केलेल्या रोजगार मागणाऱ्याची सही किंवा अंगठ्याची निशाणी

**नमुना क्र. ४ (नियम ६ पहा)**

**रोजगार हमी योजनेखाली रोजगार मागणीचे पत्र**

प्रति

समिती अधिकारी,
पंचायत समिती ················
नोंदणी प्राधिकारी
गाव ·················
पंचायत समिती ················

महोदय,

रोजगार हमी योजनेखाली मला रोजगार पुरविण्याची मी आपणांस विनंती करतो. माझ्यासंबंधीचा तपशील पुढीलप्रमाणे :—

(१) नाव ···
(२) पुरुष / स्त्री ···
(३) नोंदणी क्रमांक ···
(४) पत्ता ···

मी याद्वारे हमी देतो की, समिती अधिकाऱ्याने निर्देशित केलेल्या कामावर मी सतत किमान ३० दिवस काम करीन.

आपला विश्वासू,
अर्जदाराची सही
किंवा अंगठ्याची निशाणी

ठिकाण : ··· ·········
दिनांक : ············

**नमुना क्र. ५**

(नियम ६ पहा)

**रोजगार हमी योजनेखाली रोजगारासाठी केलेल्या अर्जाची पोच**

श्री / श्रीमती / कुमारी ··············································· राहणार ······················, पंचायत समिती ····· ············· यांचा दिनांक ················ चा रोजगार हमी योजनेखाली रोजगार मिळण्याबाबतचा अर्ज मिळाला. सदर योजनेखाली रोजगार मिळण्यासाठी त्यांच्या नावाची नोंद ············· गावामध्ये झाली आहे. त्यांचा नोंदणी क्रमांक ·········· आणि नोंदणीचा दिनांक ·············· आहे.

ठिकाण : ··········
दिनांक : ··········

अर्ज स्वीकारणाऱ्या
अधिकाऱ्याची सही व पदनाम

**नमुना क्र. ८**

(नियम १० पहा)

**रोजगार हमी योजनेखाली बेरोजगार भत्त्यासाठी करावयाचा अर्ज**

(१) नाव ························
(२) पत्ता ·······················
(३) पुरुष / स्त्री ·········· (४) वय ··············

(५) नोंदणी क्रमांक ..........

(६) नोंदणीचा दिनांक ..........

(७) रोजगारासाठी अर्ज कोणत्या तारखेस
व कोणास दिला

(८) किती दिवसासाठी बेरोजगार भत्त्याची
मागणी केली आहे.

(९) बेरोजगार भत्त्याच्या मागणीच्या
कालावधीच्या प्रारंभाची तारीख.

मी .................... राहणार ................ गांभीर्यपूर्वक असे जाहीर करतो की, या अर्जाद्वारे ज्या कालावधीसाठी मी बेरोजगार भत्त्याची मागणी केली आहे त्या कालावधीत मी कोठेही रोजगारावर नव्हतो आणि याद्वारे अशी हमी देतो की, उपर्युक्त कालावधीत किंवा त्यापैकी काही काळात मी रोजगारावर होतो असे सिद्ध झाल्यास त्या कालावधीसाठी मिळालेली बेरोजगार भत्त्याची रक्कम शासनास परत करीन.

दिनांक ..........

अर्जदाराची सही / अंगठ्याची निशाणी

सूचना :– (१) रोजगारासाठी अर्ज दिल्यावर मिळालेल्या पोच पावतींची प्रत या अर्जासोबत जोडावी.
(२) समिती अधिकाऱ्याने निर्देशित केलेल्या कामावर अर्जदारास सामावून घेतले नाही म्हणून जर बेरोजगार भत्त्याची मागणी केली असेल तर समिती अधिकाराच्या त्या कामावर निर्देशित केल्यासंबंधीच्या पत्राची प्रत, तसेच अंमलबजावणी अधिकाऱ्याच्या किंवा त्याच्या प्रतिनिधीच्या, अर्जदारास कामावर सामावून घेण्यास असमर्थ असल्याबद्दलच्या शेऱ्याची प्रत या अर्जास जोडावी.

---

मा. संपादक,

जुलै–सप्टेंबरचा अंक संपूर्णपणे वाचला. अंक फार आवडला. विशेषत: 'वन आणि आदिवासी अर्थ-व्यवस्था' हा ब्रह्मदत्त शर्मांचा लेख अत्यंत मार्गदर्शनपर आहे. आदिवासी उप–योजना तयार करताना या लेखाचा विचार करणे उपयुक्त ठरेल. याच प्रकारे आपल्या त्रैमासिकात विकास योजनाबाबत तज्ज्ञांचे लेख यावेत हीच अपेक्षा !

आपला
**प्रकाश सोनाळकर**
सांख्यकी सहाय्यक,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
कळवण, जि. नासिक

आपण 'आदिवासी स्त्री' यावर एक अंक काढावा असे मला वाटते. कारण आदिवासी स्त्रीचे आचार-विचार व व्यक्तिमत्व हे वेगळ्या तऱ्हेचे घडलेले असते. याची आपणास माहिती असेलच तरी आपण याचा विचार करावा.

**नीलम परुळेकर**
पालघर, जि. ठाणे





आपण प्रत्येक महिन्याला पाठवीत असलेले नोकरी-संबंधीचे माहिती पत्रक खूपच उपयुक्त ठरले आहे. देव दैठण, बावी, खुरदैठण या गावांतील काही मागास-वर्गीय मुले मुंबईला वॉचमन म्हणून नोकरीला लागले आहेत. आपण त्यांना हा मार्ग दाखविलात त्याबद्दल धन्यवाद ! त्यांचे पाहून आणखी बरीच मुले असाच प्रयत्न करीत आहेत.

**अरूण लोंढे**
जामखेड, अहमदनगर

With Best Compliments From

**Well Wisher**

# मनोर प्रकरणाच्या निमित्ताने–



शरद कुलकर्णी

भूमिसेनेने बुधवार दि. ७ ऑक्टोबर रोजी काढलेला मोर्चा विसर्जित झाल्यानंतर कार्यकर्त्यांना झालेल्या मारहाणीसंबंधी बरीच उलट-सुलट चर्चा चालू आहे. ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी यासंबंधी एक पत्रकही काढले आहे. या प्रकरणाचा सविस्तर विचार होणे आवश्यक आहे. म्हणून हा खटाटोप.

दि. १ ऑक्टोबर रोजी मनोर येथे शांताराम तांडेल या आदिवासी तरुणास एका मारवाडी मुलीची छेड काढली म्हणून अटक करण्यात आली. पोलिसांनी त्याला कस्टडीत असताना बेदम मारहाण केली, त्याची गावातून धिंडही काढण्यात आली. गावातील काही लोकांनीही त्याला मारहाण केली. त्या अगोदरच काही दिवस मनोरमध्येच एका बिगर – आदिवासी सराईत गुंडाने आदिवासी महिलेवर बलात्कार केला होता. पोलिसांनी त्याची लगेचच जामिनावर सुटका केली होती. आदिवासी युवकाला मिळालेल्या वागणुकीचा निषेध करण्यासाठी आणि पोलिसांच्या वागणुकीतील दुटप्पीपणा स्पष्ट करण्यासाठी भूमिसेनेने ७ ऑक्टोबरला मनोर पोलिस स्टेशनवर एक शांततापूर्ण मोर्चा नेला. मोर्चा संपल्यावर आदिवासी परतू लागले. परतताना काही बायकांची ज्या मारवाडी कुटुंबातील मुलीबद्दल हा प्रकार घडला त्यातील स्त्रियांशी काही बोलाचाली झाली. तेव्हा आदिवासी स्त्रियांना शांत करण्यासाठी भूमिसेनेचे अध्यक्ष काळूराम धोदडे व त्यांचे एक सहकारी रामभाऊ वडू तेथे गेले. त्याच वेळी पोलिसांची गाडी तिथे येऊन त्यांना अटक करण्यात आली व मनोर पोलिसांकडून त्यांना मारहाण झाली. त्याच वेळी भूमिसेनेच्या विरोधकांनी **पोलिसांशी संगनमताने** भूमिसेनेच्या कार्यालयात जाऊन तेथील कार्यकर्त्यांना मारहाण करीत पोलीस चौकीवर नेले. तेथेहीं त्यांना मारहाण झाली. त्यानंतर त्यांच्यावर शांतताभंग व दरोड्याचा आरोप ठेऊन त्यांना डहाणूच्या मॅजिस्ट्रेटपुढे उभे करण्यात आले. त्यांची १६ मार्च रोजी जामिनावर सुटका झाली.

## निषेध सभेचे आयोजन

या सर्व प्रकाराविरुद्ध आदिवासी समाजात अतिशय असंतोष निर्माण झाला. पोलिसांच्या या कायदेबाह्य वर्तनाचा निषेध करण्यासाठी अनेक संघटना व कार्यकर्ते यांनी **पोलिसांना पूर्वसूचना देऊन** सभा आयोजित केली. या सभेस पोलिसांनी आयत्या वेळी परवानगी नाकारली. तेव्हा बंदीहुकूम मोडून २००० आदिवासी व अनेक बिगर आदिवासी कार्यकर्त्यांनी सत्याग्रह करून अटक करवून घेतली. (सत्याग्रहासंबंधी सविस्तर हकीकत दि. १८ नोव्हेंबरच्या 'श्रमिक विचार'मध्ये आली आहे. 'साधने'च्या २८ नोव्हेंबरच्या संपादकीयात यावर टीकाटिप्पणी करण्यात आली आहे.) यासंबंधी ठाण्याचे जिल्हाधिकारी सिंग यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकाचा गोषवारा 'टाईम्स ऑफ इंडिया'च्या दि. १९ नोव्हेंबरच्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी "कष्टकरी संघटना, भूमिसेना आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांच्यात संघर्ष होऊ नये म्हणून मनोर, कासा, तलासरी आणि इतर ठिकाणी जमावबंदी हुकूम लागू करण्यात आला होता" असे आपल्या पत्रकात म्हटले होते. परंतु वस्तुतः तणाव मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व कष्टकरी संघटना यात आहे भूमिसेनेचे दोघांशीही संबंध चांगले आहेत. तसेच मनोर भागात या तिघात कोणताही तणाव नाही हे स्थानिक प्रशासनास पूर्णपणे माहीत आहे. त्यामुळे पोलिसांच्या वर्तणुकीचा निषेध करणारी सभा होऊ नये यासाठीच मनोर येथे हा जमावबंदी हुकूम लावण्यात आला हे उघड आहे.

### निखालस खोटेपणा

आपल्या पत्रकात भूमिसेना आणि इतर संघटना लोकांस बेकायदेशीर गोष्टी करण्यास उत्तेजन देत आहेत असाही आरोप जिल्हाधिकाऱ्यांनी केला आहे, तोही निखालस खोटा आहे. भूमिसेनेने आदिवासींच्या पिळवणुकीविरुद्ध आंदोलने केली आहेत. मात्र आपल्या १३ वर्षांच्या कारकीर्दीत लुटालूट, हिंसाचार यांना कधीही उत्तेजन दिलेले नाही हे पोलीसांच्या नोंदीवरून सहज स्पष्ट होईल. १५ नोव्हेंबर रोजी झालेल्या निदर्शनात मुंबई व पुणे येथील काही विद्यार्थ्यांनी भाग घेतला असेही या पत्रकात म्हटले आहे. यातून जिल्हाधिकाऱ्यांना काय सुचवायचे आहे ते स्पष्ट होत नाही. पोलिसांनी एका जनसंघटनेच्या कार्यकर्त्यांना मारहाण करावी आणि त्याचा निषेध करणाऱ्या निदर्शनात महाविद्यालयीन युवकांनी भाग घेऊ नये असे म्हणणे योग्य नाही. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी पोलिसांच्या बेकायदेशीर वर्तणुकीच्या निषेधात भाग घेतला हे अभिमानास्पदच आहे.

पोलिसांच्या गैरवर्तणुकीसंबंधी जिल्हाधिकाऱ्यांनी काहीही न म्हणणे स्वाभाविकच आहे. पण मनोर सभेस बरीच अगोदर परवानगी नाकारली होती असे खोटे विधान त्यांनी केले नसते तर बरे झाले असते. ठाणे जिल्ह्यातील काही विभागात लागू केलेली जमावबंदी १४ नोव्हेंबरपर्यंतच लागू होती. त्यामुळेच सभेची तारीख १५ नोव्हेंबर ठरवण्यात आली होती, व तसे पोलिसांना अगोदर कळवण्यातही आले होते. जमावबंदीची मुदत सभेच्या दिवशीच म्हणजे १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ३० नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली.

भूमिसेनेच्या कार्यकर्त्यांवर हल्ला हा अपघात किंवा एखाद्या पोलीस अधिकाऱ्याचा आगाऊपणा नाही. आदिवासी समाजात जनजागरण करणारे गट वाढत आहेत. या समाजाला मिळत असलेल्या दुय्यम दर्जाच्या वागणुकीबद्दल तीव्र असंतोष मूळ धरत आहे. आदिवासी समाजातील नवजागृतीमुळे पोलीस व गावपातळीवरील सरकारी नोकर यांच्या भ्रष्टाचाराला आणि अरेरावीला जो प्रतिबंध होत आहे त्यामुळे सरकारी अधिकाऱ्यांत निर्माण झालेल्या चिंतेचे जिल्हाधिकाऱ्यांचे पत्रक एक प्रतीक आहे. त्याचबरोबर आदिवासींचे अमानुष शोषण करणाऱ्या सावकार, व्यापारी व सधन शेतकरी यांनाही जागृत आदिवासी आव्हान देत असल्याने स्थितीवादी पक्षांना आणि गटांना पुढे करून आदिवासींवर हे धनदांडगे वर्ग हल्ले करीत आहेत.

या गोष्टी ठाणे जिल्ह्यापुरत्याच सीमित नसून इतरत्रही होत आहेत. त्यामुळे आदिवासी समाजात बिगर-आदिवासीविरोधी आणि सरकारविरोधी भावना वाढीस लागत आहे. वास्तविक पाहाता सरकारने आणि राष्ट्रहिताची खरीखुरी कळकळ असणाऱ्यांनी आदिवासी समाजातील अन्याय दूर करण्यासाठी पुढे आले पाहिजे. एका बाजूस वनवासी बांधवांना विसरू नका असे म्हणावयाचे आणि दुसरीकडे शोषण करणाऱ्यांच्या बाजूने कंबर कसून उभे राहावयाचे हा दुटप्पी व्यवहार राष्ट्रहिताचा नाही. तसेच सरकारने आपण आदिवासींच्या हितासाठीच सर्व काही करीत आहोत अशी जाहिरात करावयाची आणि जागृत आदिवासींना आणि त्यातील कार्यकर्त्यांना ठोकून काढावयाचे हे दुटप्पी धोरण सोडून दिले पाहिजे. असे न झाल्यास वितुष्ट आणि संघर्ष अपरिहार्य आहे.

(आदिवासी जाणीव जागृती केंद्र, पुणे.)

---

# चेतना विकास संस्था

संस्थापरिचय

रोजगार हमी योजनेतील मजुरांना योग्य मजुरी, औषधोपचार, व इतर अत्यावश्यक व न्याय्य सोयी-सवलती मिळवून देण्यासाठी 'चेतना विकास' ही समाजसेवी संस्था गोपुरी, वर्धा या भागात कार्य करते आहे. राजकीय सत्ता किंवा राजकीय पक्षयांच्याशी सुतराम संबंध नसलेली ही संस्था गावकऱ्यांचा सर्वांगीण विकास साधावा व त्यांचे चैतन्य जागावे यासाठी वर्धा जिल्हयातील ५०–७५गावात कार्य करते आहे.

रोजगार हमीतील विविध कामे, त्यांच्यासाठी देण्यात येणारी मजुरी, या योजनेत केलेल्या कामाचे मोजमाप व त्यासाठी कायद्याने मिळणारी मजुरी याची कष्टकरी जनतेला माहिती करून देण्याचे कार्य या संस्थेने विविध प्रकारे केले आहे. त्यात कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण, हमी योजनेतील कामे, व मोजमाप यांची सचित्र माहिती देणारी पत्रके काढणे यांचा समावेश आहे. या अंकावरील मुखपृष्ठावर मोजमाप कसे करावे याची माहिती देणाऱ्या या संस्थेच्या एका पत्रकाचा काही भाग प्रसिद्ध केला आहे.

रोजगार हमी योजनेतील मजुरांना त्यांचे हक्क मिळवून देण्याबरोबरच या संस्थेने 'कष्टकरी–चेतना संघ' या गावातल्या लहान शेतकरी व मजुरांच्या संघटनेस बरोबर घेऊन एक 'धान्य योजना' नुकतीच तयार केली आहे.

जगण्यासाठी सगळ्यांना धान्य योग्य भावात मिळालेच पाहिजे हा या संस्थेचा मूळ हेतू. रेशन दुकानात मिळणाऱ्या धान्यातील अनियमितता व गडबड, लहान शेतकऱ्यांना त्यांच्या जवळील धान्य कमी दरात विकावयास भाग पाडून नंतर साठेबाज व्यापाऱ्याकडून तेच धान्य जास्त भाव देऊन विकत घ्यावयास भाग पाडणाऱ्यांच्या पाशातून या कष्टकरी जनतेला मुक्त करण्यासाठी ही नवी योजना आहे. या योजनेचे (१) रेशन दुकानावर निगराणी व (२) धान्य बँक असे प्रमुख भाग आहेत.

**(१) कंट्रोल दुकानावर निगराणी :** सरकारने आपल्या गावासाठी या महिन्यात किती धान्य दिले आहे, कार्डावर प्रत्येकाला किती धान्य व साखर मिळाली पाहिजे व त्यांचा नियमानुसार भाव काय ही सर्व माहिती वेळोवेळी गावात पोहोचवली जाईल. ज्या गावातील कंट्रोल दुकानात या बाबतीत काही गडबड आढळेल तिची चौकशी व योग्य ती कारवाई गावातील कष्टकरी लोकांची संघटना करील. चेतना विकास असल्या प्रयत्नांना मदत करील.

**(२) धान्य बँक :** धान्याचे भाव कमी असतात तेव्हा मोठ्या प्रमाणावर खरेदी करून धान्याची बँक बनवावी. पुढे भाव वाढल्यावर या धान्य बँकेतून सदस्यांना चालू बाजार भावापेक्षा कमी भावाने धान्य मिळू शकेल.

धान्य – खरेदीसाठी सुरवातीला लागणारा पैसा चेतना – विकास देईल. **१५ गावासाठी १ लाख रुपयांचे धान्य चेतना विकासाने खरेदी करून ठेवलेले आहे.** गावातील लहान शेतकऱ्यांनी व मजुरांनी यात आलेली ठेव दरमहा जोडावी अशा तऱ्हेने जी ठेव गोळा होईल तितकाच पैसा चेतना – विकास यात टाकेल व ही एकूण रक्कम गावातील धान्य–योजना सदस्यांची ठेव बनेल. यातून पुढल्या वर्षी आणखी जास्त धान्य विकत घेता येईल.

**सभासद सदस्य कोण बनू शकतील. (१) भूमिहीन मजूर–(२) शेतकरी** – ज्यांनी रोजगार हमी योजनेत मजुरी केली ते किंवा ज्यांच्या कुटुंबाकडे माणशी दीड एकरापेक्षा कमी कोरडवाहू शेती आहे ते आणि मजुरांना वाढीव मजुरी रोज (पुरुषाला ७ रु. व बाईला ५ रु. रोज, म्हणजेच तासाला १ रु. या दराने) मिळावी ही मागणी ज्यांना मान्य आहे. सदस्यांना या वर्षी कुटुंबामागे दरमहा २ रु. ठेव या बँकेसाठी द्यावी लागेल.

**संघटना** – गावातील सदस्य कुटुंबातील १८ वर्षांवरील सर्व बाया-माणसे मिळून ही कष्टकरी लोकांची धान्य-संघटना बनेल. एक समिती निवडली जाईल व तीत मजुर, शेतकरी व बाया राहतील. या समितीचा एक संयोजक किंवा संयोजिका राहील. कंट्रोल दुकानातील धान्य पुरवठा व कायदेशीर भाव यांच्यावर ही संघटना निगराणी ठेवील. जेव्हा कंट्रोलमध्ये पुरेसे धान्य प्रयत्न करूनही उपलब्ध नसेल तेव्हा ही समिती बँकेतून धान्य पुरवठा करायची शिफारस करेल. आठवडी बाजाराच्या दिवशी संघटनेच्या सदस्यांना स्वस्त भावाने धान्य बँकेतून मिळेल.

**धान्याचे भाव :** अशा तऱ्हेने संघटना व धान्य बँक बनवल्यास बाजारभावापेक्षा कमी भावाने धान्यपुरवठा **करता येईल.**

ज्या गावातील २५ टक्के कुटुंबे या योजनेचे सदस्य होतील त्या गावात ही संघटना व योजना बनेल.

अशी संघटना व बँक बनल्यास गावातील गरिबांचे धान्य खरेदीमध्ये होणारे शोषण, हाल थांबतील व त्यांच्या हाती नेहमीसाठी धान्याची ठेव राहील.

चेतना – विकास व कष्टकरी चेतना संघाचे कार्यकर्ते व कार्यालय आंजी, वायफड, वायगांव व पाचोड – मांडवा – आजनगांव येथे आहे. तेथे किंवा गोपुरी, वर्धा येथे यासाठी संपर्क साधता येईल.

**महाराष्ट्र राज्य नियोजन खात्याच्या EGS 1681/27/D-37 (ता. २२ एप्रिल १९८१) च्या निर्णयासंबंधी महत्त्वाची माहिती थोडक्यात पुढे दिली आहे.**

रोजगार हमी कायदा १९७७ सेक्शन ७ (२) कलम ६ व ७ अन्वये रोजगार हमी कामाच्या मजुरीच्या दराबद्दल धोरण सांगण्यात आले आहे. त्यानुसार ७ तास कष्टाने काम करणाऱ्या मजुरास शेतीतील किमान वेतन (शेवटच्या झोनला लागू असलेले) असे दर असावेत. पाटबंधारे व रस्ते यांच्या कामासाठी राज्यभर एकच दर लागू केले गेले होते. तर भू-विकास व जंगल कामासाठी संबंधित खात्यांचे त्या त्या ठिकाणी प्रचलित असलेले दर वापरले जात. परंतु मजुरांना बरेचदा पुरेशी मजुरी मिळत नसे. काही बाबतीत कामाचे मोजमाप करणे अवघड झाले. एकंदरच डोंगरी व आदिवासी विभागात मनापासून काम करणारांनाही मजुरी फार कमी पडे. याची कारणे अपुरा आहार तसेच घरापासून कामाच्या जागी जाण्यातले जास्त कष्ट अशी आहेत. म्हणून अशा भागात इतर ठिकाणांपेक्षा सुमारे १५% काम कमीच होणार असे धरून त्यांच्यासाठी वेगळे दरपत्रक करणे जरूर आहे. नवीन दरपत्रकानुसार अशा ठिकाणीही कष्टाळू मजुराला ४ रुपये रोज मिळावा

वरील शासकीय निर्णयामध्ये असे सुधारित दरपत्रक सविस्तरपणे दिले आहे. हे दरपत्रक रोजगार हमी मजुरांना संघटित करणाऱ्या कार्यकर्त्यांनी तपशिलाने अभ्यासले पाहिजे. पण जागेअभावी ते पूर्णपणे उद्धृत करता येणार नाही. जिज्ञासूंनी डॉ. मधुसूदन साठे, सचिव, डेव्हलपमेंट ग्रुप यांच्याशी पत्रव्यवहार करावा. त्यांचा पत्ता अंकात इतरत्र दिला आहे.

पुढील प्रकारच्या कामांचे मोजमाप करणे कठीण असल्याने त्या कामावर नेमलेल्या मजुरांना ४ रुपये रोज वेतन मिळावे असा आदेश आहे. (१) सर्व्हेइंगचे सामान वाहून नेणे व मदत करणे. (२) मजुरांना पाणी देणे. (३) लहान मुलांना सांभाळणे. (४) पहारेकरी. (५) रोपे उचलून नेणे. (६) रोपवाटिकेत काम करणे इ.

आदिवासी भाग आणि डोंगराळ भाग यांच्यासाठी असलेले खास दर खालील भागात लागू आहेत.

**ठाणे** – मोखाडा, शहापूर, मुरबाड, डहाणू, तलासरी, जव्हार व वाडा हे संपूर्ण तालुके. पालघर, वसई व भिवंडी तालुक्यांचा आदिवासी उपयोजना भाग.

**रायगड** – कर्जत, सुधागड, महाड व पोलादपूर व पेण तालुक्याचा आदिवासी उपयोजना भाग.

**रत्नागिरी** – खेड, चिपळूण, संगमेश्वर, लांजा, कणकवली, कुडाळ व सावंतवाडी तालुके.

**नाशिक** – बागलाण, कल्याण, सुरगणा, दिंडोरी, पेठ, नाशिक व इगतपुरी तालुके.

**धुळे** – साक्री, तळोदा, अक्कलकुवा, अक्राणी व नवापूर हे पूर्ण तालुके. नंदुरबार, शहादा व शिरपूर तालुक्यांचा उपयोजना विभाग.

**जळगाव** – चोपडा, यावल व रावेर तालुक्यांचा आदिवासी उपयोजना विभाग.

**नगर** – अकोले तालुक्याचा उपयोजना विभाग.

**पुणे** – भोर, वेल्हे, मुळशी, मावळ, खेड, आंबेगाव, जुन्नर व हवेली तालुके.

**सातारा** – पाटण, जावळी, वाई व महाबळेश्वर.

**सांगली** – शिराळा तालुका.

**कोल्हापूर** – शाहूवाडी, बावडा, पन्हाळा, राधानगरी, भूश्वरगड, आजरा, चंदगड व करवीर तालुके.

**नांदेड** – किनवट तालुक्याचा उपयोजना भाग.

**अमरावती** – मेलघाट तालुका.

**नागपूर** – रामटेक व काटोळ तालुक्यांचा आदिवासी उपयोजना भाग.

**भंडारा** – गोंदिया व साकोली तालुक्यांचा आदिवासी उपयोजना भाग.

**यवतमाळ** – वणी, केळापूर, यवतमाळ व पुसद तालुक्यांचा आदिवासी उपयोजना भाग.

**चंद्रपूर** – संपूर्ण सिरोंचा तालुका गडचिरोली राजुरा, चंद्रपूर, ब्रह्मपुरी तालुक्यांचा आदिवासी उपयोजना भाग.

**वर्धा** – आर्वी तालुक्याचा आदिवासी उपयोजना विभाग.

## 'हाकारा' दुसरा, एप्रिल १९८० : 'आदिवासी व शिक्षण' खास विभाग

## 'हाकारा' तिसरा, जुलै १९८० : 'आदिवासी व वन-संवर्धन' खास विभाग

## 'हाकारा' चौथा, ऑक्टोबर १९८० : 'आदिवासी साहित्य व कला' खास विभाग

१) गोंडी लोकगीतांमधील सौंदर्य आणि वास्तवता — भुजंग मेश्राम
२) सावकारी हिशोब — विठ्ठल पाडेकर
३) माडियांच्या नृत्यगीतातील साहित्य — शैलजा देवगावकर
४) कळसूत्री बाहुल्या, जनसंपर्क आणि जाणीव जागृती — हेमंत कानिटकर
५) माडियांची हस्तकला — शं. गो. देवगावकर
६) हर्रे कुमरा — सुखदेव बाबू उईके
७) ग्रामीण चित्रणात जिवती — धनंजय नाकाडे
८) आदिवासींची वास्तुशास्त्रकला — का. रा. रडे

## 'हाकारा' पाचवा, जानेवारी १९८१ : 'नोकरीतील राखीव जागा' खास विभाग

१) दलितांच्या सवलती —गं. बा. सरदार,
२) राखीव जागा माहिती —पत्रके
३) दलितांच्या सवलती काही गैरसमजुती —रा. प. नेने
४) राखीव जागा शासकीय आदेशांची उपयुक्त माहिती
५) अनु. जाती–जमाती, विमुक्त जाती, भटक्या जाती, इतर मागास जाती यांची समग्र यादी
६) वनशेती — शंकर रंगनाथन्
७) आदिवासी व वनखाते–अतिरिक्त वन–संरक्षक आदि माहितीपूर्ण मजकूर.

## 'हाकारा' सहावा, एप्रिल १९८१ : 'आदिवासी आणि आरोग्य' खास विभाग

१) डॉ. अल्बर्ट स्वाइट्झर —रंगनाथ गोडबोले
२) मलेरियाची गोष्ट —अरविंद पटवर्धन
३) आदिवासी आणि अनुवांशिकता —एस. एल. काटे
४) ग्राम आरोग्य प्रकल्प–कोसबाड —अनुताई वाघ
५) आदिवासींची श्रद्धास्थाने —वि. म. गोगटे
६) ह्यो दवाखाना आमासाठी हाये —के. आर तोरसकर
७) आदिवासी आणि आधुनिक वैद्यक —अनंत फडके
८) औषधी परिचय – मेहता ट्रस्टचे बहुमोल कार्य औषधी पेटी, होमिओपधी इत्यादि माहितीपूर्ण मजकूर.

## 'हाकारा' सातवा, जुलै १९८१ : 'वनशेती व वनसंवर्धन' खास विभाग

१) धनगराला धत्तुरा, शहरवाल्यांना मलिदा — जगदीश गोडबोले
२) जंगले वाचवा : धोरण आणि वस्तुस्थिती — दीनानाथ मनोहर
३) वन आणि आदिवासी अर्थव्यवस्था — ब्रह्मदेव शर्मा
४) निलगिरीची वनशेती — आनंद मसलेकर
५) वनसंवर्धन आणि ग्रामीण विकास — इत्यादी माहितीपूर्ण मजकूर

Registered with the Register of Newspapers for India Under No. 35835/80

# हाकारा . . .

(१) आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन

(२) कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण

(३) शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडविणे

(४) मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे

(५) मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या सर्व उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशांचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. या कार्यात आपणही सहभागी होऊ शकता. मानव विज्ञान परिषदेचे सदस्य आणि हाकाराचे वर्गणीदार होऊन ! मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व—

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २०० रुपये |
| सभासद | २० रुपये वार्षिक |
| आणि | |
| हाकाराची वार्षिक वर्गणी | १५ रुपये |
| हाकारा व परिषद यांची संयुक्त वार्षिक वर्गणी | २० रुपये फक्त |

आपली सदस्यत्व फी आणि वार्षिक वर्गणी कृपया

नवीन पत्ता—

**महाराष्ट्र मानव–विज्ञान परिषद**
द्वारा, जगदीश गोडबोले,
'सीमा', ब–७, शिरोळे मार्ग, पुणे ४११ ००४.

या पत्त्यावर शक्य तेवढ्या लवकर पाठवा.

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.